पुणे. वर्ष अठरावे. जून, २०२२. अंक सहावा
पृष्ठसंख्या : ५४. किंमत : ५० रुपये. वार्षिक वर्गणी : रुपये ५०० फक्त

# जलसंवाद

पाणी प्रश्नावर मंथन घडवून आणण्यासाठी
व्यासपीठ उपलब्ध करुन देणारे मासिक

संपादक: डॉ. दत्ता देशकर, श्री.सतीश खाडे

अतिथी संपादक : श्री. सतीश देशमुख



## श्री. विलासराव साळुंखे
## गौरव विशेषांक

## विलासरावांच्या कारकीर्दीचा आढावा



- जन्म – २० फेब्रुवारी १९३७
- शालांत परीक्षा – १९५४
- अभियांत्रिकी पदवी – १९५९
- बळवंत इंजिनियरिंग (इलेक्ट्रिक मोटर वाईंडिंग वर्कशॉप) ची सुरुवात – १९६०
- ॲक्युरेट इंजिनियरिंग ची स्थापना – १९६३
- विवाह – १९६७
- महाराष्ट्रातील दुष्काळ – १९७२
- स्वयंसेवी जलसंधारण कामास सुरूवात – १९७३
- कुटुंबासह नायगाव येथे स्थलांतर / ग्राम गौरव प्रतिष्ठान ची स्थापना – १९७४
- नायगाव प्रयोग यशस्वी ( माणशी अर्धा एकर जमिनीस पाणी) – १९७६
- व्हरनियर कॅलीपर निर्मितीसाठी केंद्र सरकारचा आयात पर्याय पुरस्कार – १९७७
- नायगाव पॅटर्न आधारित पाणलोट क्षेत्र विकास कामांचा महाराष्ट्र शासन निर्णय जारी – १९७८
- सिंचन आयोग स्थापित – १९७८
- पाणी पंचायत नियमावली आखून सामुदायिक उपसा सिंचन योजनाना सुरूवात – १९७८
- फोर्ड फाउंडेशनची ग्रँट नाकारली – १९८०
- पाणी पंचायत योजनांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत मुख्यमंत्री शरद पवारांशी चर्चा – फेब्रू.१९८०
- सासवड शेतकरी आंदोलन / नागपूर विधानसभा धडक मोर्चा – डिसेंबर १९८०

# जलसंवाद


भारतीय जलसंस्कृती मंडळ, औरंगाबाद पुरस्कृत

■ जून २०२२

■ संस्थापक संपादक
डॉ. दत्ता देशकर
कै. प्रदीप चिटगोपेकर

■ वर्तमान संपादक
डॉ. दत्ता देशकर – ०९३२५२०३१०९
श्री. सतीश खाडे – ०९८२३०३०२१८

■ मुखपृष्ठ व सजावट
अजय देशकर

■ अंतर्गत मांडणी व अक्षर जुळवणी
आरती कुलकर्णी

■ मुद्रण –
श्री. जे प्रिंटर्स प्रा. लि, दत्तकुटी १४१६, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०

■ वार्षिक वर्गणी : ५०० /–
पंचवार्षिक वर्गणी : रू. २०००/–
दशवार्षिक वर्गणी : रू. ३५००
(या मासिकाची वर्गणी dgdwater@okaxis या लिंकवर ऑनलाईन भरू शकता)



■ जाहिरातींचे दर : मलपृष्ठ क्र. ४ रू. १५०००. वेष्टण पृष्ठ २ व ३ रू. १०,०००. आतील साधे पान रू. ५०००.
(वर्षाचे पॅनल बुक केले तर २० टक्के सूट मिळेल)



या अंकाचे मूल्य : रू. ५०/–


## अनुक्रमणिका


- **संपादकीय** / ४
- **अतिथी संपादकाचे मनोगत** /५
- **आमची भूमिका**
  श्री. विलासराव साळुंखे / ६
- **समन्यायी पाणी वाटपाचे दारिद्र्य निर्मूलनाचे अर्थकारण**
  श्री. आनंदरावदादा पाटील / ८
- **समन्यायी पाणीवाटप – मुक्त चिंतन –** डॉ. दि.मा.मोरे / ११
- **आपला माणूस – विलासराव साळुंखे**
  श्री. शरद मांडे / १४
- **माणशी अर्धा एकर पाणी – महाराष्ट्राला न झेपलेली संकल्पना**
  श्री. प्रदीप पुरंदरे / १९
- **अस्वस्थ समाजभान –** श्रीमती कल्पना साळुंखे / २२
- **बाबांचे विचार आम्ही पुढे नेत आहोत**
  डॉ. सोनाली शिंदे / २३
- **बाबांचा उद्योग विश्वातील प्रवास –** श्री. विक्रम साळुंखे / २५
- **विलासराव विद्रोहाच्या वाटेवरचे विवेकी वाटसरू**
  श्री. प्रसाद भगवान सेवेकरी / २६
- **आधुनिक भगीरथ – विलासराव साळुंखे –**
  श्री. सतीश देशमुख / २८
- **देव टाक्याच्या पाण्यासारखा पाणीबाबा**
  श्री. पांडुरंग (काका) शितोळे/ २९
- **समन्यायी पाणी वाटपाची दिशा हरवली आहे काय ?**
  श्री. उपेंद्रदादा धोंडे / ३२
- **विलासराव साळुंखे : जलनियोजनाच्या क्षेत्रातील मानदंड**
  श्री. के.जे. जॉय / ३६
- **जलक्षेत्रातील कार्व्हर – विलासराव साळुंखे**
  श्री. मयुर बाळकृष्ण बागुल / ३८
- **काव्य सरिता – दुष्काळ –** सौ. उज्वला शिंदे /४०
- **साठवणीतील आठवणी**
  श्री. दत्तात्रय दिनकरराव केंजळे / ४१
- **पाणीबाबा विलासराव साळुंखे – अनुभवाची शिदोरी**
  श्री. लक्ष्मण खेडकर / ४४
- **आमचे देव – विलासराव** श्री. जगन्नाथ साबळे /४५
- **विलासराव साळुंखे : दृष्टा, या सम हा**
  डॉ. हिमांशु कुलकर्णी / ४६
- **आमचाही खारीचा वाटा**
  श्री. शांताराम कृष्णाजी कोलते / ४७
- **विलासरावांच्या विचारातले क्रांतीकारकत्व**
  श्री. मिलींद बोकील / ४८
- **मला भावलेले विलासराव**
  एक शेतकरी / ४९
- **खळदला मारलेली चक्कर**
  डॉ. दत्ता देशकर / ५२

# संपादकीय.......

**डॉ. दत्ता देशकर**
**मो : ९३२५२०३१०९**



जलक्षेत्रात कार्य करायचे असेल तर ते जलसंवर्धन, जल व्यवस्थापन आणि पाण्याची गुणवत्ता या तीन क्षेत्रात केले जाते. आता पावेतो आपले सर्व काम हे जलसंवर्धन आणि गुणवत्ता या दोन क्षेत्रात प्रामुख्याने झालेले आहे. पाण्याचा पुरवठा कसा वाढवता येईल, नदी, नाल्यावर बंधारे कसे बांधायचे, तलाव कसे खोदायचे, जल साठ्यांतील गाळ कसा काढायचा व त्या द्वारे साठवण कशी वाढवायची , जल पुनर्भरण कसे करायचे या सारख्या विषयांवर भरपूर काम झाले आहे. हे आणखी होणे आवश्यक आहे. पण निदान या विषयाला दिशा तरी मिळाली आहे. तीच गोष्ट पाण्याच्या गुणवत्तेच्या संदर्भातही सांगता येईल. पाण्यातील प्रदूषण कमी करुन शुद्धता कशी वाढवायची यावरही बरेच काम झाले आहे. व चालू आहे. नदी नाल्यात होणारे प्रदूषण दूर करण्यासाठी बऱ्याच समाजसेवी संस्था काम करतांना दिसतात.

पण..........हा पणच फार महत्वाचा आहे. जल व्यवस्थापन या विषयाकडे आपले लक्ष जरा कमीच आहे. नद्यांवर आपण भरपूर धरणे बांधलीत. पाणी अडवले पण त्या अडवलेल्या पाण्याचा वापर करण्यात मात्र आपण कमी पडलोत. या अडवलेल्या पाण्यापैकी किती पाणी प्रत्यक्षात वापरले जाते हाही एक अभ्यासाचा विषय आहे. हा वापर वाढवण्यासाठी पाणी वापर संस्थांचे जाळे निर्माण करण्यात यावे या बद्दल मात्र आपण फारच निरुत्साही राहिलो. आजही ज्या पाणी वापर संस्था निर्माण झाल्या आहेत त्यांची परिस्थिती फारच हलाखीची आहे. जागतिक बँकेने आपले कान टोचल्यावर आपण जागे झालो आणि पाणी वापराच्या दृष्टीने आपले प्रयत्न सुरु झाले. पण दुर्दैवाने हे काम फारच बाल्यावस्थेत आहे असे खेदाने म्हणावेसे वाटते.

पाणी हे सामाजिक आणि आर्थिक बदलाचे साधन आहे असे जग मानते. हा बदल काही माणसांचा की सर्व समाजाचा याचे समाधानकारक उत्तर मात्र आपण शोधून काढलेले नाही. जलक्षेत्रात धन दांडगे हस्तक्षेप करीत आहेत, मन मानेल तसा पाण्याचा वापर करत आहेत, सरकारी यंत्रणाही ते स्वतःच्या बाजूला झुकवू शकतात. याचा परिणाम म्हणजे ज्या दुर्लक्षित समाजाला पाणी मिळायला पाहिजे तो मात्र या पाण्यापासून वंचित राहतो, श्रीमंत शेतकरी अधिक श्रीमंत होत आहेत आणि गरीब शेतकरी मात्र अत्यंत गरीबीकडे वळत आहेत, वेळ प्रसंगी आत्महत्या करत आहेत हा मात्र आपल्या अग्रक्रमावरील विषय नाही ही परिस्थिती मात्र सर्वत्र बघायला मिळते.

ही परिस्थिती बदलावी म्हणून जगाच्या मंचावर समन्यायी पाणी वाटपाची चर्चा सुरु झाली. जल क्षेत्रातील विद्वान या विषयावर मते मांडायला लागलेत. पाण्याचा विकास आणि व्यवस्थापन पाणी वापरणारे, नियोजन कर्ते आणि धोरण ठरविणारे यांच्या समन्वयातून झाला पाहिजे असे १९९२ साली डब्लिन येथे झालेल्या परिषदेत ठरविण्यात आले. हे ठरवत असतांना जो जोर देण्यात आला तो समन्यायावर देण्यात आला. भारताच्या जलनितीतही समन्वित विकासावर भर देण्यात आला आहे. त्यासाठी नदीचे खोरे आणि उपखोरे हे एक एकक मानून पाण्याचे नियोजन, विकास आणि व्यवस्थापन व्हावे असे प्रतिपादित करण्यात आले आहे. पण जागतिक ख्यातीचे जलतज्ज्ञ माननीय चितळे साहेब या बाबतीत एक पाऊल पुढे गेले आहेत. त्यांनी त्याही पुढे जावून क्षेत्र हा घटक मानला जावा असे मत मांडले आहे. ते निव्वळ मत मांडूनच थांबले नाही तर दक्षिण आशियातील देशात क्षेत्रिय जलसहभागिता (एरिया वॉटर पार्टनरशिप) ही संकल्पना रुजवण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

या पार्श्वभूमीवर श्री. विलासराव साळुंखे यांनी पाणी पंचायतच्या माध्यमातून ग्रामीण भागात पाण्याचे वितरण कसे व्हावे या संबंधात आपले विचार मांडले आहेत. पाणी हे कोणा एका व्यक्तीचे नसून त्याचेवर समाजाची सामायीक मालकी आहे आणि त्यामुळे पाण्यासंबंधात सर्वाचे समान हक्क असावेत असे परखड विचार त्यांनी मांडले. माणसी अर्धा एकराला पाणी आणि कुटूंबाचे पाच सदस्य पकडले तर प्रत्येक कुटूंबाला अडीच एकरासाठी पाणी असे सूत्र त्यांनी मांडले. यापेक्षाही जास्त जमीन शेतकऱ्याकडे असेल तर ती त्याने पावसाच्या पाण्यावर कसावी. या पाण्यावर ऊस, केळी अशी पिके न घेता हंगामी पिके घतली जावीत. या शिवायही काही तत्वे यासंबंधात त्यांनी मांडली आहेत. या सर्व मांडणीचा उद्देश समाजातील विषमता कमी व्हावी हा दिसतो.

त्यांच्या संस्थेने निव्वळ वैचारिक मांडणी केली असे नाही तर या मांडणीला प्रत्यक्षात उतरवण्याचाही प्रयत्न केला. त्यांच्या क्रियाशील काळात पुरंदर तालुक्यातील नायगाव परिसरात त्यांनी स्वतः प्रतिपादलेली योजना प्रत्यक्षात उतरवली. त्यांनी राबविलेल्या १०० योजनांत १५००० हेक्टर जमिनीला पाण्याचा लाभ मिळाला. जवळपास ८००० कुटूंबांनी यासाठी सहकार्य केले आणि त्यामुळे त्यांचेमध्ये आर्थिक बदल घडून आला. त्याच्या या प्रयोगाची दखल निव्वळ देशाच्या पातळीवर घेतली गेली असे नाही तर संपूर्ण जगात त्याची नोंद घेतली गेली. त्यांनी स्थापलेल्या ग्राम गौरव प्रतिष्ठानमार्फत सुरु केलेली पाणी पंचायत चळवळ आजही सुरु आहे.

**पृष्ठ क्रमांक १४ वर...............**



## अतिथी संपादकाचे मनोगत ...........

**श्री. सतीश देशमुख**
**मो : ९८८१४९५५१८**

महाराष्ट्रामध्ये जशी संतांची गौरवशाली परंपरा आहे, तसेच पाणी प्रश्नासाठी कार्य करणारे, अक्षरशः आपले आयुष्य वाहून घेणाऱ्या जलतज्ज्ञांचेही निस्वार्थी काम आहे. त्यांच्यापैकी एक विलासराव साळुंखे. त्यांचे मूलभूत विचार, तत्वे व कार्य नवीन पिढी पर्यंत पोंहचविण्यासाठी जलसंवाद मासिकाचा हा विशेषांक काढण्यात आला आहे.

पाणी प्रश्नांवर मंथन घडवून आणण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणारे जलसंवाद हे मासिक डॉ. दत्ता देशकर गेली १८ वर्षे सातत्याने व अखंडपणे प्रकाशित करीत आहेत. त्याचबरोबर जलोपासना दिवाळी अंक, २४ तास चालणारे जलसंवाद रेडिओ, यूट्युब वर साक्षरता अशा विविध माध्यमातून, शास्त्रोक्त माहिती द्वारे त्यांचे जलसाक्षरतेचे कार्य अहोरात्र सुरू आहे.

कितीही चांगल्या योजना आणल्या तरी त्या जनजागृती व त्यातून वाढणारा लोकसहभाग ह्यांची जोड दिल्या शिवाय यशस्वी होऊ शकत नाही. ते मोलाचे काम जलसंवाद ने केले आहे.

महाराष्ट्रातील १९७२ चा भीषण दुष्काळ काही दृष्ट्या इष्टापत्ती ठरला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण त्या निमित्ताने विलासराव साळुंखे यांच्या रुपाने दुर्मिळ संवेदनशील सामाजिक नेतृत्व उदयास आले. त्यांनी दुष्काळ निवारण्यासाठीच्या तात्पुरत्या उपाययोजना ऐवजी त्याचे मूळ शोधण्याचा सिद्धार्था प्रमाणे ध्यास घेतला होता. व त्यातूनच पाण्याचे वाटप प्रत्येक कुटुंबास किमान समान तत्वावर न्यायाने, हक्काने व कायद्याने मिळावे अशी मूलभूत मांडणी त्यांनी केली. ही संकल्पना म्हणजे आधुनिक जलविज्ञानाचे एक सूत्र व पायाच समजावे लागेल. त्यांनी स्थापन केलेल्या ग्राम गौरव प्रतिष्ठान – पाणी पंचायत चे व्हिजन बोलके आहे. ते खालील प्रमाणे.

गाव किंवा पंचक्रोशीतील पाणी, जमीन, जंगल आणि जैवविविधता यासारख्या नैसर्गिक सामायिक संपत्तीच्या संसाधनांचे समन्यायी वितरण आणि शाश्वत वापर सुनिश्चित करणे आणि अल्पभूधारक शेतकरी आणि भूमिहीन मजुरांना सक्षम करणे, ज्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावेल. पाणी, जमीन, पर्यावरण आणि जैवविविधता यांचे अकालनीय व अतूट असे नाते आहे. त्यांचा एकात्मिक विचार विलासरावांनी केला होता, हे विशेष.

जल व पर्यावरण क्षेत्रात प्रत्यक्ष कामाचा समृद्ध अनुभव असणाऱ्यांना व त्यांची वैचारिक बैठक पक्की आहे अशा व्यक्तींना आम्ही संपर्क साधून लेख लिहिण्याची विनंती केली. त्या मान्यवरांनी आपल्या व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून लेख दिले. त्यांचे मनापासून आभार! विलासरावांच्या कार्याबद्दलची त्यांची आत्मीयता त्यावरून दिसून येते. लेख मिळवण्यासाठी प्रसाद सेवेकरी आणि प्रशांत बोरावके यांनी मोलाचे सहकार्य केले.

हा अंक अत्यंत अभ्यासपूर्ण व वाचनीय मजकूराने सजला असून या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी तो नक्कीच मार्गदर्शक व संग्राह्य ठरेल असा विश्वास आहे. तसेच ह्यात मांडलेले विचार, कार्य, ध्येयधोरण व प्रयोग हे राज्यकर्ते, शासकीय आधिकारी यांनाही उपयुक्त ठरतील.

पाणी विषयावर काम करणाऱ्या सर्व जल तज्ज्ञांकडून एका प्रश्नाकडे पूर्णतः दुर्लक्ष झाले आहे, याची मला खंत आहे. माझ्या विविध लेखांमध्ये मी सातत्याने मांडणी केलेल्या विषयाचा, या निमित्ताने येथे पुनरुच्चार करतो. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरी ग्रामीण भागातील माऊलींना व शाळकरी विद्यार्थिनींना घराचा उंबरठा न ओलांडता, नळाने घरात अजूनही पाणी मिळत नाही. त्यांना २ ३ मैल जा– ये रपेट करावी लागत आहे. प्रत्येक व्यक्तीला पिण्याचे शुद्ध पाणी मिळाले पाहिजे याचा घटनेतील मूलभूत मानवी हक्कांमध्ये समावेश झाला पाहिजे. जल जीवन मिशन ची अंमलबजावणी युद्धपातळीवर झाली पाहिजे. खेड तालुक्यातील डोंगराळ भागातील एका गावातून आणलेल्या विहिरीचे पाणी तपासल्यानंतर लॅबने पिण्यासाठी योग्य नाही असा निष्कर्ष दिला आहे. या विशेषांकाच्या अतिथी संपादकाची जबाबदारी स्विकारून मी खारीचा वाटा उचलला आहे, याचा मला अत्यानंद होत आहे. विलासराव साळुंखे यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या जवळपास पोंहचण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. डॉ. दत्ता देशकर आणि सतीश खाडे यांच्या सकारात्मक सहकार्यामुळेच हे शक्य झाले.

**श्री. सतीश देशमुख, अतिथी संपादक**

# आमची भूमिका

## श्री. विलासराव साळुंखे



हजारो वर्षांचा सांस्कृतिक इतिहास असलेली आजची भारतीय समाजव्यवस्था अनेक स्थित्यांतरांतून घडलेली आहे. धर्म, जाती आणि वर्ण या आधारे या व्यवस्थेला काही वेगळे वैशिष्ट्य पण प्राप्त झालेले आहे. श्रध्दा आणि अंधश्रध्दा यांच्या खतपाण्यात समाजजीवनाची पाळेमुळे प्राचीन काळापासून खोलवर रूजलेली आहेत. आधुनिक विज्ञान आणि व्यवस्थापनाने या समाजव्यवस्थेत झपाट्याने बदल घडून येत असला, तरी त्याचा मूळ गाभा जुन्या रूढींतच गुंतलेला आहे. प्राचीन काळापासून ब्राम्हण, क्षणिय, वैश्य आणि शूद्र अशा वर्णव्यवस्थेद्वारे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष अशी व्यवस्था सर्वांसाठी असली, तरी प्रत्यक्षात मात्र संख्येने लहान असलेल्या संघटित समाजघटकाने बहुसंख्य विखुरलेल्या समाजाला आर्थिक विषमतेवर सतत नागवण्यातच धन्यता मानली आहे. याचा विपरित परिणाम बहुजन समाजाच्या आर्थिक ऱ्हासाबरोबरच सामाजिक व सांस्कृतिक मागासलेपणात झाला आणि प्रस्थापितांच्या राजकीय वर्चस्वामुळे तो सतत परावलंबीच पाहिला. मागील साडेचारशे वर्षात बाहेरून आलेले मोगल आणि इंग्रज राज्य करीत होते. १९४७ साली आपण स्वतंत्र झालो. तरी पण ही पिळवणुकीची व्यवस्था अबाधितच राहिली. जमिनीची विषम मालकी हा या व्यवस्थेचा एक महत्वाचा भाग होता आणि आजही आहे.

त्यामुळे या राष्ट्रात गेली पन्नास वर्षे लोकशाही जरी नांदत असली आणि राष्ट्रीय उत्पन्नात लक्षणीय वाढ झालेली दिसत असली, तरी त्याचा परिणाम, या उत्पन्नाची विषम वाटणी होवून वरचा १५ टक्के समाज अधिकाधिक श्रीमंत होण्यात व बाकी उरलेले तुलनात्मकदृष्ट्या अधिकाधिक गरीब होण्यात झाला. जागतिक व्यापार, उद्योगीकरण आणि शहरीकरण यामुळे श्रीमंत आणि गरीब यामधील दरी अधिकच रूंदावत गेली. पर्यावरणाचा ऱ्हास हा त्याचा एक दृश्य परिणाम आहे. दुर्बल घटकांच्या विकासासाठी भोवतालच्या नैसर्गिक साधनसामग्रीवर आणि वापरावर त्यांचा ताबा असणे आवश्यक आहे. पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे त्यांचा जगण्यासाठी चाललेला झगडा दिवसेंदिवस अधिक अवघड होत आहे. त्यांच्यासाठी जगणे आणि टिकून राहणे एक दिव्यच आहे. प्रगती आणि विकास घडला आहे, पण त्याचा लाभ थोड्यांनाच होवून परिणामी बुहसंख्याकांचे शोषणच झाले आहे. अधिकाधिक वस्तू संपादण्याच्या वरच्या वर्गाच्या हव्यासाने ही प्रगती आणि विकास हा बहुजन समाजाला हानिकारकच झाला आहे. वरच्या वर्गाने आपल्या इच्छेप्रमाणे निसर्गाचा वापर करून त्याचे वाटोळे केले आहे. निसर्गाशी एकरूप होवून जुळते घेत जगण्याऐवजी त्यावर मात करणे म्हणजे विकास करणे असे त्यांना वाटते आहे. सत्तेचे वाढते केंद्रीकरण होत असून, लोकशाही शब्दाचा अधिक वापर होतो, पण प्रत्यक्षात ती कमीत कमी अनुभवली जात आहे. निसर्गवैविध्याच्या विविध पैलूंची हानी म्हणजे आजचा विकास झाला आहे.

समाज त्याच्या उदरनिर्वाहाकरता सतत प्रयत्नशील राहून अनेक गोष्टींची वस्तूंच्या स्वरूपात निर्मिती करीत असतो. आधुनिक विज्ञानाचा वापर होईपर्यंत ह्या वस्तूंची निर्मिती ही मुख्यत्वाने नैसर्गिक साधनसामग्री – जमीन आणि पाणी यांच्या आधाराने होत होती. विज्ञान व तंत्रज्ञानामुळे भौतिक संपत्तीत मोठ्या प्रमाणात सतत वाढ सुरू झाली. औद्योगिक वस्तू निर्माण करण्याचे तंत्रही झपाट्याने प्रगत होत गेले. त्याचे भव्य स्वरूप आपल्याला मोठ्या शहरांची नागरी व्यवस्था उपभोगत असलेल्या जीवन पध्दतीत दिसते. मोठ्या प्रमाणात सतत वाढता ऊर्जेचा वापर हा बदलत्या समाजव्यवस्थेच्या प्रगतीचा एक निर्देशांक ठरला आहे. उद्योग, व्यापार आणि सेवा या तीन क्षेत्रांत ही नागरी व्यवस्था स्वत:चा रोजगार मिळवते. अधिकाधिक संपत्ती निर्माण करून त्याचा अधिकाधिक उपभोग घेणे हे या नागरी उपभोगवादी अर्थव्यवस्थेचे मुख्य लक्ष्य आहे. आधुनिक अर्थशास्त्राच्या तत्वप्रणालीप्रमाणे चढत्या आर्थिक उलाढाली ह्या आर्थिक संपन्नता निर्माण करण्यासाठी आवश्यक आहेत. हे करीत असता ग्रामीण भागात राहात असलेल्या ७० टक्के लोकसंख्येच्या मूलभूत जीवनसाधनांचा विकास त्यांचे जीवन अधिक समृध्द आणि सुखावह कसे होईल, याकडे लक्ष देण्याची नागरी संस्कृतीला गरज वाटत नाही. या संस्कृतीचे संबंध आज आपल्या ग्रामीण बांधवांपेक्षा जागतिक पातळीवर आधुनिक जगाशी व्यापार, उद्योग आणि सेवा याद्वारे जास्त गुंतले आहेत. नागरी संस्कृतीचा विकास, किंबहुना ग्रामीण समृध्दीतून नागरीकरणाची नैसर्गिक प्रक्रिया व्हायलाच हवी. ग्रामीण समृध्दी आणि पर्यावरणाची जोपासना या भक्कम पायावर विकेंद्रीत नागरीकरणाची प्रक्रिया आधारलेली असणे आवश्यक आहे. शहरीकरणाची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी सुध्दा ग्रामीण भारतीय व्यवस्था ही सामाजिक आणि आर्थिक विषमतेने नाडलेली होतीच, त्यामध्ये अधिक भर ही वाढत्या केंद्रीत नागरी व्यवस्थेमुळे पडत आहे. निरनिराळ्या विचारप्रणालींचे राजकीय पक्ष सत्तेवर आले, तरी या व्यवस्थेमध्ये काहीही बदल घडत नाही.

गेल्या दहा वर्षात अर्थव्यवस्थेचे राष्ट्रीय धोरण हे खुल्या अर्थव्यवस्थेकडे आणि खाजगीकरणाकडे झुकल्यामुळे परदेशी भांडवली गुंतवणूक वाढत आहे. परकीय चलनाची गंगाजळीही सतत वाढत आहे. याचा परिणाम नागरी व्यवस्थेत राहणाऱ्या समूहाच्या आर्थिक प्रगतीत

झाला आहे, पण या प्रगतीत ग्रामीण भागाचे व नैसर्गिक साधनांचे शोषण होवून पर्यावरण ढासळते, याची जाणीव व जबाबदारी या व्यवस्थेला वाटत नाही. लोकशाहीच्या माध्यमातून सत्ता मिळवणे आणि टिकवणे याकरता सर्वच राजकीय पक्षांना विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांत गरिबांना लवून मुजरा करावा लागतो. निवडून येण्याकरता सवंग लोकप्रियतेच्या आर्थिक सवलती देण्यात आज सर्व पक्षांची मोठी चढाओढ लागली आहे. उद्योग आणि व्यापार यांच्या वाढत्या करांमधून मिळणाऱ्या सरकारी उत्पन्नातून अशा सवलती देण्याचा राजकीय पक्षांचा प्रयत्न असतो.

ग्रामीण भागातील गरिबांना त्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी मूलभूत सोयी निर्माण करण्याचा लांब पल्ल्याचा मार्ग स्वीकारण्याचे धाडस व दूरदृष्टी मात्र कोणत्याही राजकीय पक्षात नाही. अत्यंत प्रगत अशा महाराष्ट्र राज्याची नागरी लोकसंख्या ही आज ४० टक्के आहे आणि २०१० सालात ती ५० टक्के होईल. एवढ्या झापट्याने शहरीकरण झाले, तरी ग्रामीण महाराष्ट्राची १९६० साली २.८ कोटी असलेली लोकसंख्या आज ५.२ कोटी झाली आहे. याचा अर्थ गेल्या चाळीस वर्षांत ग्रामीण महाराष्ट्राची लोकसंख्या जवळजवळ दुप्पट वाढली. परंतु ह्या लोकसंख्येचा राज्याच्या उत्पादनातील वाटा कमीच झाला आहे. चाळीस हजार खेड्यांत विखुरलेल्या या ५.२ कोटी लोकसंख्येला त्यांचे जीवनमान वाढवण्याचा एकच पर्याय आहे. तो म्हणजे जमीन आणि पाणी यांचे संवर्धन करून पर्यावरणाशी हानी न करता चिरस्थायी विकास साधण्याचा. अनेक गोष्टींची वाटणी आपणाला समजू शकते. पण पाण्याची वाटणी ही समजण्यास कठीण वाटते आणि व्यवहारात अमलात आणणे कितपत शक्य आहे, असेच वाटते. भारतातील बहुतांशी ग्रामीण भागात पाण्याचे योग्य नियोजन व न्याय्य वाटप यावर आधारित विकास – प्रक्रिया आखली, तरच ग्रामीण अर्थव्यवस्था शाश्वत व गतिशील होवू शकेल. त्यामधून विकेंद्रीत नागरीकरणाची प्रक्रिया सुरू होवून, तरूणांसाठी उत्पादक रोजगारनिर्मिती होईल. पाण्याच्या न्याय्य वाटणीबरोबर जमिनीचे फेरवाटप व फेररचना पण करण्याची गरज आहे. ग्रामीण विकासाची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जडणघडण पाणी आणि जमीन यांच्या न्याय्य वाटपावरतीच होईल. आर्थिक सिध्दांत, राजकीय तत्वप्रणाली, ग्रामीण, सामाजिक पुनर्रचना आणि आधुनिक विज्ञानाची जोड या सर्वांचा विचार जलसंपत्तीच्या न्याय्य वाटपाच्या सूत्राने कसा साकार होईल.

*****




परिसरातील वृक्ष संपदा



वृक्ष संवर्धानासाठी सुरु केलेली नर्सरी

# समन्यायी पाणी वाटपाचे दारिद्र्य निर्मूलनाचे अर्थकारण

**श्री. आनंदरावदादा पाटील - मो : ९८२२०५३६७७**



भारताच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आपण साजरा करीत आहोत. पण या ७५ वर्षांत आपल्या देशातील दारिद्र्याचे निर्मूलन करण्याचा कार्यक्रम खऱ्या अर्थाने एकाही राजकीय पक्षाने हाती घेतला नाही. राज्य घटनेने प्रत्येक भारतीय नागरिकाला आर्थिक न्याय देण्याचे वचन दिले आहे. या राज्य घटनेची शपथ घेऊनच निवडून येणारे राजकीय पक्ष गेली ७५ वर्षे राज्य करीत आहेत. आपल्या देशापेक्षा प्रचंड दारिद्र्य असलेल्या चीनने तेथील नागरिकांना दारिद्र्यापासून मुक्ती मिळवून दिली आहे. चीनचा कारभार कम्युनिस्ट हुकूमशाहीचा आहे आणि आपला देश जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून राज्यकर्ते मिरवत असतात. पण ज्यांना दोनवेळा जेवायला मिळणे कठीण असते, असे ३६ कोटी दारिद्र्य रेषेखालचे लोक आणि हातावर पोट असणारे ४४ कोटी गरीब लोक या देशात आहेत, याचे त्यांना फारसे गांभीर्य वाटत नाही. देशातील १४० कोटी लोकसंख्येपैकी फक्त ६० कोटी लोकच अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य याबाबतीत स्वयंपूर्ण झालेले आहेत. त्यापैकी काही कोट्याधीश व अब्जाधीश झाले आहेत. पण देशाला दारिद्र्यमुक्त करण्यासाठी २० वा २५ वर्षांचा एखादा कार्यक्रम हाती घेण्याचा विचारसुद्धा राज्यकर्ते पक्ष करीत नाहीत, हे देशाचे दुर्दैव आहे.

ज्या देशातील जनता मोठ्या प्रमाणावर म्हणजे ५० टक्केपेक्षा अधिक शेतीवर अवलंबून आहे, त्या देशातच दारिद्र्य आहे, असे जागतिक बँक म्हणते. शेतीमालाची निर्मिती करणाऱ्या शेतकऱ्याला त्याचे २० रूपये मिळतात तर त्याची वाहतूक, व्यापार, दलाली, प्रक्रिया इत्यादी करून ग्राहकाला तोच शेतमाल १०० रूपयाला विकला जातो. ही स्थिती बदलण्यासाठी बँक काही उपाय सुचविते. पण त्या पद्धतीने फार प्रगती झाल्याचे कोठे दिसत नाही. देशातील गरीब व श्रीमंतांमधील दरी वेगाने वाढत आहे. कोरोना काळात देशातील ८४ टक्के कुटुंबांच्या उत्पन्नात लक्षणीय घट झाली असताना देशातील अब्जाधीशांची संख्या १०२ वरून १४२ वर पोहोचली आहे. गेल्या चार-पाच वर्षांत श्रीमंतांवरील संपत्तीकर रद्द करण्यात आला, तर कॉर्पोरेट करही ३० टक्क्यांवरून २२ टक्क्यांवर आणला आहे. साहजिकच कोरोना काळात भारतातील अब्जाधीशांच्या संपत्तीत दुपटीने वाढ झाली आहे. दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने वरील आकडेवारी नुकतीच जाहीर केली आहे. त्यावरून शासनाच्या मनात असेल तर दारिद्र्य निर्मूलनासाठी देशातच किती प्रचंड निधी उभा करता येईल हे दिसून येते.

**१. समन्यायी पाणी वाटप - दारिद्र्य निवारणाची गुरूकिल्ली**

शेतीसाठी उपलब्ध पाण्याचे चरितार्थाच्या शेती व्यवसायासाठी समन्यायी वाटप हा दारिद्र्य निर्मूलनाचा सर्वात जवळचा मार्ग आहे, असे समन्यायी पाणी हक्क परिषद, पुणे या संस्थेचे ठाम मत आहे. पिण्याचे, गुरा-ढोरांचे, घरगुती वापराचे आणि लहान - मोठ्या उद्योगधंद्यांचे पाणी वगळल्यानंतर उरलेले पाणी चरितार्थासाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांना माणसी दीड एकर म्हणजेच कुटुंबाला अडीच एकर याप्रमाणे द्यावे लागेल. पाण्याचे नियोजन करण्यासाठी प्राथमिक पाणलोट हा तळचा घटक धरून त्यातील सर्व प्रकल्पांच्या व जलसंधारण तलावांच्या पाण्याचा, भूजलाचा आणि मोठ्या धरणाच्या पाण्याचा मिळणारा हिस्सा असा एकूण पाण्याचा हिशेब करावा. प्राथमिक पाणलोटातील सर्व गावांना लोकसंख्येच्या प्रमाणात या एकूण पाण्याचे गाववार समान वाटप करावे. जगण्यासाठी जी कुटुंबे शेतीवर अवलंबून आहेत, त्यांची प्रत्येक गावातील संख्या, तेथील वहिवाटीखालील किती जमीन पाण्याखाली आणता येते, याचा ताळमेळ जमवून कुटुंबवार जमीन व पाणी याचे समन्यायी वाटप निश्चित करावे. पाणी घेणाऱ्या सर्वांची पाणी वापर संस्था स्थापन करून, गाव शिवारातील उपलब्ध पाण्याचे नियोजन व व्यवस्थापन करावयाचे आहे. समन्यायी पाणी वाटपाचे काम गावातील प्रतिष्ठित ज्येष्ठ ग्रामस्थांच्या पाणी पंचायतीच्या सहकार्याने करावे. कुटूंबवार जमीन व पाणी यांचे नियोजन ग्रामसभेपुढे मान्यतेसाठी ठेवावे. मूळ तत्वाला बाधा न येता सुचवलेल्या काही फेरबदलासह मान्यता घेऊन संस्थेने कार्यवाहीस प्रारंभ करावा. शासनाची मदत आणि लाभार्थींचा हिस्सा या निधीतून पाइप्ड इरिगेशन नेटवर्कने आणि सूक्ष्मसिंचनाने नियोजित कुटुंबांना आणि क्षेत्राला पाणी देणारी यंत्रणा उभी करावयाची आहे.

**२. राज्यातील प्राथमिक पाणलोटांचे वर्गीकरण**

राज्यातील उपलब्ध पाणी १५३५ प्राथमिक पाणलोटामध्ये सिंचनाच्या विस्तारासाठी कसे उपलब्ध करावयाचे याचा विचार करण्यासाठी पाणलोटाचे प्रकार आणि तेथील पाणी उपलब्धतेची परिस्थिती यांची माहिती घेतली पाहिजे. राज्याच्या भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने आखलेल्या १५३५ पाणलोटांपैकी ११२७ पाणलोट हे सुरक्षित आहेत म्हणजेच तेथील भूजलाचा उपसा ७० टक्क्यांपेक्षा कमी आहे. आणि ४०४ पाणलोट शोषित म्हणजेच भूजलाच्या ७० टक्केपेक्षा अधिक उपसा असणारे आहेत. याशिवाय अमरावती - अकोल्यातील ४ पाणलोट गुणवत्ता बाधित आहेत.

सुरक्षित पाणलोटांचे १) विपुलतेचे २) स्वयंपूर्ण आणि ३) तुटीचे असे तीन प्रकार करता येतात. त्यापैकी तुटीचे पाणलोट हे विपुलतेच्या पाणलोटातून पाणी घेऊन स्वयंपूर्ण बनू शकतात. परंतु

सुरक्षित ११२७ पाणलोटांची वर्गवारी शासनाने केलेली नाही. ती करणे आवश्यक आहे. शोषित ४०४ पाणलोटापैकी १) ७० टक्के ते ९० टक्के भूजल उपसा असणारे २९१ अंशतः शोषित २) ९० ते १०० टक्के उपसा असणारे ४६ शोषित आणि ३) १०० टक्के पेक्षा जास्त उपसा असणारे ६७ अतिशोषित अशी वर्गवारी उपलब्ध आहे. कार्यकर्त्यांनी जिल्ह्याच्या वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयातून आपल्या पाणलोटाबाबतची ही माहिती घ्यावी.

**३. जलनियोजनातील महत्त्वाचा तळचा घटक – प्राथमिक पाणलोट**

राज्याच्या डॉ. चितळे आयोगाने प्राथमिक पाणलोटांना नदीखोरे आणि उपनदीचे खोरे या खालचा तिसरा जलनियोजनाचा घटक म्हणून महत्वाचे स्थान दिले असून नियोजन व व्यवस्थापनासाठी प्रत्येक पाणलोटाची स्वतंत्र समिती असावी अशी शिफारस १९९७ मध्ये केली आहे. पण आजवर राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाने भूजलाची माहिती देण्याखेरीज अधिक महत्त्व पाणलोटांना दिलेले नाही. वास्तविक राज्याच्या १५३५ पाणलोटांपैकी प्रत्येक पाणलोटातील भूजलाबरोबरच जलसंधारण तलावातून आणि जलसंपदा विभागाच्या प्रकल्पातून व उपशातून मिळणाऱ्या पाणीवाट्यासह प्रत्येक प्राथमिक पाणलोटातील पाण्याचा स्वतंत्र हिशेब जलसंपदा विभागाने सादर केला पाहिजे. तसेच सुरक्षित पाणलोटांची वर्गवारी दिली पाहिजे. सिंचन चळवळीतील कार्यकर्त्यांनी अशी मागणी शासनाकडे केली पाहिजे. तसेच आंदोलनाच्या विषयात या मागणीचा समावेश केला पाहिजे.

**४. चिकोत्रा प्राथमिक पाणलोटाच्या जल नियोजनाचा नमुना प्रकल्प**

केआर ७४ क्रमांकाच्या ५२ गावांच्या सुरक्षित पण तुटीच्या चिकोत्रा पाणलोटात खात्रीने पूर्ण होणाऱ्या जलसंपदाच्या दोन प्रकल्पातून आणि २० जलसंधारण तलावातून एकूण ६,३४,१४,००० घनमीटर पाणी उपलब्ध आहे आणि पाणलोटातील लोकसंख्येला माणसी ७९७.५ घ. मी. पाणी उपलब्ध आहे असा अहवाल जलसंपदा विभागाने २००१ साली दिला आहे. याशिवाय पाणलोटातील ५२ गावांना लोकसंख्येच्या प्रमाणात गाववार किती घ. मी. पाणी मिळू शकते याचा तक्ता २००१ मध्येच मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत विभागाने सादर केला होता. यामध्ये भूजलाचा समावेश केल्याने किती अधिक पाणी उपलब्ध होईल ही माहिती विभागाने दिली पाहिजे. पाण्याच्या समन्यायी वाटपाच्या २००१ पासून आजपर्यंत रखडलेल्या चिकोत्रा पाणलोटातील पाच गावांच्या पथदर्शक प्रकल्पाचे टेंडर काढण्याचे सध्याच्या राज्य शासनाने मान्य केले आहे. संपूर्ण पाणलोटाला पाइप्ड इरिगेशन नेटवर्कचा आणि ड्रिप इरिगेशनचा प्रस्ताव परिषदेने २०१६ लाच विभागाकडे सादर केला आहे. त्याशिवाय चरितार्थाच्या शेतीसाठी प्रत्येक गावची कुटुंबवार माहिती परिषदच शासनास देणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्वच पाणलोटातील उपजीविकेच्या शेतीसाठी पाणी उपलब्धतेचे नियोजन कसे करता येईल याचा एक नमुना उपलब्ध होईल.

**५. आधी पुनर्वसन, मगच चिकोत्रा धरण – एक चमत्कार**

आधी पुनर्वसन, मग धरण अशी घोषणा करून १९९६ साली सहा महिन्यात चिकोत्रा धरण व पुनर्वसन कृती समितीच्या कार्यकर्त्यांनी लाभार्थ्यांकडून ३५० एकर जमीन प्रकल्पग्रस्तांसाठी दिल्यामुळे त्यांच्याचं हस्ते धरणाचे काम सुरू झाले आणि तीनच वर्षात ते पूर्ण झाले. ज्या प्रकल्पग्रस्तांनी धरणस्थळाच्या सर्व्हेला विरोध करताना शेकडोच्या संख्येने जिल्ह्यातील सर्व तुरूंग भरले होते त्यांनी केलेले हे सहकार्य म्हणजे एक चमत्कारच होता. १५ जानेवारी २००० रोजी जलक्रांतिचे पितामह इजि. विलासराव साळुंके आणि ना. डॉ. पतंगराव कदम यांनी बोलावलेल्या राज्य पाणी परिषदेने चिकोत्रा पाणलोटातील पाण्याच्या समन्यायी वाटपाच्या ५२ गावांच्या प्रकल्पास पाठिंबा दिला. पण २०२० पर्यंत राज्य शासनाने दाद दिली नाही. सध्याच्या राज्यशासनाने ५ गावांचा पथदर्शक प्रकल्पाचे ५९ कोटी ९ लाखांचे टेंडर काढण्याची कारवाई सुरू केली आहे. माणशी अर्धा एकर पाणी या पद्धतीने चरितार्थाच्या शेतीला पाणी देण्याचे काम लवकरच सुरू होत आहे.

**६. पाणी सर्वांचे पण जमीन खासगी मालकीची**

पिण्याचे, घरगुती वापराचे व छोट्या व्यवसायांचे पाणी सर्वांना हक्काने मिळते. पाणी खासगी मालकीचे नसते. चरितार्थाच्या शेती व्यवसायासाठी सर्व कुटुंबांना ते हक्काने मिळाले पाहिजे. पण जमीन सर्वच शेतकरी कुटुंबांकडे नसते. पाण्याचे समन्यायी वाटप करताना भूमिहीन आणि अल्पभूधारक कुटुंबांना गावाने एकूण दोन ते अडीच एकर जमीन कोरडवाहू खंडाने मिळवून दिली पाहिजे. पाण्यासाठी होणारा खर्च लाभार्थी पाणी मालकाने दिला पाहिजे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान योजनेखाली दोन ते अडीच एकर कोरडवाहू जमीन खरेदी करून शासनाने मागासवर्गीय कुटुंबांना दिली पाहिजे. ही कुटुंबे समन्यायी पाणी वाटप योजनेतून सिंचनासाठी पाणी मिळवतील.

**७. मृदसंधारण, जलसंधारण व शेततळी**

सगळ्याच पाणलोटात मृदसंधारण व जलसंधारण ही कामे आवश्यक असली तरी तिन्ही प्रकारच्या ४०४ शोषित व ११२७ सुरक्षित पैकी तुटीच्या पाणलोटात ती अग्रक्रमाने पूर्ण करणे आवश्यक आहे. आदर्श गावच्या चराईबंदी, कुऱ्हाड बंदी, नसबंदी, नशाबंदी, लोटा बंदी, बोअरबंदी व श्रमदान या सप्त सूत्रीचे पालन प्रत्येक गावात आवश्यक आहे. माथा ते पायथा पाणलोट व्यवस्थापनाची कामे पूर्ण करीत असताना ओढ्याच्या आधाराने व अन्य योग्य ठिकाणी शक्य तितकी शेततळीही घेणे अत्यावश्यक आहे. या सर्व कामासाठी शासनाचा आवश्यक निधी उपलब्ध झाल्यावर लागणारे श्रमदान गावकरी उत्साहाने करतात असा अनुभव आहे.

राज्यात ४२,००० गावे आणि ६०,००० लघुपाणलोट आहेत. या लघू पाणलोटात माथा ते पायथा जलसंधारणाची कामे करून पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे आणि भूजलाची पातळी वाढवणे शक्य होते. सुरक्षित पाणलोटात पावसाचे पाणी, कालव्याचे पाणी आणि जलसंधारणाचे पाणी यामुळे भूजल अधिक प्रमाणात उपलब्ध झाल्याने सिंचनासाठी ७० टक्क्यांपेक्षा अधिक भूजल उपसण्याची गरज वाटत नाही. तुटीच्या सुरक्षित पाणलोटात जलसंधारणाच्या कामाबरोबरच जवळच्या विपुलता असणाऱ्या पाणलोटातून किंवा उपनदीखोऱ्यातील अतिरिक्त पाणी आणता येते. मात्र शोषित पाणलोटामध्ये जलसंधारण कामे करून किमान आठमाही सिंचनासाठी किती पाणी मिळवता येईल हे पाहून आणि पावसाळ्यात मोठ्या धरणांचे पाणी आणून प्रकल्प आराखडा बनवावा लागेल.

**८. पावसाळ्यात धरणातील पाणी सोडण्याचे नियोजन**

पूरनियंत्रणासाठी धरणातील पाणीसाठे १ जूनला १० टक्के ठेवून बाकीचे पाणी सोडून द्यावे, जुलैअखेर पाणीसाठा ५० टक्के, सप्टेंबर अखेर ७० टक्के आणि ऑक्टोबर अखेर १०० टक्के ठेवावा अशी जलआयोगाची शिफारस आहे (दै. पुढारी दि. ०८/११/२०२१). हे सोडून द्यावयाचे पाणी उजनी, जायकवाडी या धरणांमध्ये आणि दुष्काळी भागातील धरणामध्ये किमान खरिपाच्या पिकासाठी पुरेल इतके साठवावे. काही शोषित पाणलोटात किमान आठमाही सिंचनासाठी याचा निश्चित उपयोग होईल.

**९. सिंचन क्षेत्राच्या विस्तारासाठी पाइप्ड इरिगेशन नेटवर्क व सूक्ष्म सिंचन**

प्राथमिक पाणलोटातील वरील सर्व प्रयत्नानी उपलब्ध होणारे पाणी शक्य तेथे बारमाही पण किमान आठमाही म्हणजे दोन पिकांना आणि जास्तीत जास्त शेतकरी कुटुंबांना देता यावे यासाठी सिंचन क्षेत्राचा जास्तीत जास्त विस्तार करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्या पाणलोटातील लहान – मोठे सर्व जलाशय एकमेकांशी पाइपने जोडून व गावच्या जास्तीत जास्त क्षेत्राला गावचा पाण्याचा वाटा पाइपनेच नेऊन ठिबक सिंचनाने तो पिकाच्या मुळाशी पोहोचेल अशी व्यवस्था करावी लागेल. अर्थात गावाच्या पाण्याचे समन्यायी पाणी वाटपाचे नियोजन व व्यवस्थापन हे गावच्या पाणीवापर संस्थेने करावयाचे आहे. पाईप इरिगेशन नेटवर्कसाठी केंद्राचे अनुदान ९० टक्के व राज्याचा हिस्सा १० टक्के असतो. तसेच सूक्ष्म सिंचनासाठी राज्यशासन ८० टक्के अनुदान आणि लाभार्थी शेतकऱ्यांचा हिस्सा २० टक्के असतो. पाण्याच्या उपलब्धतेनुसार काही क्षेत्रास स्प्रिंकलरने किंवा रेनगनने पाणी देण्याची व्यवस्था करावी लागेल.

**१०. गुंतवणूक करताच प्रचंड रोजगार निर्मिती व सहा महिन्यातच प्रचंड परतावा सुरू करणारा प्रकल्प**

शस्त्रास्त्र कारखान्यासाठी किंवा अणुबाँब निर्मितीसाठी परदेशातून मोठे कर्ज काढले तर या गुंतवणुकीतून परतावा शून्य असतो आणि परतफेडीचा फास गळ्यात अडकतो. धरणाच्या बांधकामाच्या कर्जातून उभारणीसाठी आणि शेतात पाणी नेण्यासाठी लागणारा वेळ यामुळे परतावा मिळण्यास वेळ लागतो. मोठे लांबचे रस्ते, रेल्वे लाइन पूर्ण होण्यासाठी लागणाऱ्या वेळेमुळे गुंतवणुकीचा परतावा यायला वेळ लागतो. पण समन्यायी पाणी वाटप हा प्रकल्प आधीच गुंतवणूक झालेल्या जलप्रकल्पाचे आणि तलावांचे पाणी शेतात विस्तृत प्रमाणावर पोहोचवण्याचे काम अल्पकालीन असते. शेतात पाणी पोहोचवण्यासाठी आणि सूक्ष्म सिंचनासाठी गावाच्या प्रकल्पाचे टेंडर क वर्गाचे असते. कंत्राटदाराने शेतात पाणी पोहोचविल्यानंतर शासन त्याना ८० टक्के रक्कम देते. त्यापैकी २० टक्के लाभार्थ्याने दिलेले असतात. पाणी देणारी यंत्रणा आणि ठिबक योजना समाधानकारक चालत असल्यास एक वर्षाने कंत्राटदाराला उर्वरित २० टक्के शासन देते. उद्योगधंद्यात एका रोजगारासाठी कोटीची गुंतवणूक करावी लागते. पण या प्रकल्पात दोन–अडीच लाखाची गुंतवणूक करताच एक रोजगार निर्माण होतो आणि सहा महिन्यातच पहिले पीक येताच प्रचंड परतावा सुरू होतो. भूमिहीन, अल्पभूधारक, खंडकरी आणि जगण्यासाठी शेती करणारे जमीन मालक शेतकरी यांच्या स्वतःच्या किंवा खंडाच्या जमिनीवर प्रकल्पांचे पाणी




पडल्यानंतर सहा महिन्यात ते पहिले पीक काढतील आणि बाजारात न येणारा मोठा वर्ग बाजारातील आवश्यक माल खरेदी करू लागेल. त्यामुळे अर्थचक्र गतिमान होईल आणि शहरातील बेकारी कमी होऊ लागेल. पाणीपट्टी खेरीज इतर करांचे शासनाचे उत्पन्न वाढू लागेल. हा परतावा परत फेडीच्या हप्त्यापेक्षा कितीतरी जास्त असेल. त्यामुळे प्रत्येक नागरिक सक्षम होईल आणि भारत समृद्ध राष्ट्र बनेल.

**११. पर्यावरणाचे संवर्धन, बेकारीचे निर्मूलन, दारिद्र्यापासून मुक्ती आणि सर्वांसाठी समृद्धी**

देशांमध्ये समन्यायी पाणी वाटपाद्वारे ज्या गतीने गुंतवलेल्या भांडवलावर मोठा परतावा मिळेल असा दुसरा कोणताही पर्याय नाही. या प्रकल्पासाठी कितीही कर्ज जागतिक बँक, आशियाई बँक, जी–७ राष्ट्रे यांच्याकडून घेतले तरी देशाची समृद्धी प्रचंड प्रमाणात वाढणार आहे. आपल्या देशावर सध्या ५८१ अब्ज डॉलरचे कर्ज आहे. पण चीनवर १३,००९ अब्ज डॉलरचे परकीय कर्ज आहे, हे कोणाला खरे वाटणार नाही. परतफेडीच्या वार्षिक हप्त्यापेक्षा या कर्जातून अनेक पटीचा परतावा मिळणारे प्रकल्प हाती घेतल्याने चीन अनेक देशांमध्ये शेकडो–हजारो कोटी गुंतवून त्यांना आपल्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न करू शकतो आणि जगात सर्वात श्रीमंत अमेरिकेला चढाओढीत मागे टाकतो. उपजीविकेच्या शेतीसाठी सर्व शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी व सिंचन विस्तारासाठी अवाढव्य निधी उभारला तर २० – २५ वर्षात प्रत्येक नागरिक सक्षम होईल आणि देश चीन – अमेरिका यांच्या पुढे जाईल. पण राज्यकर्त्यांनी धाडस दाखवले पाहिजे. विस्तृत सिंचनाने पर्यावरणाचे संवर्धन होईल आणि बेकारीचे निर्मूलन होईल. दारिद्र्य नष्ट करण्यास चीनला ५० वर्षे लागली पण आपले नागरिक २०/२५ वर्षातच दारिद्र्यापासून मुक्त होतील आणि देशातील सर्वांना प्रचंड समृद्धी लाभेल.

# समन्यायी पाणीवाटप - मुक्त चिंतन

**डॉ.दि.मा.मोरे**

**मो : ९४२२७७६६७०**



गावपातळीवर केवळ पाण्याचा साठा (बंधारा, पाझरतलाव, लघुतलाव, विहीर इ.) करून पाणी उपलब्ध करून देऊन जनतेची दुष्काळातून मुक्तता होत नाही. पाण्याचा वापर करणारी जमीन आणि त्याचा लाभ मिळविणारे मनुष्यबळ याच्या तुलनेने उपलब्ध पाणी अवर्षणग्रस्त क्षेत्रात खूपच कमी असते आणि जे असते, त्याचा फायदा मूठभर मोठ्या शेतकऱ्यांनाच मिळत असतो. पाझर तलावाच्या अवतीभवती ज्यांच्या विहीरी असतात, त्या विहीर मालकांनाच त्या पाण्याचा लाभ होतो. इतरांना मात्र होत नाही. तेच जास्त श्रीमंत होतात, त्यातून जास्तीची जमीन सिंचनाखाली आणतात आणि ऊसासारखे जास्त पाणी घेणारे पीक घेतात. याचाच अर्थ श्रीमंत अधिक श्रीमंत होतो आणि अशा लाभापासून वंचित असणारे अधिक गरीब होतात. म्हणूनच मानवी कौशल्याने पाण्याचे साठे निर्माण करण्याबरोबरच त्याच्या वाटपातही न्यायीपणा आणणे हे तितकेच महत्त्वाचे ठरते. यातूनच पाण्याचे वाटप, त्या खोऱ्यातील, लाभक्षेत्रातील माणसाच्या (जमिनीच्या नाही) प्रमाणात होणे न्यायोचित ठरते. हा विचार प्रबळ ठरला आणि त्यातूनच 'माणशी अर्धा एकर जमिनीला पाणी' देणं आवश्यक आहे, हे सूत्र पुढे आले.

पाणी पंचायतने निश्चित केलेली सूत्र खालीलप्रमाणे आहेत.

१. अशा योजना (उपसा सिंचन) सामूहिक तत्त्वावरच राबविल्या जातील. एका व्यक्तीकरिता नाही.

२. योजनेमध्ये सुरूवातीपासूनच लाभधारकाचा पूर्ण सहभाग राहील.

३. माणसी अर्धा एकर जमिनीला पाणी, याप्रमाणे पाण्याचे वाटप दरडोई ठरेल. ५ माणसांचं एक कुटुंब असा हिशोब केला जाईल.

४. प्रत्येक कुटुंबाला किमान अडीच एकर जमिनीसाठी पाणी मिळेल. उर्वरित जमीनीवर पावसाच्या पाण्यावर शेती करावी.

५. केळी, ऊस यांसारखी बारमाही पाणी लागणारी पिके घेतली जाणार नाहीत. इतर हंगामी पिकेच घेतली जातील.

६. पाणलोट क्षेत्र विकासाच्या आधारे उपलब्ध होणाऱ्या पाण्यावर गावातील भूमिहिनांना पण पाण्याचा हक्क राहील. मोठ्या शेतकऱ्यांनी काही जमीन भूमिहिनांना खंडाने (नाहीतरी पाणी नसल्यामुळे रब्बी हंगामात जास्तीची जमीन विना लागवडीची राहते) कसायला द्यावी. त्यावर भूमिहिन आपल्या वाट्याचे पाणी वापरून शेती करतील. अशा प्रकारे पाण्याचं आणि जमिनीचं योग्य वाटप झाल्याने असमता कमी होईल. कसेल त्याला पाणी मिळेल.

७. पाण्याचा हक्क हा सामुदायिक असेल, जमिनधारकाचा नाही. त्यामुळे सिंचनाचं पाणी मिळणारी जमीन विकली तरी तिच्यावरचा पाण्याचा हक्क विकला जाणार नाही.

८. उपसासिंचन योजनेच्या खर्चाच्या २०% खर्च लाभधारकांनी करायचा आणि ८०% खर्च संस्था (ग्रामगौरव प्रतिष्ठान) करेल.

१९७२ ते २००२ या कालावधीत विलासराव साळुंखे या सामाजिक कार्यकर्त्याने अपार मेहनतीने दुष्काळग्रस्त जनतेला संघटित करून, श्रमदान करण्यास भाग पाडून उपसा योजनेच्या खर्चाचा काही भाग पेलवण्यास लाभधारकांचे मन वळविण्यात यश मिळविले. पुरंदर तालुक्यातील नायगाव परिसरातील खेड्यामध्ये जवळपास १०० योजना कार्यान्वित करण्यात आल्या अशी माहिती संस्थेने प्रसिद्ध केलेल्या माहितीपत्रातून उपलब्ध होते. या १०० योजनांतून सुमारे १५ हजार हेक्टर जमीनीला सिंचनाचा लाभ मिळवून दिला गेला. जवळपास आठ हजार शेतकरी कुटुंबांना सिंचनाचा लाभ झाला आणि ३० हजार लाभधारकांच्या जीवनामध्ये आर्थिक बदल घडवून आणण्यात आला. या प्रयोगाची नोंद राज्यस्तरावर, राष्ट्रीय स्तरावर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पण घेण्यात आल्याचे कळते. विलासरावजींनी स्थापन केलेल्या 'ग्रामगौरव प्रतिष्ठान' या सेवाभावी संस्थेचे काम चालू आहे.

या विचाराचं (माणसी अर्धा एकर जमिनीस पाणी आणि भूमिहिनांना पाणी) पुढे चालून शासनाने आपलेसे न केल्यामुळे सार्वत्रिकरण झालं नाही असंच म्हणावं वाटतं. पाणलोट क्षेत्राचा विकास करून भूजलामध्ये वाढ करून त्या भूजलाचा उपसा सिंचन योजनेतून सामूहिक पद्धतीने लाभ घेण्याचा प्रयोग हा आगळावेगळाच म्हणावयास हरकत नाही. लाभधारकाच्या सामुहिक पद्धतीने वागण्यावर, उपसायोजनेची काळजी घेण्यावर आणि सदस्यांच्या प्रामाणिकपणावर या प्रयोगाची यशस्विता अवलंबून राहणार आहे. अर्धा एकर जमिनीस पाणी म्हणजे नेमके किती पाणी याचा उलगडा होत नाही. केळी, ऊस यांसारख्या पाणी जास्त लागणाऱ्या पिकांचा या योजनेत अंतर्भाव नसल्यामुळे त्याचा विचार करण्याचं काही कारण नाही. हंगामी पिके म्हणजे ज्वारी, बाजरी, तूर, कापूस, कांदा, अलिकडे सोयाबीन, हरभरा, यासारखी पिके आहेत आणि खरीप हंगामामध्ये पाण्याचा ताण पडल्यानंतर संरक्षित पाणी देणे आणि रब्बी हंगामामध्ये या पाण्यावर एका पिकाचा लाभ घेणे एवढाच मर्यादित अर्थ लावणे बरोबर राहील. एका कुटुंबाला एक हेक्टर बागायती क्षेत्रातील उत्पन्नातून आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभा राहण्याची ताकद मिळेल का? यावरही गांभिर्याने विचार करण्याची गरज आहे. सिंचनाचा लाभ नसतानाची परिस्थिती आणि एक हेक्टर जमिनीस सिंचनाचा लाभ मिळाल्यानंतरची परिस्थिती यात निश्चितपणे फरक राहणार आहे. हा फरक त्या

शेतकरी कुटुंबाला (पाच माणसांचा आर्थिक भार सोसण्याची) आत्मनिर्भरता देऊ शकेल का? त्यामुळे शहराकडे होणारे स्थलांतरण थांबेल का? यासारख्या प्रश्नाची उत्तरे मिळावयास हवीत. सामुहिक पद्धतीने भूजलाची निर्मिती करणे आणि उपसा सिंचन पद्धतीने सर्व लाभधारकांना समन्यायी पाणीवाटपाच्या तत्त्वाने सिंचनाचा लाभ मिळवून देणारा हा प्रयोग निश्चितच कौतुकास पात्र ठरतो. अशा प्रयोगाची भविष्यातील वाटचाल आणि त्याला मिळणारी शाश्वतता ही अनेक घटकांवर अवलंबून राहणारी आहे. त्या परिसरात निर्माण होणाऱ्या कृषी आधारित उद्योगाचा अशा योजनेवर अनुकूल आणि प्रतिकूल असे दोन्ही प्रकारचे परिणाम होतात. साखर कारखान्याची स्थापना, ऊसासारखे पीक घेण्यासाठी शेतकऱ्याला भाग पाडते आणि पाणी पंचायतचा प्रयोग कोलमडून पडतो. इतर हंगामी पिकावर (तूर, ज्वारी, करडी इ.) प्रक्रिया करून मूल्यवर्धन करणाऱ्या उद्योगामुळे पाणी पंचायतच्या प्रयोगांना बळकटी मिळते. संस्थेने प्रसिद्धीस दिलेल्या माहितीपत्रकातील शंभर योजनांची आजची स्थिती काय आहे याविषयीचा अहवाल हाती लागण्याची गरज आहे. भूमिहिनांना पाण्याचा हक्क देणाऱ्या यशस्वी उदाहरणाचा तपशिल जनतेसमोर येण्याची गरज आहे. लोकसंख्या हा बदलणारा पैलू आहे. खोऱ्यातील/उपखोऱ्यातील लोकसंख्येमध्ये बदल झाल्यामुळे अर्धा एकर जमिनीस मिळणारा पाण्याचा हिस्सा कमी होणार आहे. एका कुटुंबातील संख्येवर पाच जणांची मर्यादा घातल्यामुळे कुटुंबातील उर्वरित सदस्य विनापाणी हक्कदार राहतील. दर दहा वर्षांनी राष्ट्रीय स्तरावर लोकसंख्येची गणना होते. त्यानुसार पाण्याच्या हक्कदारीचं प्रमाण पण बदलेल का? अशा प्रश्नाची उत्तरे शोधावयास हवी.

२००२ मध्ये विलासरावजींचं निधन झालं. १ जानेवारी २००३ ला 'समन्यायी पाणी हक्क परिषद' या नावाने संस्थेची स्थापना झाली. न्यायमूर्ती बी.जी.कोळसेपाटील यांच्यावर अध्यक्षांची जबाबदारी टाकण्यात आली. २०२१ मध्ये 'समन्यायी पाणी हक्क परिषद' या संस्थेचं अध्यक्षपद कोल्हापूर जिल्ह्यातील चिकोत्रा खोऱ्याच्या विकासासाठी झटणाऱ्या आनंदरावजी पाटील (भारती विद्यापीठाचे संस्थापक कार्याध्यक्ष) यांच्याकडे सुपूर्त करण्यात आलेलं आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णा नदीची उपनदी वेदगंगेमध्ये चिकोत्रा पाणलोट (चिकोत्रा नदी) आहे. चिकोत्रा नदीवर शासनाकडून लघु सिंचन प्रकल्प उभारण्यात आला आहे. धरणाच्या खालच्या बाजूस नदीपात्रात ठराविक अंतरावर कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याद्वारे पाणी साठविण्यात आले. नदीच्या पूर्ण लांबीत सामूहिक आणि वैयक्तिक स्तरावर उपसा योजना कार्यान्वित झालेल्या आहेत आणि पूर्ण उपखोरे ऊसाने व्यापले आहे. बरेचसे शेतकरी शेजारच्या शेतकऱ्याकडून उपसा योजनेचे पाणी खरेदी करून ऊसाचे पीक वाढवत आहेत. नुकतीच या परिसरात एका नवीन साखर कारखान्याची स्थापना झालेली आहे. या पाणलोट क्षेत्रात ५२ गावे आहेत. पाणी पंचायतच्या तत्त्वाचा (माणसी अर्धा एकर जमीनीस पाणी) स्वीकार करून चिकोत्रा पाणलोटाचा विकास करण्याचं कार्य आनंदरावजी पाटील यांनी हाती घेतलेले आहे. प्रत्येक शेतकऱ्याला किमान अर्ध्या एकराला पाणी मिळेल आणि भूमिहिनांना पाव एकराला पाणी मिळेल. चिकोत्रा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात समन्यायी पद्धतीने ५२ गावातील लोकांना लोकसंख्येच्या प्रमाणात पाणी वाटप करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठवण्यात आला. शासनाने त्याची तपासणी करून पहिल्या टप्प्यामध्ये पाच गावांसाठी मंजूरी दिलेली आहे. अर्धा एकर पाण्याचा उलगडा चिकोत्रा प्रकल्पाच्या प्रस्तावामध्ये करण्यात आलेला आहे. दर दिवशी ४ मी.मी. पाणी १०० दिवसांसाठी उपलब्ध करून देऊन हंगामी पीक घेण्याचे प्रस्तावित आहे. पाव एकरासाठी हे प्रमाण ४०० घ.मी. येते आणि अर्ध्या एकरासाठी ८०० घ.मी. येते. एक हेक्टर सिंचन क्षेत्रासाठी ४००० घ.मी. येते. हे प्रमाण चितळे आयोगाच्या शिफारशीशी जवळपास मिळतेजुळते आहे. महाराष्ट्र शासनाच्या नाशिकजवळील वाघाड सिंचन प्रकल्पात पण पाणीवापर संस्थेच्या माध्यमातून कार्यान्वित असलेल्या सिंचनाच्या उपक्रमात पाण्याचा वापर दर हेक्टरी ३००० ते ४००० घ.मी.च्या जवळपास असल्याचे समजते. 'पाणीवापर संस्थे'च्या कार्यपद्धतीचा तपशील पुढील परिच्छेदामध्ये आलेला आहे. चिकोत्रा खोऱ्यामध्ये पाण्याचा पुरवठा उपसा पद्धतीने आणि ठिबक सिंचन यंत्रणेच्या मार्फत करण्याचे प्रस्तावित आहे. ठिबकसिंचन पद्धतीमुळे पाणी मोजले जाणार आहे. पाणीपंचायतचे पाणी वाटपाचे सूत्र स्वीकारून, चिकोत्रा प्रकल्पावर समन्यायी पाणी वाटपाचा प्रयोग अंमलात आणण्याचा 'समन्यायी पाणी हक्क परिषदेचा' प्रयत्न आहे. काळाच्या ओघात जमिनीचे तुकडे झाल्यामुळे ८०–९०% शेतकऱ्याकडे एक एकर (त्यापेक्षाही कमी) ते पाच एकरापर्यंत जमिनीची मालकी राहिलेली आहे. चिकोत्रा पाणलोटात जमिनधारणेचं प्रमाण एक एकरपेक्षा पण कमी आहे. अशा परिस्थितीत भूमिहिनांना मिळालेल्या पाण्याचा वापर करण्यासाठी मोठ्या शेतकऱ्याकडून खंडाने जमीन मिळण्याची शक्यता कमीच राहणार आहे असे वाटते. भूमिहिनांकडे पाणी आहे पण जमीन नाही अशी परिस्थिती निर्माण होणार आहे. साहजिकच स्वतःच्या हिश्श्याला आलेलं पाणी शेजाऱ्याला विकण्याचा त्याचा विचार होणार आणि त्यातून पाण्याच्या विक्रीचा (वॉटर मार्केट) प्रकार लाभक्षेत्रामध्ये रूजण्याची शक्यता पण नाकारता येत नाही. त्यातून निर्माण होणारे प्रश्न वेगळे असतील.

महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्याच्या सहभागातून पाण्याचे समन्यायी वाटप व्हावे, पाण्याचा वापर काटकसरीने व्हावा यासाठी लाभधारकांच्या संस्था (पाणीवापर संस्था) स्थापन करण्याचा निर्णय २००५ साली घेतलेला आहे. 'महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्याकडून व्यवस्थापन कायदा–२००५' असे कायद्याचे नामकरण करण्यात आले आहे. पाणीवापर संस्था निर्माण करण्याच्या प्रयोगास नाशिक येथील वाघाड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात १९९१ च्या सुमारासच सुरूवात करण्यात आलेली आहे. सुरूवातीला पाणी वापर संस्थांची नोंदणी सहकार खात्याकडे केली जात असे. २००५ च्या कायद्याने संस्थांची नोंदणी जलसंपदा विभागाकडे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कायद्यानुसार सिंचनासाठीचे पाणी, पाणीवापर संस्थेच्या माध्यमातूनच दिले जाणार आहे. वैयक्तिक शेतकऱ्याला पाणी दिले जाणार नाही. संस्थेला पाणी (घनमापन पद्धतीने) मोजून दिले जाणार आहे. संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सर्व शेतकरी संस्थेचे सभासद मानले जाणार आहेत. संस्थेचे अध्यक्षपद कालव्याच्या शेवटाकडील, मध्यभागातील व शीर्ष भागातील लाभधारकाकडे आवर्ती पद्धतीने असेल. लाभधारक महिलांना पण अध्यक्षपद देण्याची तरतूद कायद्यामध्ये करण्यात आली

आहे. लघु वितरिका, वितरिका, कालवा व प्रकल्प अशा सर्व स्तरावर पाणी वापर संस्थांची निर्मिती करण्यात येणार आहे. प्रारंभिक सिंचन कार्यक्रम तयार करण्याचे सर्व अधिकार प्रकल्पस्तरीय पाणीवापर संस्थांना असेल. संस्थेला पीक स्वातंत्र्य असेल. पाण्याच्या पुनर्वापरास प्रोत्साहन दिले जाईल. कालवा व विहीर या पाण्याच्या संयुक्त वापरास (पाटमोट संबंधास) परवानगी असेल. विहिरीवर पाणीपट्टी आकारण्याची संस्थांना मुभा असेल. संस्थेच्या कार्यक्षेत्रात पाणीपट्टीचे दर व सेवाकर ठरविण्याचे अधिकार पाणीवापर संस्थांना असतील. वितरण व्यवस्थेच्या देशभाल दुरूस्तीसाठी पाणीपट्टी वसुलीच्या ५० ते ७५% परतावा पाणीवापर संस्थेला शासनाकडून देण्यात येईल. ज्या प्रकल्पावर सर्व स्तरावर पाणी वापर संस्था गठीत झाल्या असतील तेथे प्रकल्पस्तरीय संस्थाच शासनाबरोबर करारनामा करेल. इतर ठिकाणी खालच्या स्तरावरील (उपवितरिका) पाणीवापर संस्था वरच्या स्तरावरील (वितरिका) पाणी वापर संस्थेशी करारनामा करेल.

शासनाच्या २००५ च्या निर्णयानुसार आतापावेतो वेगवेगळ्या सिंचनप्रकल्पाच्या लाभक्षेत्रात जवळपास सव्वा तीन हजार पाणीवापर संस्था (सुमारे ११ लक्ष हेक्टर क्षेत्रावर) कार्यरत झालेल्या आहेत. पाणी वापर संस्थेची निर्मिती मोठ्या प्रमाणात व्हावी, सिंचन व्यवस्थापानाचे सर्व अधिकार पाणीवापर संस्थांकडे हस्तांतरित व्हावेत, पाण्याचा काटकसरीने वापर व्हावा, पाणी वापराची कार्यक्षमता वाढावी, पाणीपट्टीची वसुली चांगल्या प्रकारे व्हावी, सिंचनक्षेत्रात वाढ व्हावी, पाण्याची आणि शेतीची उत्पादकता वाढावी इ. अनेक उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी आणि समन्यायी पाणीवाटपाच्या माहिमेला गती देण्यासाठी राज्यशासनामार्फत यशस्वी पाणीवापर संस्थांना पुरस्कार दिले जातात. पुरस्काराची रक्कम काही लाख रूपयांमध्ये असते. राष्ट्रीय स्तरावर पण सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या पाणीवापर संस्थेस पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. येत्या काही वर्षात शासनाने निर्माण केलेल्या सिंचन क्षेत्रात पाणीवापर संस्था स्थापन व्हाव्यात आणि त्याचे व्यवस्थापन पूर्णपणे लाभधारकांच्या संस्थांकडे हस्तांतरित केले जावे यासाठी प्रयत्न केले जात आहेत. पाणीवापर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना आणि लाभधारकांना कायद्याची, नियमाची आणि सिंचन व्यवस्थापन, संस्थेच्या अखत्यारीत घेतल्यामुळे होणाऱ्या फायद्याची पुरेशी जाणीव करून देण्यासाठी औरंगाबाद येथील जल व भूमी व्यवस्थापन संस्थेमार्फत (वाल्मी) प्रशिक्षण दिले जाते. आजमितीस राज्यामध्ये राज्यस्तरीय व स्थानिकस्तरीय सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून जवळपास ७० ते ७५ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे. या सर्व सिंचित क्षेत्रावर पाणीवापर संस्थेचं जाळं निर्माण करायचं आहे. एका पाणीवापर संस्थेचे सरासरी ५०० हेक्टर कार्यक्षेत्र या हिशोबाने आजमितीस जवळपास पंधरा हजार पाणीवापर संस्था निर्माण करण्याची गरज आहे. गेल्या पंधरा-वीस वर्षात संस्था निर्माण करून सिंचनक्षेत्र हस्तांतरण करण्याची प्रक्रिया तीन-सव्वातीन हजारांच्या आसपासच रेंगाळत आहे.

स्वातंत्र्याच्या पूर्वीपासून आणि स्वातंत्र्यानंतर पण सिंचन प्रकल्पाची निर्मिती आणि सिंचन व्यवस्थापन हे विषय शासनप्रणितच राहिलेले आहेत. सुरूवातीच्या कालखंडात सिंचन प्रकल्पाची संख्या कमी होती. सिंचन व्यवस्थापनासाठी लागणारे मनुष्यबळ मर्यादितच होते. कालवा आणि वितरण व्यवस्थेची देखभाल दुरूस्ती आवाक्यात होती. लाभधारकांमध्ये पाणी वापराची शिस्त होती. कायदे मोडण्याच्या प्रवृत्तीचा अभाव होता आणि त्यामुळे शासनप्रणित व्यवस्था, सिंचन व्यवस्थापनाचे काम तुलनेने प्रभावीपणे आणि परिणामकारकपणे करू शकली. राज्यातील ब्रिटिशकालीन नीरा कालव्यावरील सिंचन व्यवस्थापनास 'सिंचनाची गंगोत्री' असे संबोधले जाते. काळाच्या ओघात घसरण झाली. आजमितीला राज्यस्तरीय जवळपास चार हजार सिंचन प्रकल्पावर ५० ते ५५ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. सिंचन क्षेत्राची व्याप्ती मोठी आहे. या विशाल सिंचन क्षेत्रातील वितरण व्यवस्थेची देखभाल दुरूस्ती आणि पाणीवाटपामध्ये शिस्त आणण्याची जबाबदारी सध्याची पारंपारिक शासनप्रणित व्यवस्था पेलू शकत नाही. पाणीवापर संस्था स्थापन करून सिंचन व्यवस्थापनाची, देखभाल दुरूस्तीसह जबाबदारी लाभधारकाच्या समुहाला हस्तांतरण करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा आज मितीला दुसरा पर्याय नाही. होणारा बदल मोठा आहे पण अशक्यप्राय नाही. सद्यस्थितीत सिंचन व्यवस्थेत निर्माण झालेला बेशिस्तपणा वाढत जाणार आहे आणि सर्वसामान्यांच्या करातून निर्माण केलेल्या सिंचन प्रकल्पातील पाण्याचे वाटप आणि वापर पाण्याच्या समन्यायी वाटपाच्या तत्त्वापासून फारच दूर गेलेले असेल.

समन्यायी पाणी वाटपाच्या वेगवेगळ्या विचारधारांचा तपशिल वरील परिच्छेदामध्ये सविस्तरपणे मांडलेला आहे. गेल्या तीन दशकांपासून प्रयत्न करून, कायद्याचा पाठिंबा देऊन पण सिंचन व्यवस्थापनाचे हस्तांतरण पाणीवापर संस्थांकडे करण्यामध्ये महाराष्ट्र शासनाला मिळालेले यश हे फार अपुरे आहे. जवळपास ११ लक्ष हेक्टर क्षेत्र हस्तांतरित झाल्याचा आकडा कागदावर आहे. जमिनीवरील चित्र हे वेगळे आहे अशी कबुली शासनयंत्रणेकडून मिळत आहे. राज्यस्तरावरील सिंचन प्रकल्पातून निर्माण झालेले क्षेत्र (जवळपास ५५ लक्ष हेक्टर) आणि हस्तांतरण झालेले क्षेत्र यातील फरक मोठा आहे. हस्तांतरण न झालेल्या सिंचन क्षेत्रावर पारंपारिक पद्धतीची शासनप्रणित सिंचन व्यवस्था कार्यरत आहे. सिंचनाच्या आवर्तनाप्रमाणे आणि सिंचित करावयाच्या क्षेत्राच्या परिमाणानुसार कालव्यामध्ये विमोचकाचे दरवाजे उघडून पाणी सोडले जावे आणि कालव्याच्या शेवटाकडून शीर्षभागाकडे सिंचनाचा कार्यक्रम राबवावा असे अभिप्रेत आहे. आवर्तनाचा कालावधी १२ ते १४ दिवसांचा असतो. प्रत्यक्षात वेगळेच घडते. अनेक सिंचन प्रकल्पावर वर्षाकाठी, तीन हंगामात तीन ते चारच आवर्तनामध्ये सिंचनाचा कार्यक्रम उरकला जातो. लाभक्षेत्रात रूजलेली पीक पद्धती वेगळीच असते. विदर्भ वगळता राज्याच्या इतर प्रदेशात पीक पद्धतीत ऊसाचे प्राबल्य दिसून येते. त्यामुळे सिंचनक्षेत्र आक्रसले जाते. सिंचन व्यवस्थापनातील बेशिस्तीला अनेक बाबी जबाबदार आहेत. त्याच्या तपशिलात जाणे या लेखाचा उद्देश नाही. ब्रिटीश काळापासून कार्यान्वित झालेली शासनप्रणित व्यवस्था आज पण विस्कळित झालेल्या स्वरूपात कार्यान्वित आहे. अनेक प्रकल्पावर अनाधिकृत सिंचन क्षेत्राचे, पीक पद्धतीचे प्राबल्य आहे आणि शासनयंत्रणा हतबल झालेल्या स्थितीत दिसते. अशा प्रकारच्या सिंचन व्यवस्थापनातून समन्यायी पाणीवाटपाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकत नाही. पाणी ओरबडून घेणारे काही लाभधारक असतात आणि पाणी न मिळणारे अनेक जण

हताश झाल्यासारखे दिसतात.  मनुष्यबळाचा अभाव हे एक प्रमुख कारण दिसून येते. लाभधारकांच्या पाणीवापर संस्थांना सिंचन व्यवस्थापन लवकरात लवकर हस्तांतरित करणे हा एकच पर्याय सद्यस्थितीत दिसून येतो. येत्या काही वर्षात हे घडावे अशी अपेक्षा करणे लाभधारकांच्या आणि राज्याच्या हिताचे राहणार आहे.

*****

**संपादकीय...... पान क्रमांक ४ वरून........**

या चळवळीचे उद्देश प्रामुख्याने पुढीलप्रमाणे दाखविण्यात आले आहेत.
(१)नैसर्गिक संसाधनांची  जपणूक आणि संरक्षण
(२)गरीब शेतकऱ्यांचे पाण्यावरील हक्कांचे संरक्षण करणे.
(३) जे शेतकरी आपली उपजीविका शेतीवर करत आहेत त्यांना हक्काचे पाणी मिळवून देणे.
(४) सेंद्रिय शेतीचा पुरस्कार करणे
(५) रोग निवारण आणि सामाजिक स्वास्थ्याचे रक्षण.
(६) पाण्याचे हक्क संरक्षित करण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास करणे
(७) मानव आणि पर्यावरण यांच्या संबंधात सुसूत्रता आणणे. श्री. विलासराव यांचे कुटूंबीय आणि मित्रपरिवार या चळवळीला पुढे नेण्यात यशस्वी ठरले आहेत.

या चळवळीचा  एक महत्वाचा लाभ निश्चितच  झाला. तो म्हणजे समन्यायी पाणी वाटप व्हावे म्हणून महाराष्ट्रात विचार बळावला आणि त्याची फलश्रुती म्हणून महाराष्ट्रात सिंचन व्यवस्थापन कायदा २००५ साली राज्यात संमत करण्यात आला. त्या द्वारे पाणी वापर संस्था स्थापण्याचा मार्ग मोकळा झाला.

श्री विलासराव साळुखे आज आपल्यात नाहीत. नुकतीच त्यांची २० वी पुण्यतिथी महाराष्ट्रात साजरी  करण्यात आली. त्या निमित्ताने त्यांच्या स्मृतीला आणि कार्याला उजाळा मिळावा या दृष्टीने आम्ही काही मित्रांनी जलसंवाद मासिकाचा त्यांचेवर एक गौरव विशषांक काढावा असे ठरविले. आणि त्याची फलश्रुती म्हणून हा विशेषांक तयार करण्यात आला आहे. आपण त्याला दाद द्याल अशी आशा करतो. या अंकाचे अतिथी संपादक श्री. सतीश देशमुख आणि श्री. विलासरावांचा परिवार यांनी जे सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार.

*****

# आपला माणूस - विलासराव साळुंखे

**श्री. शरद मांडे**

**मो : ९८६०९८२८२५**



**१. स्मरण जलयोध्याचे :**

१९७० ते २००२, ह्या तीस वर्षांच्या दीर्घ काळांत दुष्काळ निवारणार्थ 'पाणी' आपल्या सर्वांचे, समाजाचे व त्याचे वाटप समन्यायाने व्हावयास पाहिजे ह्यासाठी पुरंदरच्या माळरानावरून अथक परिश्रम करणारे विलासराव साळुंखे आजही देशभर समान पाणी वाटप करणारा – आपला माणूस म्हणून ओळखले जातात.

केंद्रिय जल आयोगाचे सचिव असतांना डॉ. माधवराव चितळे ह्यांनी पाण्याविषयी जनतेमध्ये जागृती व्हावी ह्या दृष्टिकोनातून दरवर्षी एप्रिल–मे मध्ये सर्वत्र 'जलसंपत्ती दिन' साजरा करावा ह्या संकल्पनेबाबत १९८७ मध्ये आदेश प्रस्तावित केले. त्यात साधारणत: हा उपक्रम नेहमीसारखा जलअभियंत्यांसाठी व्याख्याने, चर्चासत्रे वा प्रदर्शने असा हॉलमध्ये औपचारिक पद्धतीने न करतां, अभियंत्यांनी इतर विभागातील अधिकारी, तसेच पाण्याच्या चळवळीशी संबंधित असलेल्या स्वयंसेवी संस्था ह्यांचे सहकार्याने, त्या परिसरातील ग्रामीण जनता, शेतकरी, पाणी वापर संस्था ह्यांचे संपर्कात येऊन त्यांच्या अडीअडचणी समजावून घेणे, त्यांना पाण्याच्या वापराच्या काटकसरीचे धोरण विषद करणे, जलसंधारण इ. बाबत खेळीमेळीने, आपलेपणाने जागृती करावी. पुण्यात, आम्ही इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीयर्स, इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन, पाटबंधारे खाते, कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग, वनराई, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, वनराई, पाणी पंचायत इ. समवेतह सुरूवातही केली. पहिल्या दोन वर्षी खडकवासल्या जवळील आगळांबे, नऱ्हे, सिंहगडाच्या मागील गांवे अशा सहा ठिकाणी साजरा केला. मुख्यत: मा. एम. जी. पाध्ये, माजी सचिव, पाटबंधारे विभाग, दिल्ली, श्री. मोहन धारिया, मा. बी. जी. ढोकरीकर, संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, श्री. मुकूंद घारे, सुमित्रा भावे, श्री. विलासराव साळुंखे अशा अनेक मान्यवरांनी संपूर्ण सहभाग देऊन यशस्वी केला.

विशेष म्हणजे तिसऱ्या किंवा चौथ्या वर्षी विलासरावांनी त्यांच्या पुरंदर तालुक्यातील पाणी पंचायतच्या ६०–७० शेतकऱ्यांना झुणका भाकर घेऊन शिवाजीनगरला, मॉडर्न कॅफेसमोरील इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीयर्स (इं), पुणे स्थानिक केंद्रात आणले व चर्चासत्रानंतर नेहमीच्या वडा – पाव – केक अल्पोपहाराऐवजी पुरंदरच्या झुणका भाकरीचा स्वाद दिला व ग्रामीण जीवनाशी स्नेह

जोडला. विलासराव, हा आपला माणूस आहे हे सगळ्यांच्या मनांत ठसले, त्यांची तीच प्रतिमा आजतागायतही माझे मनात तशीच जागी आहे. पुरंदरचा कायम दुष्काळी भाग सिंहगड, तुंग, तिकोनाच्या पर्जन्यछायेमुळे पाऊस कधीकाळी पण बऱ्याच वेळा वार्षिक ५००–७०० मिमि पडणारा, अन् शेतकरी मात्र वर्षानुवर्षे त्यांच पारंपारिक पद्धतीने जिराईत शेतीत आयुष्यभर काबाडकष्ट करून कायमचा उपाशी ! शेळ्या मेंढ्या घेऊन भटक्या प्रवृत्तीचे जीवन, हे तर जेजूरीच्या मल्हारीच्या, मोरगांव – सिद्धटेकच्या गणपतीचा प्रसाद किंवा बाबासाहेब पुरंदरे किंवा सासवडच्या आचार्य अत्र्यांचा मराठी माणूस म्हणून मिळालेली ओळख, खडतर आयुष्य काढणारा ! जशा वाडया, वस्त्या, मेंढ्याचा कळप तशाच ह्या भटक्या माणसांच्या झुंडी, कळप ! एकीकडे निसर्गाची ही परवड तर दुसरीकडे येळवंळी वरील भोर–भाटघर, किंवा नंतर त्या खोऱ्यात झालेल्या नीरा – देवधर वा वीर धरणांची जलसमृद्धी असतांना, पाणी वाटप निसर्गाने मात्र भिन्न भिन्न केलेलं ! अन् आम्ही ते आणखीनच अवघड केले. त्यावर एकोप्याने त्या क्षेत्रातील लाभार्थ्यांना एकत्र आणून समजून, उमजून प्रत्येकाच्या गरजेप्रमाणे समन्यायाने वाटून घेण्याऐवजी बळी तो कान पिळी ह्या न्यायाने पाणी पळवीत अधिकच दरी रूंदावली. शेतकऱ्यांजवळ अनुभव असतो, उपजत ज्ञान असते, पण इंग्रजांनी ह्या देशाला दिडशे वर्षात जे फाटाफूटीचे वळण लावले, तेच स्वातंत्र्यानंतरच्या भारतातील भारतीय गोऱ्या साहेबांनी पुढे जोरात रेटले. त्यामुळे एक वेळ इंग्रजी साहेब परवडला, पण पाटबंधारे खात्याचा आजचा पाटकरी नको अशी शेतीची परवड झाली. तेव्हापासून गेल्या ७० वर्षात देशात ग्रामीण 'भारत' व शहरी 'इंडिया' अशी दोन राष्ट्रे निर्माण झाली आहेत. ह्याचा मूलगामी विचार यशवंतराव चव्हाण, वि. म. दांडेकर, विखे पाटील, बाळासाहेब देसाई, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, राजारामबापू पाटील, दत्ता देशमुख, बी. जे. खताळ, गणपतराव देशमुख, दत्ता देसाई अशा अनेक नेत्यांनी पहिल्या २०–२५ वर्षांत केला व ग्रामविकास, सहकार, मूलोद्योग, दुग्ध, कुक्कुटपालन, शिक्षण ह्यात महाराष्ट्राच्या विकासाची पायाभरणी केली. तदनंतर, मात्र त्या विकासाच्या वाहत्या गंगेत हात धुवून घेत सहकार, उस कारखानदारी, राजकारण ह्यांनी चित्र बदलले. तशातच अहंमन्य समाजवादी वा कम्युनिस्ट नेतृत्वाने उदा. दत्ता सामंत ह्यांचा गिरणी कामगार संप, त्यावेळचे जॉर्ज फर्नांडिस ह्यांचे बेस्ट, पोस्टचा संप ह्यांनी उद्योगक्षेत्राची वाट लावली आणि महाराष्ट्रीय माणूस, शेतकरी शेताच्या वा मुंबईच्या बाहेर फेकला गेला, ह्या काळांत अनेक पाटबंधारे प्रकल्प राबविले गेले, पण शेती आहे तशीव व पाण्याचीही तीच रडकथा !

अशा काळांत १९७२–२००२, विलासरावांनी शेतीशी संबंधित म्हणजे शेतकरी, त्यांचे कुटुंब, शेतमजूर, बारा बलुतं ह्यांच्या दैन्यावस्थेचा अभ्यास करून त्यावर असलेली शेती आणि त्यासाठी खात्रीचे पाणी ह्याची सांगड कशी घालायची ह्याचे दिशादर्शक काम केले. वर उल्लेख केल्याप्रमाणे, नुसते महोत्सवी वा कार्यक्रम समारंभ न करता मूलभूत प्रश्नावर नेमके उत्तर शोधून त्यादृष्टीने सर्वांना बरोबर घेऊन एकोप्याने व एकजुटीने प्रयत्न केले तर हमखास यश मिळते हा मूलमंत्र दिला. आज जळगांवला पद्मश्री भवरलाल जैन ह्यांचे नेतृत्वाखाली उभारलेले जैन इरिगेशन प्रा. लि. किंवा पद्मश्री आप्पासाहेब पवार ह्यांचे विस्तारलेले बारामती कृषि प्रतिष्ठान ही कांही दृष्य फळे आहेत. असा बदल पुरंदर किंवा महाराष्ट्रांत इतरत्रही घडला असता, तर १९६० मध्ये महाराष्ट्र स्वतंत्र झाला, तो आज संपन्न झालेला दिसला असता. आजही ओस पडलेल्या खेडयातील वा नाईलाजाने शहरात वाढलेल्या झोपडपट्ट्या आणि त्याला लागून उभारलेल्या उत्तुंग टॉवरमधील रोषणाईचा झगमगाट ह्यातून श्रीमंतीतील दरी प्रचंड वाढलेली दिसून येते.

माझी त्यांची कांही कार्यक्रमातून गांठ पडली, पण नेमके आठवते ते मा. मनोहर जोशी, मुख्यमंत्री असतांना, ५ जून १९९५ ला मुंबईला विधानसभेमध्ये सर्व सदस्य, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी, शासकीय अधिकारी ह्यांचे दिवसभर 'पाणी' प्रश्नावर जे मंथन झाले, त्यानंतर शासनाने श्वेतपत्रिका काढली. ती घेऊन विलासराव आमच्या जागतिक बँक प्रकल्पाच्या, स्वारगेट येथील कार्यालयात आले होते, त्यावेळची त्यांची पडलेली शेवटची गांठ ! खेड्यातील जनता उगाचच तोंडदेखले एखाद्याला आपलं म्हणत नाही आणि प्रशासकीय विद्वान तर आपणच सर्वज्ञानी आहोत अशा भ्रामक समजूतीत असतात, अशावेळी ही दोन्ही टोके एकाच धाग्यात व्यवस्थित गुंफणारे, आपल्या खेड्यातल्या बांधवाशी जवळकीने बोलणारे व लगेचच गरज पडली तर प्रशासकीय जलतज्ज्ञांशी गंभीरपणे विषय मांडायचे, त्यावेळी ते नुसता आपला माणूस म्हणून रहायचे नाही तर परफेक्ट 'ॲक्युरेट' भावायचे. २० वर्षांनंतरही ही प्रतिमा अधिकच उत्कट होत आहे, मग ते 'उदक चालवावे युक्ती', महाराष्ट्राच्या जलसंपत्तीचे नियोजन : पाण्याचे न्याय वाटप – धोरण – दिशा – कार्यवाही असो वा पर्यायी विकासनिती आयुष्यभर जमीन व पाणी ह्यावर नुसते मूलगामी कष्टच उपसले नाही तर त्याला जलविज्ञानाची वैचारिक जोड देऊन परिणामकारक सिद्धांताची मांडणी केली त्यामुळे 'भगीरथाचे वारस' म्हणून डोळ्यापुढे उभे रहातात.

**२. जडण घडण त्या तंत्रज्ञान योध्याची :**

रांजणीच्या बळवंतराव उर्फ नानासाहेब साळुंखे आणि आई सौ. द्रोपदीबाई ह्यांच्या सात अपत्यातील श्री. विलासराव हे पहिले अपत्य. वडिलांच्या लष्करी जीवनापासून एकदम वेगळे वळण घेतलेले विलासराव १९३७ मध्ये २० फेब्रुवारीला जन्मले ! आयुष्यभर पुरंदरचे ग्रामीण जीवन ते अनेक परदेशातील पंचतारांकित मेट्रोपॉलिटन क्षेत्रात सहजपणे, समरसून वावरले, ते उपभोगतांना प्रश्नाच्या मूळाकडे जाऊन, मंथन करणे, कायमस्वरूपी तोडगा काढणे, त्यावर प्रत्यक्षात स्वत: प्रयत्न करणे, सुधारणा करणे व शाश्वत उपायांचा मंत्र समाजाला देणे करीत आयुष्यभर वाटचाल केली व शेवटी हृदयविकाराचे बाह्य निमित्ताने २३ एप्रिल २००२ ला स्वत:हून स्वीकारलेली इहलोकीची वाटचाल संपविली. ह्या जीवनयात्रेची पहिली जडण घडण १९६३ ला ॲक्युरेट इंजिनिअरिंग प्रायव्हेल लिमिटेड कंपनी करेपर्यंत ! १९५४ ला शालांत परीक्षा चांगल्या प्रकारे पास झाल्यावर पुण्याला फर्ग्युसनमध्ये इंटर सायन्स वरच्या वर्गात पूर्ण करून कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग, पुणेत १९५९ ला इलेक्ट्रिकल इंजिनियर प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. घरच्यांचा मिलीटरीत जाण्याचा आग्रह मोडून इंजिनियरिंग हाच व्यवसाय म्हणून निश्चित केला व १९६० मध्ये पुण्यातच डेक्कन जिमखान्यावर तळघरात मोटार वाईडिंगचे वर्कशॉप सुरू केले, दुर्दैवाने ते ११ जुलै १९६१ च्या महापूरात वाहून गेले, पण खचून न जाता नव्या उमेदीने 'बळवंत

इंजिनियरिंग' सुरू केले तेच पुढे १९६३ मध्ये रूपांतर 'क्युरेट' मध्ये झाले व १९६४ पासून हडपसर इंडस्ट्रियल एरियात जोमाने विस्तारले. मुख्यतः सायंटिफिक गेजेस, हायप्रिसिजन इन्स्ट्रुमेंटस्, व्हर्निअर कॅलिपर्स, मायक्रो मेजरिंग टूल्स ह्यात प्राविण्य मिळवून भरभराट केली पण ही कंपनी नेहमीच्या उद्योग विश्वातील न राहता काम करणारे कामगार हेच कंपनीचे भांडवल आहे, ह्या जाणिवेतून माणुसकीचे स्नेहसंबंध निर्माण केले, जोपासले, वाढविले ! शक्यतो परस्पर चर्चेने प्रश्न सोडविणे, कामगारांना आपुलकीने वागविणे, प्रॉडक्टचा दर्जा अत्युच्च राखणे, आंतरराष्ट्रीय स्तरावर नामांकन मिळविणे व प्रॉडक्टवर नफेखोरी न करता उचित फायदा घेणे हे वेगळे तंत्र अवलंबले. त्यामुळे 'जमनालाल बजाज पुरस्कार' स्वीडनचा 'इंटरनॅशनल इन्व्हेंटर्स अवॉर्ड' असे भारतीय, परदेशी सन्मान मिळाले. त्या काळी कंपन्यांतून युनियन स्थापन करणे, वेतनवाढ, बोनस ह्यावर लढा देणे व पुढारी बनून व्यवस्थापनाशी आंतून संधान बांधणे, अशा शांतता बिघडवणाऱ्या गोष्टी वाढत होत्या, अशा वेळी विलासरावांनी ह्या औद्योगिक वातावरणाला छेद देत नवे उद्योगविश्व निर्माण केले. कांही काळानंतर नाईलाजाने मंदी, बंदी, युनियन लढा, कामगार प्रश्न ह्यांना तोंड द्यावे लागले, पण तेही निर्धाराने लढवून, आपले नाणे खणखणीत असल्याचे सिद्ध केले, त्याच काळात चि. सौ. कां. चंदन जगताप ह्यांनी सौ. कल्पनाताई म्हणून विलासरावांच्या वैयक्तिक ऐहिक संसारात पदार्पण केले आणि त्याचबरोबर एस.एन.डी.टी. चा 'समाज सेवा अभ्यासक्रम' पूर्ण करतांना केलेल्या ज्ञानाचा आयुष्यभरासाठी सामान्य जनांच्या सामाजिक संसाराला नेटाने हातभार लावला. यथावकाश आयुष्यातील संसारवेलीला, जुलै १९६८ मध्ये विक्रम नंतर आदित्य हे सुपुत्र व कन्या कु. सोनाली ही फुले उमलली, त्यांनीही आई वडिलांचा घेतला वसा पुढे नेला. ह्या औद्योगिक क्षेत्रात 'वेस्टर्न महाराष्ट्र डेव्हलपमेंट कार्पोरेशन' (WMDC) चे डायरेक्टर, फोरम फॉर इंडस्ट्रीअल टेक्नॉलॉजिस्टचे काम व शासनाच्या ह्या क्षेत्रातील अनेक अग्रगण्य संस्थातून सहभाग दिला. 'ॲक्युरेट' सन्मानाने विस्तारली, विलासराव त्यावर संपूर्ण लक्ष देऊन होते, पण १९७२ च्या दुष्काळाने त्यांच्यात जो बदल झाला त्यामुळे त्यांनी प्राधान्याने सामाजिक कृषि–जल सेवा ह्यांना दिले आणि कल्पनाताईंनी त्यांचे त्या कार्यात सहभागी होत होत संसार व ॲक्युरेट ही सांभाळले, वाढविले. त्यामुळेच त्या 'स्त्री–सखी–सचिव' ह्या संज्ञेस पात्र ठरल्या, विलासरावांनी जे तंत्रज्ञान प्राप्तीचे कार्य केले त्याची ही तोंड ओळख ! तेथून पुढे महाराष्ट्राला एक आगळा वेगळा कृषि–जल संवादक मिळाला!

**३. परिवर्तन झालेला जलयोद्धा :**

कारखान्याची वाढ कितीही विस्तारत होती व नाजूक उपकरणे करणेत हातखंडा झाला होता, पण विलासरावांच्या मनांतील माणूस दुष्काळ, दारिद्र्य, जलअभाव क्षेत्र विकास ह्याकडे ओढला जात होता. महाराष्ट्र शासनाने एप्रिल १९७१ मध्ये एकात्मिक क्षेत्र विकास योजना जेष्ठ सामाजिक विचारवंत वि. स. पागे ह्यांचे नेतृत्वाखाली जाहीर केली. त्यातच १९७२ चा तीव्र दुष्काळ उद्भवला. त्यातून 'रोजगार हमी योजना' खाली दुष्काळी कामे पण जी बहुतांशी खडी फोडण्याची, रस्ते दुरूस्ती, गाळ काढणे अशी घेणेत आली. महाराष्ट्रात सर्वत्र दगड उपलब्ध असल्याने शेतमजूरांना दुष्काळी तरतूद म्हणून अन्नधान्य देण्याचे उद्दिष्टाने कांही तरी काबाडकष्टाचे काम द्यायचे म्हणून ही 'खडी फोडणे' उपाययोजना घेतली गेली होती त्यातून खडीचे डोंगर निर्माण झाले, ती उपयोगी नव्हती असे नव्हते पण विलासरावांनी शासन दरबारी मागणी केली की त्याऐवजी कांही जलसंधारण कामे, बांध–बंधारे, नाल्या, खंदक, चर अशी कामे हाती घेतली, तर त्यातून येणाऱ्या पावसाळ्यांत पाण्याचा साठा निर्माण होईल, पाणी मुरेल, भूजल वाढेल म्हणजे जेणेकरून येणाऱ्या भविष्यात उत्पादक काम झाल्याचा फायदा होईल. त्याअनुसार पुण्याचे जिल्हाधिकारी जमशेद कांगा ह्यांचे सहाय्याने पुरंदर तालुक्यातील नायगाव जवळील आठ पाझर तलावाची राहिलेली कामे हाती घेतली गेली. सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टने ४० एकर जमीत जलसंधारण कामासाठी ५० वर्षांच्या कराराने दिली. विलासरावांनी भाऊसाहेब नेवाळकर, डॉ. मधुसूदन साठे ह्यांचे मदतीने 'ग्रामगौरव प्रतिष्ठान' ट्रस्ट स्थापन केला व तेथे २–३ वर्षांत ५ एकरवर साठवण तलाव करून त्यांतून २० एकरवर खात्रीचे सिंचन, १० एकर पावसाच्या पाण्यावर, ५ एकर गवत, झुडूपे असे नियोजनपूर्वक काम यशस्वीरित्या केले. देवस्थानच्या जमिनीचा कायापालट झाला व त्यास पूरक जोडधंदे हाती घेतले. नायगांवच्या ह्या प्रकल्पाला यशवंतराव चव्हाण, सी. सुब्रमण्यम, शिक्षणतज्ज्ञ जे. पी. नाईक, चित्रा नाईक, शरद पवार, कविवर्य बा. भ. बोरकर, वसंतदादा पाटील, वि. म. दांडेकर आदी मान्यवरांनी भेट देऊन प्रशंसा केली. मुख्यतः ह्या तलावातील पाणी कोणी कसेही उपसावे असे न करता विलासरावांचा जो मूलगामी विचार होता की दरमाणशी अर्धा एकर जमिनीला पुरेल एव्हढेच पाणी द्यायचे म्हणजेच सर्वांना समन्यायाने मिळेल, ४–५ जणांचे कुटुंब म्हणजे २–२।। एकर जमिनीला पाण्याची हमी मिळाल्याने, त्यांना लागणारे अन्नधान्य उत्पादित करून वर्षभराचा चरितार्थ चालवू शकेल, तो अंमलात आणला. शिवाय बांधावरची भाजीपाला, कडधान्येही वेगळीच !

ह्याच अनुभवातून १९७८ मध्ये हिवाळी अधिवेशनात आमदार वसंत उपाध्ये (नाशिक) ह्यांनी 'महाराष्ट्र राज्य कृषि–सिंचन आयोग' नेमण्याचा प्रस्ताव दिला, त्या अनुषंगाने विलासरावांनी आधी नेमलेल्या प्रा. वि. म. दांडेकर, दत्ता देशमुख, वि. रा. देऊसकर ह्यांचे कमिटीपुढे अ) महाराष्ट्रापुरते पाण्याचं राष्ट्रीयीकरण व सामाजिकीकरण, आ) शासकीय प्रकल्प व्यावसायिक पद्धतीने चालविणे, इ) पीक नियोजन व जल संधारण, ई) पाण्याचे सुयोग्य वाटप, वाटल्यास रेशनिंगही, उ) प्रवाही सिंचनाबरोबर उपसा सिंचन योजनाही घेणे इ. मुद्दे मांडले.

ह्याच सुमारास १९६४ मध्ये भुलेश्वर नाल्यावर पाझर तलाव बांधला होता, पण त्यातील ४० अल्पभूधारक ऊंचावर होते त्यांना पाणी मिळत नव्हते. विलासरावांनी त्यांचेशी प्रयत्न करून 'पाणी पंचायत' द्वारे वेगळा प्रयोग केला. ५० टक्के सरकारी अनुदान, ३० टक्के ग्रामगौरव कडून परतफेडीचे बिनव्याजी कर्ज व उर्वरित २० टक्के लाभधारकाचे त्यामुळे सर्वांच्या सहभागाने हे उद्दिष्ट साध्य करण्यात आले. हाच फॉर्म्युला पुढे सर्वांचा सहभाग म्हणून लागू झाला. अशा अनेक योजना मार्गी लावल्या, शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर सर्वांनी एकोप्याने प्रयत्न करून स्वावलंबी बनविणे व त्यासाठी समान पद्धतीने पाण्याची शाश्वती हे धोरण अंमलात आणले. हे करतांना कित्येक ठिकाणी वीज कनेक्शन न

मिळणे, स्वार्थी धनदांडग्यांचा विरोध, ज्यांच्या जमिनी जलाशयाच्या जवळ आहेत त्यांचा अतिरिक्त उपसा अशा अनेक अडचणींवर मात केली. कांही योजना – जय मल्हार उपसासिंचन योजना – धालेवाडी, रेणुका उपसासिंचन – माहुर, बाबादेव उपसा सिंचन – शिंदेवाडी, बाबावाडी प्रकल्प – पिसर्वे इ. त्यामुळे १९७९–१९८४ ह्या काळांत पुरंदर तालुक्यात जवळजवळ १०० योजना राबविण्यात आल्या. मध्यंतरांत त्यांनी राजकारणात प्रवेश करून 'राष्ट्रीय पाणी पंचायत पक्षाची' स्थापना करून १९८५ मध्ये विधानसभा निवडणूक लढविली, पण पराभवाला सामोरे जावे लागले. अभियांत्रिकीतील विद्यार्थ्यांना प्रेरणा देऊन त्यांच्या ज्ञानाचा समाजाला उपयोग करून देणेचे दृष्टीने आवाहन केले. त्यातून संतोष जोंधळेकर ह्यांची 'गंगोत्री' प्रसाद सेवेकरी ह्यांची 'योजक', प्रसाद रसाळ 'टेकएंड' आणि निलेश कुलकर्णी 'ड्रॉप' अशा प्रकारच्या स्वयंसंवी संस्था उभारल्या गेल्या. असाच DPAP च कार्यक्रम आदिवासी क्षेत्रात ठाकूरवाडी आंबेगाव तालुक्यात उभा राहिला.

**४. पाण्याची दशा व दिशा :**

स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनी सुद्धा पाणी प्रश्न भेडसावत आहे. भारतात पाणी पुरेसे उपलब्ध् आहे. गेल्या २०० वर्षात स्थायिक झालेल्या वस्त्या, शहरे हे पाण्याचे अनुषंगाने वाढल्या, विस्तारल्या व त्यातूनच खात्रीच्या स्त्रोताकडून म्हणजे मुख्यत: धरणापासून, बारमाही नद्यांतून व खात्रीच्या भूजल साठ्यातून उपसा केला जाऊ लागला पण, भारत हे लहरी मान्सूनचे अपत्य असल्याने पाहिजे तेंव्हा, पाहिजे तेथे पडेलच असे नाही. ही विषमता जीवघेणी ठरत आहे. जेथे खात्रीने पाणी मिळते किंवा कित्येक दुष्काळी भागात सुद्धा केळी, ऊस, साखर कारखाने, भात, कापूस अशी नगदी पिके अनियंत्रित पद्धतीने घेतली जात आहे, तेथेच निसर्गनिर्मित परावलंबन व त्यात भर मानवनिर्मित राजकीय गणितानुसार अव्यवहार्य पाणी उपसा ! आज जवळजवळ ७५–८० टक्के पाणी शेतीसाठी, १२–१५ टक्के नागरी पिण्यासाठी, ४–५ टक्के औद्योगिक वापर व २–३ टक्के पर्यावरणीय गरज असे आहे. भारताची यथायोग्य गरज भागविण्यासाठी शेतीतील पाणी वापर सुधारणा १५–२० टक्के अमलात आणल्या तरी खूप पाण्याची बचत होईल. त्यासाठी स्प्रिंकलर, ड्रीप इरिगेशन, शेडनेट, पिक नियोजन, नलीकांचेद्वारे वितरण, अतिवापर नियंत्रित करणे इ. उपाय योजावे लागतील. त्याचबरोबर शहरी पिण्याचे पाण्याबाबत गळती थांबविणे, सांडपाणी पुनर्वापर ह्याद्वारे व औद्योगिक वापरावर निर्बंध घालून हा प्रश्न सुटू शकेल.

स्वातंत्र्यानंतर लोकसंख्या एकदम झपाट्याने वाढली नव्हती व पहिल्या ३–४ पंचवार्षिक योजनातून भाक्रा नांगल, काक्रापार, दामोदर, हिराकूड, शरावती, कोयना, जायकवाडी, उजनी असे अनेक प्रकल्प हाती घेतले गेले. त्यामुळे पाणीसाठा वाढला, प्रश्न सुटण्याची आशा निर्माण झाली होती. नेमके ह्याच काळात वेळच्या वेळी विलासरावांनी (१९७०–२०००) दूरदृष्टीने पाणी उपलब्ध होत आहे, पण ते लाभार्थ्यांना म्हणजे गरजवंत शेतकरी ह्यांना कसे उपलब्ध होईल आणि त्याचवेळी लाभदायक पिकांना म्हणजे अति पाणी पिणारी पिके ह्यांना कसे नियंत्रितपणे मिळेल ह्यावर उपाय शोधले होते. जो पर्यंत अति पाणी वापरणारे व गरजू ह्यात फार दरी नव्हती तेव्हांच 'समन्यायी पाणी वाटप' हे सूत्र अमलात आणले असते तर आज जरा तरी चित्र सुधारले असते. आज महाराष्ट्रात ११५ खाजगी व १३१ सहकारी असे जवळजवळ २५० साखर कारखाने नव्हे आमदार कारखाने कार्यरत आहेत. त्यातून ह्या वर्षी १३२ लाख टन म्हणजे देशाच्या ४० टक्क्याहून अधिक साखर उत्पादन झाले आहे. त्यातील ८५ टक्के वापर व्यावसायिक कारणासाठी व मानवी खाद्य वापर म्हणून १५ टक्के आहे. महाराष्ट्रात साखरेसाठी उत्तरप्रदेश, कर्नाटक ह्यांचे मानाने १५–२० टक्के पाणी जास्त लागते, म्हणजेच महाराष्ट्रातील जलाशयाचे ७० टक्के पाणी एकटा उस पितो ! ह्याचा विचार करतांना 'पाणी पंचायत' किंवा 'ग्रामविकास गौरव प्रतिष्ठान' ने वितरित केलेले वाटप धोरण विलासरावांच्या काळापेक्षा आज जास्तच गरजेचे झाले आहे.

**५. विलासरावांची दूरदृष्टी :**

विलासराव म्हणायचे की Water is the dividing line between Prosperity and Poverty त्यासाठी प्रयोग, प्रशिक्षण, विस्तार तसेच प्रसार, सहकार्य आणि बांधिलकी अत्यावश्यक आहे.

विलासराव, शेतकऱ्यांशी त्यांच्या बोलीभाषेत, आपुलकीने प्रेमाने बोलत, त्यांना आपलेसे करीत त्याच्या सर्व शंकाकुशंका दूर करीत त्याचे मत परिवर्तन करीत असत. हेच धोरण वरिष्ठ अधिकारी, तंत्रज्ञ, वैज्ञानिक ह्यांचेबाबतीतही वापरात आणावयाचे. आपला मूळ मुद्दा त्यांनी कधी सोडला नाही पण शहाणपणाचा मक्ता आपणच घेतला आहे अशा हटवादी भूमिकेतून सरकारी अधिकाऱ्यांशी कधीही वागत नसत. अनेक शासकीय समित्या, नियोजन मंडळ, संस्था, एनजीओत ते उपस्थित असले की त्यांचे अस्तित्व जाणवायचे, पण इतरांनी त्यांचे मुद्दे मांडून झाले की विलासराव त्यांना मोठेपणा देत, नंतर धोरणात्मक निर्णय घेतांना विलासरावांचे मन त्यात प्रतिबिंबीत झालेले आढळून यायचे, त्यासाठी संघर्ष, लढा असे आक्रस्ताळे उपाय न वापरता, समन्वय, समझोता, संवाद माध्यम प्राधान्याने उपयोगात आणीत. प्रांजळपणा, साधेपणा, सुसंस्कारित जीवनपद्धती, नितळ व प्रश्नाला मूलगामी भिडणारे विचार ह्यामुळे कोणाशीही चर्चा करतांना त्यांना जोराने, आरडाओरड करून मत मांडण्याची आवश्यकता भासली नाही तर शांतपणे त्यांचे विचार गंभीरपणे नोंद घेतले गेले. आज वीस वर्षानंतरही त्यांच्या विचाराचा ढाचा प्रशासनाला अजून नीट उलगडता आला नाही तर मग त्याची अंमलबजावणी दूरच !

त्यांनी गाव पातळीवर पाण्याची साठवण, समान वाटप, लोक सहभागातून, तालुका / जिल्हा पातळीवर लहान नद्यांवर कोल्हापूर टाईप बंधारे, नदीत, भूमिगत बंधारे, तलाव, छोटेसे जलाशय निर्माण करून त्या स्तरावरूनच नियोजित वाटप पद्धती, मोठ्या धरणांचे सिंचन क्षेत्रात घनपद्धतीने, पाईप, चारी, वाटप सुनियंत्रित करणे व पाणी वापर संस्थामार्फत सर्वांना पिक नियोजनाानुसार वाटप ही सूत्रे मांडली. तरूण इंजिनियर्सना आपल्या कार्यात समाविष्ट करून घेऊन त्यांच्यात सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण केली. भूजलाचा वापर, सेंद्रिय शेती, महाराष्ट्राच्या पाण्याचे न्याय वाटप, त्यासाठी जनहित याचिका, महाराष्ट्र ग्रामीण विकास संस्था परिषद, चिकोत्रा खोरे प्रकल्प, खोरे

निहाय पाणी नियोजन इ. विषयात तीस वर्षांत अनुभवांची वॉटर बँक निर्माण केली.

मुलांची प्राथमिक शिक्षण, नायगाव, पुनःहडपसर व पुढील माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षण व व्यवसायात पदार्पण हे सर्व त्यांचे विचाराने कल्पनाताईंनी असिधारा व्रताने पूर्ण केले. विलासरावांनी शेती आणि पाणी सांभाळले आणि संसारात कल्पनाताईंनी आयुष्यभर विलासरावांना सांभाळले ! त्यांचा निश्चयीपणा, कष्ट मेहनत उपासणे, पराभवात सुद्धा माघार न घेता यश मिळविणेपर्यंत धडपडणे ह्या गुणांना पूरक सहभाग दिला. ॲक्युरेट विस्तारले, विक्रम वाणिज्य शाखेत पदवीधर झाला, आदित्यने इंजिनियरिंग आणि सोनालीने आयुर्वेदात पारंगतता मिळविली 'वन स्ट्रॉ रेव्होल्यूशन' चे कार्व्हर त्यांचे आदर्श, तुकाराम महाराज गुरूसमान, स्वानुभव ही गीता – ज्ञानेश्वरी आणि सर्व शेतकरी, श्रमिक हे ह्यांच्या दिंडीतील वारकरी – समसमान !

**६. आजकालच्या चंगळवादावर – त्यांची शिकवण :**

स्पेनमधील व्हेलेन्शिया गावातील तुरिया नदीच्या कालव्यावर सुमारे १८०० जमिनीवर समन्यायी व परिणामकारक जलवयवस्थापन प्राधिकरणामार्फत हेते, ते हजार वर्ष कार्यरत असून तेथील जलन्यायालय तटे–बखेडे एकोप्याने सोडवते. हे जागतिक स्तरावरील उदाहरण आणि तीस वर्षांच्या उमेदीतील विलासरावांचे समन्यायी वाटप पद्धती अंमलात आणण्यासाठी धोरण, अंमलबजावणी, प्रयोग, निष्कर्ष, त्यावरून उचित बदल, त्यातूनच मिळालेले तंत्रज्ञान व पुढील प्रवासासाठी निर्माण केलेले मंत्रशास्त्र हा प्रवास थक्क करणारा आहे. पण कोणताही व्हिजनरी हा मार्ग दाखवून देतो, त्या मार्गाने प्रगती करण्याचे कार्य त्यांच्या बरोबरच्या समविचारी बांधवांना करावे लागते. देशभरात म. गांधीनंतर एवढी मोठी चळवळ डॉ. शरद जोशींनी शेतकरी संघटना स्थापून केली, जयप्रकाश नारायण ह्यांची समग्र क्रांती, विनोबा भावे ह्यांची भूदान यात्रा, आनंदराव पाटील ह्यांचा चिकोत्रा, मणिभाई देसाई, भारतीय कृषि प्रतिष्ठान, अशा अनेक आदर्श प्रणाली गेल्या अर्ध्या शतकात निर्माण झाल्या, त्या त्या काळांत त्यांना प्रचंड यश मिळाले, पण 'पालथ्या घडयावर पाणी' ह्या म्हणीप्रमाणे स्वार्थी राजकीय नेत्यांनी त्यांना 'सरकारी संत' बनविले. पद्मश्री, पद्मभूषण असे सन्मान, त्यांच्या संस्थाना देणग्या, त्यांच्या पुस्तकांची खरेदी करून उपकृत केले व त्यांच्या प्रकाशांत आपले चेहरे उजळून घेतले.

गेल्या ४०००–५००० वर्षांच्या मानवी उत्क्रांतीत इजिप्त, मेसापोटोमिया ह्या पाश्चिमात्य संस्कृती, मध्यावरील युरोपियन आणि भारत, सिलोन, जपान, चीन ह्या पौर्वात्य आशियायी संस्कृतींचा विकास झाला, पण इ. स. १५०० नंतर युरोपमधील स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ह्या फ्रेंच राज्यक्रांती नंतर तसेच औद्योगिक, तांत्रिक, वैज्ञानिक क्रांतीमुळे युरोप प्रगती पथावर गेला. भारत त्या काळात प्राचीन उज्वल इतिहासात रममाण राहिला, त्यातून मुघल व इस्लामिक आक्रमणे व नंतर इंग्लंडची १५० वर्षे ह्यातून अधोगती झाली. त्याच काळांत ४०० वर्षापूर्वी अमेरिकेसारख्या विस्तिर्ण खंडावर वसाहत वाढू लागली. अमेरिका एक 'मेल्टिंग पॉट' बनला आणि कष्ट करणाऱ्या सर्वांना आश्रयदाता होऊन आज महासत्ता बनली आहे. ह्यात बाह्य देशातील व्यक्तींचे योगदान आहे. पण मूळ मुद्दा त्यातून प्रचंड ऐहिक साधन संपत्ती निर्मिती झाली व आज त्या श्रीमंतीतून अजीर्ण बाहेर पडत चालले आहे. त्यांना अध्यात्मिक वा एक संस्कृती असे बंधन नसल्याने पाश्चिमात्य देशात आज वाढलेला चंगळवाद, ऐहिक शोषण, गरीब–श्रीमंतातील वाढती दरी, निद्रानाशक औषधांचा वाढता वापर, व्यसनाधीनता, तुसडेपाणा ह्यांचे चित्र दिसते. आपल्या देशात त्याचे अंधानुकरण करून जो बदल उघड्या डोळ्यांना दिसत आहे, त्यावर वर उल्लेख केलेल्या नेत्यांच्या दिशादर्शक धोरणांची पुनर्मांडणी करून नुसत्या जीडीपी वाढीच्या परिभाषेत न बोलता 'मानवी आनंद निर्देशांकात' कशी वाढ होईल हे पाहिले पाहिजे.

त्यासाठी विलासरावांनी समाजाला नेतृत्व देणेपूर्वी स्वतःचीच जडणघडण कशी केली, आयुष्यभर आचरण कसे ठेवले व जीवन देशाला कसे समर्पित केले ह्याचा खोलवर नव्याने विचार करावयास हवा आहे. जमीन व पाणी हक्काचे असे नुसते न म्हणता लोकशाही प्रणालीत 'हक्क', कर्तव्य व जबाबदारी येते, आपण प्रत्येकजण हक्काबाबत जागरूक असतो पण त्यासमवेतच्या कर्तव्यात कसूर केली जाते. अशावेळी हक्काचा अट्टाहास न धरता सर्वांचा विचार करून आपल्याला न्यायार्जित कसे मिळेल, वाटप नुसते 'समन्यायानेच' नव्हे तर 'समन्वयाने' म्हणजे खोऱ्यातील वाडी, वस्ती, गांव, शहर ह्यांनी एकत्रपणे समजून उमजून दुसऱ्यांच्या गरजेचा विचार करून त्याचबरोबर गुरे–ढोरे, शेळ्या–मेंढया, मासे इ. प्राणीमात्र, वेगवेगळी पिके, धान्य ह्यांची आवश्यकता विचारात घेऊन उद्याच्या पाण्याचे नियोजन केले पाहिजे. हे कार्य दर्याद्रबुद्धीने किंवा उपकारकर्त्यांचे भूमिकेतन नव्हे तर मुलाबाळांच्या पुढच्या पिढीसाठी केलेली गुंतवणूक म्हणून समजावे लागेल. विलासरावांनी ह्या मूलभूत गोष्टींच्या वापराला मानवी चेहरा दिला, नुसते ऐहिकतेचे मागे न लागता, 'सर्वे सहनः भुनक्तु' वा आता विश्वात्मके देवे ह्या नीतीने सर्वांगीण व एकात्मिक समान वाटप, सुयोग्य वापर व सर्वांना योग्य उत्पादन ह्या त्रिसूत्रीने घडविले. आज ह्या त्रिसूत्रीची गरज जास्तच निर्माण झाली आहे.

**७. विलासरावांचे जीवन व जलक्रांतीच्या नव्या पाऊलखुणा :**

विलासरावांनी तीस वर्षांत शेती आणि जलनीती ह्यात जी दिशादर्शक आदर्श तत्वे सुचविली, त्याप्रमाणे स्वतः अंमलात आणली व पुढच्या पिढीला वारसा दिला, त्याची आजच्या वास्तव काळांत त्यांच्या काळापेक्षा अनेक पटीने गरज वाढली आहे. स्वातंत्र्यानंतरचा तो भारलेला व भारताच्या सर्व क्षेत्रात प्रगतीचा काळ होता. स्वातंत्र्य चळवळीच्या धगीतून वर आलेले नेते व जनता होती पण गेल्या ३०–४० वर्षांत समृद्धीची फळे काहींनी ओरबडून मिळविल्यामुळे अनेक जण भुकेले राहू लागले आहेत. वैज्ञानिक प्रगतीने, कॉम्पुटर तंत्रज्ञानाने जग जवळजवळ येत चालले आहेत अशा वेळी आपणही बाह्यजगतातील अनुभव आपल्याकडे उपयोगात आणू शकतो. अमेरिकेतल्या ऐहिक समृद्धी व चंगळवादावर लिहिले आहे, पण ती प्रगती करतांना अमेरिकेतही ॲरिझोना, नेवाडा सारखी राजस्थानपेक्षा जास्त वाळवंटी प्रदेश किंवा सिएटेलसारख चेरापुंजीसारखा वर्षभर पाऊस असणारा किंवा मिशिगनसारखा वर्षातील ३–४ महिने बर्फमय प्रदेश ह्यावर समयोजित उपाय करून तोंडमिळवणी केली. आपण त्यांना नुसते दूषणे

देत न बसतां, त्यांच्याकडून आपल्या देशासाठी सुयोग्य उपाय आहेत ते करावयास पाहिजेत. महाराष्ट्र दुसरा जलसिंचन आयोगाचे वेळी डॉ. माधवराव चितळे ह्यांचेशी विलासरावांनी ४ तास चर्चा केली. त्यावेळी त्यांनी विलासरावांना समन्यायी पाणी वाटप, जमिनीवर अंमलात आणणे कसे अवघड आहे, ते समजावून सांगितले. डॉ. चितळे साहेब हे ह्या क्षेत्रातील जाणकार व निस्वार्थी नेते, अनेक योग्य संकल्पना पाठबळ देणारे पण नंतर त्यांनी चिकोत्रा प्रकल्पाचेवेळी आनंदराव पाटील व विलासरावांना शाबासकीही दिली. त्यामुळे आजच्या कंप्युटरचे काळातही समन्वयाने पाणी वाटप कसे करता येईल ते अमलात आणावे लागेल. क्युसेक, टीएमसी, घनमीटर, लिटर्स ही पाण्याची वस्तु (Physical) आणि जलवैज्ञानिक (Hydrological Quantity) म्हणून मोजमापे करण्याची परिमाणे आहेत मूळ पाणी हे सामाजिक (Social) आणि आर्थिक (Economical) जलतत्व आहे. ह्यादृष्टीने संसाधन म्हणून प्राधान्याने विचारात घ्यावे लागेल, ते करायला लागलो की मग वरील मोजमापे ही नुसती परिमाणे म्हणून येतील व विलासरावांनी दर्शविलेली जलनीती मानवतेच्या अंगाने विस्तारली जाईल. हे कठीण आहे पण अवघड नाही त्यात जर कालसुसंगत बदल करून अंमलात आणले तर वीस वर्षांपूर्वी त्यांनी जी समाजाची जडण–घडण केली ती चिरंजीवी वा कालायीत ठरली असे जाणवेल. तीच त्यांचेप्रती आदरांजली !

# माणशी अर्धा एकर पाणी

## महाराष्ट्राला न झेपलेली संकल्पना

**श्री. प्रदीप पुरंदरे - मो : ९८२२५६५२३२**



**प्रास्ताविक :**

माणशी अर्धा एकर पाणी ही विलासराव साळुंखे यांनी महाराष्ट्राला दिलेली एक मोलाची भेट! ऊस–बाधा आणि साखर–करणीने पछाडलेल्या राज्याला ती झेपली नाही. अपात्री दान ठरलेल्या त्या संकल्पनेचा आणि ती अंमलात आणण्यासाठीचे माध्यम असलेल्या पाणी पंचायत चा काही तपशील या लेखात दिला आहे. विलासरावांना प्रिय असलेल्या तुकोबांच्या शब्दात सांगायचे झाल्यास 'करविली तैसी केली कटकट, वाकडी की नीट देव जाणे'

**विलासराव समजणे महत्वाचे :**

विलासरावांच्या कार्य–कर्तृत्वाचे आकलन करून घ्यायचे असेल तर प्रथम विलासराव हे रसायन काय होते ते समजायला हवे. विलासराव ग्रामीण भागातून आलेले. शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. वारकरी संप्रदायात ते लहानाचे मोठे झाले. स्वामी विवेकानंद आणि तुकाराम महाराज यांच्या विचारांनी ते प्रभावित झालेले होते. समन्यायाची त्यांची संकल्पना अध्यात्मातून विकसित झाली होती; डाव्या अथवा उजव्या 'BP' मधून ती आली नव्हती. एक मनस्वी तरुण, उत्तम अभियंता, यशस्वी उद्योजक आणि तळमळीचा सामाजिक कार्यकर्ता अशा विविध भूमिका लीलया पार पाडत विलासराव घडत गेले. प्रवाहा विरुद्ध पोहत समन्यायी पाणी वाटपाचा किनारा गाठण्यासाठी आयुष्यभर त्यांनी अथक प्रयत्न केले. पाणी प्रश्नाला प्रामाणिकपणे सामोरे जाताना जे भोवरे त्यांनी पाहिले, ज्या अनाकलनीय लाटा अंगावर घेतल्या आणि जी अगम्य वळणे अनुभवली त्यातून सामाजिक–विचार–प्रक्रियेत आमुलाग्र बदल घडवून आणणारी संकल्पना त्यांनी मांडली. प्रत्यक्ष कृतीवर त्यांचा भर होता. चाळीस एकरावर प्रयोग करून त्यांनी पडीक जमीन उपजाऊ केली. त्यातून साकारली माणशी अर्धा एकर पाण्याची संकल्पना. पाच जणांच्या कुटुंबाला अडीच एकर पाण्याची शाश्वती मिळाली तर किमान उपजीविकेचा प्रश्न सुटतो हे त्यानी दाखवून दिले. बारमाही व नगदी पिके नकोत. खरीप व रब्बी हंगामातील भुसार/ अन्नधान्याच्या पिकांना किमान आवश्यक सिंचन वेळेवर मिळायचे असेल तर त्याकरिता पाण्याचे समन्यायी वाटप हवे. पाणी हक्क जमीनीच्या मालकी पासून अलग केले पाहिजेत. सर्वांना पाणी मिळावे म्हणून अडीच एकर पाणी ही मर्यादा हवी. फक्त जलसाठे वाढवण्याने नाही तर त्यांच्या व्यवस्थापनातून दुष्काळ मुक्ती शक्य आहे. विलासरावांच्या मांडणीचे हे सार! त्यातील बारकावे पाहणे उद्बोधक ठरावे!

**माणशी अर्धा एकर पाणी म्हणजे नक्की काय ?**

पाणी पंचायतच्याच एका प्रकाशनात दिलेले उदाहरण जास्त सोप्या भाषेत खाली दिले आहे.

- यशवंतच्या मालकीचे एकूण क्षेत्र १० एकर आहे. त्याच्या कुटुंबात चार जण आहेत. ' माणशी अर्धा एकर पाणी' या हिशेबाने त्याला मिळेल २ एकर पाणी (म्हणजे ४ व्यक्ती गुणिले माणशी अर्धा एकर पाणी) त्याची बाकी आठ एकर शेती पावसावर अवलंबून राहील.
- पाण्याचे वाटप दरडोई असल्यामुळे गोविंदच्या मालकीचे क्षेत्र २ एकर असले तरी त्यालाही २ एकर पाणी मिळेल. कारण त्याच्या कुटुंबातही ४ व्यक्ती आहेत.
- पाणी घनमीटर मध्ये मोजतात. एकर किंवा हेक्टर मध्ये नाही. त्यामुळे

१००० घमी/व्यक्ती/वर्ष या प्रमाणे यशवंत आणि गोविंद दोघांनाही प्रत्येकी ४००० घनमीटर पाणी मिळेल.

▪ एका पाणीपाळीत एका हेक्टरवर १००० घनमीटर पाणी म्हणजे १०० मिमी सिंचन–खोली

▪ पाच माणसांच्या कुटुंबाला जास्तीत जास्त अडीच एकर जमीनीसाठीचे पाणी ५००० घनमीटर. म्हणजे एकूण सिचन–खोली झाली ५०० मिमी. १०० मिमीच्या पाच पाणी–पाळया.

हा सर्व तपशील खालील तक्यात दिला आहे.

| नाव | जमीन धारणा एकर | कुटुंबातील व्यक्तीं (संख्या) | पाणी–हक्क | | सिंचन–खोली (मिलीमीटर) |
|---|---|---|---|---|---|
| | | | माणशी अर्धा एकर प्रमाणे | घनमीटर (१००० घमी/व्यक्ती/वर्ष) | |
| यशवंत | १० | ४ | २ एकर | ४००० | ५०० |
| गोविंद | २ | ४ | २ एकर | ४००० | ५०० |

**माणशी अर्धा एकर पाणी – इतर तत्वे**

▪ केळी,उस, इत्यादी जास्त पाणी लागणारी पिके घ्यायची नाहीत.

▪ भूमिहिनाना पाण्याचा हक्क – मोठ्या शेतक–यांनी भूमिहिनाना खंडाने जमीन द्यावी. भूमिहीन त्या जमीनीवर आपला पाणी–हक्क वापरतील.

▪ पाण्याचा हक्क सामुदायिक; जमीन धारकाचा नाही. सिंचनाचा लाभ मिळणारी जमीन विकली तर तीच्यावरील पाण्याचा हक्क विकला जाणार नाही. नवीन जमीन धारकाला योजनेचे शेअर्स घ्यावे लागतील

▪ पाणी ही राष्ट्रीय संपत्ती आणि गाव हे जल व्यवस्थापनाचे एकक.

▪ समन्यायी वाटप आणि पाणी पंचायत ही राजकीय प्रक्रिया आहे.

▪ पाणी हे सामायिक संसाधन! त्याचे समन्यायी वाटप हे मुख्य सूत्र!!

**पाणी पंचायत – संस्थात्मक बाबी**

ग्राम गौरव प्रतिष्ठानचा भर अनौपचारिक सहभागावार होता. त्यामुळे पाणी पंचाईतींची सहकारी संस्था म्हणून नोंदणी केलेली नाही. फक्त पाच जणांची समिति नेमली जाते. त्यालाही संस्थात्मक स्वरूप नाही. लोकांनी गट करावा, पंचायत नेमावी, एक गट प्रमुख निवडावा, पाटक–याची नेमणूक करावी, नियम अनौपचारिक असावेत. क्लिष्ट Byelaws नकोत. निवडणुका नकोत. योजनेची आखणी व कार्यवाही लाभधारकच करणार. उपसा सिंचन योजनेचा २०% खर्च लाभधारकांनी नगदी स्वरुपात करायचा ; ग्राम गौरव प्रतिष्ठान ८०% खर्च करेल. ग्राम गौरव प्रतिष्ठान फक्त facilitator आहे. पाणी पंचायत उभी करायला तांत्रिक व आर्थिक सहाय्य करणे आणि संस्था एकदा मार्गी लागली की त्यातून बाहेर पडणे ही संस्थेची भूमिका आहे. संस्था ताब्यात ठेवणे हा हेतू नाही. संकल्पना महत्वाची; replication नाही!

**पाणी पंचायत यशस्वी होण्यामागे खालील कारणे आहेत**

▪ बहुतेक सर्व सदस्य अल्प व सीमान्त शेतकरी आहेत. साधारण एकाच सामाजिक–आर्थिक परिस्थितीतून आलेले असल्यामुळे त्यांचे आपसात ब–यापैकी जमले

▪ सरासरी सदस्य संख्या मर्यादित असल्यामुळे कार्यक्षमता वाढली.

▪ कोणी सदस्यत्व सोडून गेले असे काही झाले नाही

▪ ग्राम गौरव प्रतिष्ठान ने प्रशिक्षित केलेल्या पाटक–यांनी उत्तम कामगिरी बजावली.

▪ पाण्याची आपली स्वतंत्र व्यवस्था करून कोणी संस्थेतून बाहेर पडले नाही

▪ संस्थांची आर्थिक कामगिरी उत्तम राहिली. ग्राम गौरव प्रतिष्ठानचे कर्ज फेडले गेले, वीज बिल भरले नाही म्हणून वीज पुरवठा खंडित झाला नाही.

**शासकीय औदासिन्य :**

सुरूवातीला स्थानिक शासकीय अधिकारी, उद्योजक, मध्यमवर्गीय यांनी कौतुक केले, पाठिंबा दिला, आर्थिक मदत केली. शासकीय धोरणे आणि शेतक–यांना दिलेल्या विविध सोयी–सवलती/ अनुदाने यांचा फायदा ग्राम गौरव प्रतिष्ठानला झाला. शासनाने प्रतिष्ठान ला स्वतंत्र अशी मदत कधी केली नाही. पाणी पंचायत चा विचार स्वीकारला आणि पाणी पंचायती सर्वत्र व्हाव्यात म्हणून प्रयत्न केले असे ही कधी झाले नाही.

**या पुढे काय ?**

हवामान बदल, धरणांचे म्हातारपण, महापुराचा वाढता धोका, जल व्यवस्थापनाचा अभाव, देखभाल–दुरुस्तीकडे दुर्लक्ष आणि कायद्यांची अंमलबजावणी न करण्याचे शासकीय धोरण या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात पाणी प्रश्नावर नव्याने विचार मंथन होण्याची गरज आहे. ग्राम गौरव प्रतिष्ठान ने पुढाकार घेऊन ते घडवून आणावे ही विनंती.


**लेखकाची ओळख**

▪ शिक्षणाने जल व्यवस्थापनाचा अभ्यासक असलेला स्थापत्य अभियंता ▪ व्यवसायाने (सेवानिवृत्त) सहयोगी प्राध्यापक, जल व भूमि व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद ▪ माजी सदस्य, मराठवाडा (वैधानिक) विकास मंडळ. ▪ सिंचन कायदे विषयक अनेक राज्यस्तरीय शासकीय समित्या व अभ्यास गटांत योगदान. ▪ सिंचन नोंदी (१९९२), विधिलिखित (२०१४), पाण्याशप्पथ (२०१७) ही पुस्तके प्रकाशित. ▪महाराष्ट्र फाउंडेशन(अमेरिका),पाणी–पंचायत व ग्राम–गौरव या संस्थांचे २०२० सालचे पुरस्कार प्राप्त

ब्लॉग : jaagalyaa.in आणि kinchitkavi.blogspot.com

Mobile: 9822565232, E-Mail: pradeeppurandaregmail.com

*****




उपलब्ध सुविधा आणि प्रशिक्षणाची सोय



परिसरातील वृक्ष संपदा




छत्तीस गुणी सेंद्रिय शेती



भोजनाचा लाभ घेत असलेले प्रशिक्षणार्थी



अतिथी गृहाचे नवीन होत असलेले बांधकाम



शास्त्रोक्त गोपालन

# अस्वस्थ समाजभान

**श्रीमती कल्पना साळुंखे**

**मो : ९९७०४६९१९१**



आज आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या घटनांचे विश्लेषण केले असता सर्वत्र एक अस्वस्थता, असुरक्षितता, भयगंड, अनिश्चितता प्रकर्षाने जाणवते आहे. जागोजागी होणाऱ्या युध्दामुळे मानवजात भौतिक संपत्ती आणि निसर्ग यांचा संहार, धर्माच्या नावाखाली संघटित होवून वेगवेगळ्या धर्मांची वाढती असहिष्णुता, जागतिकीकरणाच्या झेंड्याखाली दृढ होत चाललेली भोगवादी संस्कृती, या सर्व आक्रमणांचे नैसर्गिक साधनसंपत्तीवर होणारे दूरगामी दुष्परिणाम आणि स्थितप्रज्ञाच्या भूमिकेमधून या सगळ्या अतिक्रमणांना, अतिवृष्टी, अनावृष्टी, अकाली वृष्टी, नैसर्गिक आपत्ती इत्यादी प्रतिक्रियांद्वारे उत्तरे देणारा निसर्ग ! आजपर्यंतच्या पृथ्वीच्या इतिहासामध्ये मानवजातीचा इतका दिशाहीन, अतिवेगाने होणारा ऱ्हास इतक्या प्रकर्षाने क्वचितच जाणवला असेल. विज्ञानाच्या सहाय्याने माणूस निर्माण होणाऱ्या सर्व समस्यावर मात करण्यास समर्थ आहे, असा टोकाचा विश्वास माणसाला एकूण जीवसृष्टीच्या शाश्वत अस्तित्वासंबंधात असहिष्णु बनवत आहे. एका बाजूला विज्ञान आणि भांडवल यामधून निर्माण होणारी शक्तीकेंद्री व्यवस्था आणि दुसऱ्या बाजूला ज्या नैसर्गिक संसाधनांवर बहुसंख्य दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्या लोकसंख्येचे भरणपोषण अवलंबून आहे, त्याचा जलदगतीने होणारा ऱ्हास, अशा कैंचीमध्ये मानवसमूह अडकला आहे.

आज भारतात अनेक राजकीय पक्ष त्यांच्या राजकीय विचारसरणीनुसार आणि धर्मजातीपंथ यावर आधारित गटबाजीनुसार सवतेसुभे स्थापून बसलेले असले तरी देशाच्या अर्थकारणामध्ये दोनच विकास प्रणाली एकमेकांना पर्यायी अथवा समांतर काम करताना दिसतात. पहिली म्हणजे सर्व नैसर्गिक साधन – सामुग्री, सुविधा आणि उपलब्ध असलेले तंत्रज्ञान, भांडवल व बौध्दिक कौशल्ये यांचा जास्तीत जास्त वापर करून बाजारपेठेच्या कक्षा रूंदावत नेणे, जास्तीत जास्त उत्पादन क्षमता निर्माण करणे आणि उपभोगाची क्षितीजे रूंदावणे, समाजाचा एक मोठा घटक या प्रक्रियेमधून अलग राहिला , तरी त्याचे सोयरसुतक या विकासाप्रणालीला असत नाही. या व्यवस्थेत किंमत उत्पादन खर्चावर आधारित न राहता बाजारपेठेच्या मागणीप्रमाणे वस्तूंची, सेवांची किंमत ठरविली जाते. जी उत्पादन व्यवस्था जास्तीत जास्त भांडवल प्रधान व केंद्रीत, तीच या प्रक्रियेत परिणामकारक ठरते. बहुराष्ट्रीय भांडवदार कंपन्याच या व्यवस्थेत फोफावू शकतात. या व्यवस्थेच्या दृष्य व अदृष्य पर्यावरणीय परिणामांचा हिशोब मात्र कुठेच मांडला जात नाही.

परिस्थितीच्या रेट्यामुळे आणि या व्यवस्थेला जखडल्या गेल्यामुळे बहुजन समाजाची पर्याय शोधण्याची शक्ती, इच्छा आणि विश्वास गमावलेला आहे. वास्तविक ज्ञान व भांडवल यांचे जागतिकीकरण उत्पादन व उपभोग याचे विकेंद्रित व्यवस्थेमधून विकेंद्रीकरण आणि ते सुध्दा स्थानिक नैसर्गिक संसाधने, जमीन, हवा, पाणी यांचे संवर्धन व पोषण करीत हीच विकासाची पर्यायी चिरस्थायी निती आहे. या व्यवस्थेत मानवी शारीरिक व बौध्दिक कौशल्यांना पूर्ण वाव व न्याय मिळू शकतो. ही दुसरी व्यवस्था निर्माण करण्यामध्ये विस्कळीतपणा, नेमकेपणाचा अभाव, उत्पादन साधनांची अशाश्वती आणि बाजारपेठीय कमकुवत साखळी यावर मात करणे जरूरीचे आहे. परंतु कमीत कमी भांडवली गुंतवणूक करून मोठ्या लोकसंख्येला उत्पादक रोजगार निर्मितीची क्षमता असलेली ही व्यवस्था आहे. विकसनशील देशांमध्ये गेल्या पन्नास वर्षात वाढलेल्या लोकसंख्येचा भार आणि नैसर्गिक संसाधनाचा ऱ्हास यामुळे ही व्यवस्था मोडकळीस आली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरबरोबर त्याच्या परिणामकारक वापरासाठी आवश्यक बदल, शिस्त याचा अभाव आणि या तंत्रज्ञानाचे अपूर्ण ज्ञान यामुळे या क्षेत्रात नियोजनबध्द विकासामधून मोठ्या प्रमाणात भांवडली गुंतवणूक होवून सुध्दा त्याचा फायदा आजपर्यंत थोड्या लोकसंख्येलाच होवू शकला आहे.

अशा परिस्थितीत ज्ञान, विज्ञान, शहाणपण – बुध्दीमत्ता, श्रम–संपत्ती, निसर्ग–सुविधा या गोष्टींचा तारतम्याने मेळ घालून जागतिक सहभावना पण विकेंद्रीत उत्पादन व्यवस्थेची समाजव्यवस्था निर्माण करणे हे आजच्या विचारवंतांसमोर आव्हान आहे. कुठल्याही प्रकारचे प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष अतिक्रमण, माणसा–माणसातील, निसर्ग–माणसातील, समतोल बिघडवून अशांती, अस्वस्थता, निर्माण होण्यास कारणीभूत ठरते. म्हणून या मर्यादा, लक्ष्मणरेषा ठरविण्यासाठी राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील विचार धुरिणांनी सखोल चिंतन आणि प्रयोग करून वेगवेगळी प्रतिमाने विकसित करणे गरजेचे आहे.

*****



# बाबांचे विचार आम्ही पुढे नेत आहोत

**डॉ. सोनाली शिंदे**

**मो : ९८२२०२७४६९**



माझा जन्म १९७२ चा. याच वर्षात महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. माझे वडील विलासराव साळुंखे यांच्या आयुष्याला आणि पर्यायाने सर्व कुटुंबाच्या आयुष्याला कलाटणी देणारे हे वर्ष होते. दुष्काळाचे हे भयाण चित्र यशस्वी उद्योजक असलेल्या माझ्या वडिलांना ग्रामीण भागाकडे घेऊन गेले. सामान्य शेतकऱ्याची व्यथा पाहून बाबांनी दुष्काळ, पाणी, शेती, समाजव्यवस्था, शासन व्यवस्था या सर्वांचा अभ्यास केला. पुण्यातील उच्च राहणीमान आणि बंगला सोडून पुरंदर मधील नायगाव या गावात आम्ही राहायला गेलो. पाच वर्षे जल, जंगल, जमीन, मनुष्यबळ आणि ऊर्जा यांचा वापर करून नायगावच्या ४० एकर माळरानावर नंदनवन फुलवले. नायगाव मॉडेल हे जलव्यवस्थापनाचे केंद्र बनले. १९७५ ते १९८५ या कालावधीत ४२ गावांमध्ये पाणी पंचायतीच्या ५१ योजना सहकारी तत्त्वावर सुरू झाल्या. पाणी पंचायतीची पंचसूत्री मान्य करूनच योजनेला सुरुवात होत असे. या काळात बाबांबरोबर आम्ही सर्व गावांना भेटी देत असू.

लोकांना बोलते करण्याचा हातखंडा बाबांमध्ये होता. लोक प्रश्न करत पण उत्तरे पण त्यांच्याकडेच असत. गरज असते ती फक्त हे सर्व घडवून आणून पूर्णत्वाला नेण्याची, दिशा दाखवण्याची, यासाठी लागणारी तांत्रिक मार्गदर्शन ग्राम गौरव प्रतिष्ठान करत असे. सामुदायिक उपसा सिंचन योजना सुरू करताना सामाजिक अडचणींना अध्यात्मिक मार्गातून उत्तरेही शोधावी लागत. यासाठी बाबांबरोबर नेहमीच तुकाराम गाथा असे. दररोज पहाटे बाबा गाथा वाचत. त्यावर चिंतन मनन करत.

मला आठवते त्यावेळेपासून आमच्या घरात नेहमीच कुठल्या ना कुठल्या गावाच्या पाणी प्रश्नावर चर्चा चालू असे. बाबांचे वैयक्तिक आयुष्य असे काही वेगळे नव्हते पाणी प्रश्नासाठी त्यांनी संपूर्ण जीवन वाहून घेतले. त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला ते तेवढ्याच उत्साहाने पाण्याविषयी सर्व काही सांगत. संध्याकाळच्या वेळी आम्ही सर्व एकत्र बसत असू तेव्हा बाबा आम्हाला अशीच भरभरून माहिती देत. घरचे जेवण आणि तव्यावर भाजलेले खारे शेंगदाणे त्यांना विशेष आवडत.

बाबा नेहमीच कामात असत. व्यवसाय, पाणी पंचायत, प्रवास, लिखाण, निरनिराळ्या सभा यात ते नेहमी समन्यायी पाणीवाटपाचे मत आग्रहाने मांडत. आईने बाबांना खंबीर साथ दिली. व्यवसाय, ग्राम गौरव आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या तिने समर्थपणे पेलल्या. एप्रिल २००२ मध्ये बाबा स्वर्गवासी झाले. २००२ ते २०१२ पर्यंत आईने जुन्नर, खेड, नंदुरबार या आदिवासी भागात पाण्याच्या योजना केल्या. सुपे, भिगवण, पोंढे या गावांमध्ये ही कामे केली. वीणाताई गवाणकर लिखित भगीरथाचे वारस हे बाबांचे आत्मचरित्र पुस्तकरूपात तयार झाले. पुढील अनेक पिढ्यांना हे मार्गदर्शक आहे.

२००९ पासून मी आठवड्यातून एकदा खळद येथे आईबरोबर येऊ लागले. आयुर्वेदाची ओपीडी सुरू केली. २०१२ मध्ये पुन्हा भीषण दुष्काळ होता. पुरंदरमधील गावांमध्ये जनावरांच्या छावण्या आणि टँकर सुरू होते. कुंभारवळण या गावात आम्ही पुन्हा पाणी पंचायतीच्या कामाचा श्रीगणेशा केला. लोकसहभाग, शासन, रोटरी क्लब आणि इतर संस्था या माध्यमातून जलसंधारणाचे काम झाले. २०१२ पासून सालापासून आजपर्यंत कुंभारवळण येथे टँकर लागला नाही. मी लहानपणापासून सर्व पाहिले होते पण कुंभारवळण च्या कामानंतर आत्मविश्वास आला. त्यानंतर पंचक्रोशी ची सर्व जलसंधारणाची कामे संस्थेने केली. तरुणपिढीला पुन्हा एकदा पाणी पंचायतीची ओळख करून द्यावी लागली. आजचा तरुण शेती कसायला तयार नाही. पाणी हे संसाधन नसल्यामुळे कितीतरी जमीन पडीक आहे. आजही लोक शहरात स्थलांतरीत होत आहेत. आजही गावोगावी तेच प्रश्न आहेत मोठा प्रश्न पडतो, आपण खरंच विकास साधला का? करोडो रुपये खर्च करून आजही जिरायत शेतकरी तहानलेलाच आहे. आज आपण तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी मजल मारली आहे. परंतु पाणी नियोजन, पीक नियोजन, प्रक्रिया, शेतीमालाला हमीभाव याबाबत व्यवस्था तोकडी आहे. राज्यकर्ते याच्या मुळाशी कधीच जात नाहीत.

अप्रोप्रिएट टेक्नॉलॉजी इंटर्वेशन यांच्या आर्थिक सहकार्यातून मधून बाबांनी १९८५ मध्ये गोटेमाळ, खळद येथे ग्राम गौरव प्रतिष्ठान संस्थेच्या प्रशिक्षण केंद्रासाठी जागा घेतली. टुमदार प्रशिक्षण केंद्र उभे केले. पाणलोट व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम तयार केला. तंत्रज्ञानाबरोबरच या प्रशिक्षण केंद्रात सर्वांना समतेचे आणि बंधुत्वाचे शिक्षण देणे पण महत्त्वाचे आहे. जिरायत शेतकरी हाच खरा राष्ट्राचा सैनिक आहे. यातूनच पुढे संघटक आणि विशाल दृष्टिकोन बाळगणारे सेवक निर्माण होतील अशी त्यांची खात्री होती.

शाश्वत विकासामध्ये आणि ग्राम गौरव च्या सर्व उपक्रमांमध्ये ॲक्युरेट इंजिनीयरिंग कंपनीचा मोलाचा वाटा होता आणि आजही आहे. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी हे बाबांनी सुरू केलेच होते. पाणी पंचायतच्या योजनांमध्ये महिलांचा सहभाग होताच. महाराष्ट्राच्या दुष्काळाला विलासराव आणि कल्पनाताई यांनी प्रत्यक्ष कृतीतून उत्तर शोधले आहे याचा शासन पातळीवर अवलंब करण्यास एवढी दिरंगाई का? आज महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त धरणे आहेत. मग ७० टक्के जमीन जिराईत का? हे प्रश्न लोकांनी संघटीत होऊन शासनाला

विचारले पाहिजेत.

महाराष्ट्रातील राजकीय उदासीनता, उसासारख्या पिकांना राजाश्रय, शेतमालाला हमीभाव नसणे या महत्त्वाच्या मानवनिर्मित अडचणी आहेत. महाराष्ट्रातील पाणीटंचाई ही निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे. गावातील पाण्याचा ताळेबंद, वनीकरण, जलसंधारण, मृदसंधारण, वृक्षलागवड, पाणी पंचायतीची संकल्पना राबविणे, पाणलोटक्षेत्र विकास हाच ग्रामीण उत्कर्षाचा मंत्र आहे.

बाबांनी समन्यायी पाणी वाटपाचे तत्त्व मांडले. निसर्गाकडून मिळणाऱ्या पाण्यावर सर्व प्राणीमात्रांचा हक्क आहे. सर्वांच्या गरजा भागविण्यासाठी त्यांची समप्रमाणात वाटप झाले पाहिजे. भारतात पाणी प्रश्नावर काम करणाऱ्या कोणत्याही माणसाला विलासरावांना टाळून पुढे जाता येणार नाही.

उदक चालवावे युक्ती आणि महाराष्ट्राच्या जलसंपत्तीचे नियोजन ही विलासरावांची दोन पुस्तके महाराष्ट्राच्या पाणी प्रश्नांची उत्तरे आहेत, याची अंमलबजावणी करणे हे राजसत्तेच्या हातात आहे.

आज आम्ही सर्व ग्राम गौरव प्रतिष्ठानचे कार्यकर्ते बाबांनी दाखवलेल्या पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाचा प्रचार आणि प्रसार करत आहोत. बाबांनी हा विचार पुढील सर्व पिढ्यांना मार्गदर्शक ठरावा म्हणून खळद येथे सुसज्ज शेतकरी प्रशिक्षण केंद्र, सेंद्रिय शेती अभ्यासगट, आयुर्वेद केंद्र कार्यरत आहे. गाव पातळीवर नेतृत्व तयार करण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत. शासन, सामाजिक संस्था, लोकसहभाग, आणि सी एस आर च्या माध्यमातून अनेक गावे शाश्वत विकासाकडे वाटचाल करू शकतात. ग्राम गौरव प्रतिष्ठान येथे माझ्या सक्रीय सहभागाची १३ वर्षे पूर्ण झाली. विधायक कामांसाठी शासनाकडे वेळ, नियोजन, मनुष्यबळ आणि पैसा या साऱ्याचा तुटवडा आहे. निवडणुका प्रचार आणि इतर निरुपयोगी कार्यक्रमांमध्ये बराच काळ निघून जातो. कोविड संकटात तर पुरंदर तालुक्यात सातत्याने दोन वर्षे कुठेच जलसंधारणाची कामे झाली नाहीत. पाण्याचे काम हे अत्यावश्यक सेवेमध्ये यायला हवे. ते थांबवणे म्हणजे विकास थांबवणे आपल्या राज्यकर्त्यांना या काळात दारूची दुकाने उघडायची जास्त काळजी होती.

शहरी आणि ग्रामीण यातली दरी वाढत चालली आहे. तालुका पातळीवर नियोजन आवश्यक आहे. ग्रामीण विकासासाठी पाणी हेच भांडवल आहे. पाण्याचा साठा हीच पाणी बँक आणि बँक सर्वांना पाणीपुरवठा करू शकेल अशी पाणी पेढी ही काळाची गरज आहे. त्याकरिता लागणारी भांडवल व तांत्रिक सहाय्य सरकारने एकत्रितपणे मिळवून द्यावे. जे सरकार याची ग्वाही देईल तेच गरीब जनतेचे कल्याणकारी सरकार असेल. शासनाची ताकद मोठी आहे. केंद्र शासनाकडून ग्रामीण विकासासाठी येणारा पैसा तसाच परत जातो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कागदपत्रे पूर्ण करण्याची क्लिष्टता. शासन पातळीवर कामांची आखणी व्हावी परंतु अंमलबजावणी सामाजिक संस्था आणि लोकसहभागातून व्हावी. पाणी पंचायत कार्यकर्ते आमच्या पुण्यातील घरी मुक्कामी असत. सर्व कार्यकर्ते गावकरी हे बाबांचा एक मोठा परिवार झाला होता. अजूनही पुरंदर मध्ये गावी फिरताना जुने कार्यकर्ते भेटतात आणि बाबांनी केलेल्या कामाचे महात्म्य सांगतात.

ग्राम गौरव प्रतिष्ठान, खळद येथे लवकरच आरोग्य भूमी, ग्रामीण आरोग्य आणि संशोधन केंद्र सुरु करत आहोत. बाबा मला नेहमी म्हणायचे सोनाली तू नुसते पेशंटला बरे करू नकोस, तू त्यांना आजारी पडू नये यासाठी सल्ला आणि मार्गदर्शन कर आणि त्याची फी घे. आयुर्वेदाच्या प्राचीन ग्रंथात ही हेच सांगितले आहे. आरोग्यसेवेसाठी गरीबांची होत असलेली पिळवणूक थांबवण्यासाठी आरोग्य भूमी केंद्र काम करेल. सुदृढ आणि निरोगी समाजाची राष्ट्राची खरी संपत्ती आहे. माफक दरात उत्तम आरोग्य सेवा हे बाबांचं स्वप्न आम्ही लवकरच साकार करू.

ग्राम गौरव प्रतिष्ठान सर्वांगीण ग्रामीण विकासासाठी सतत प्रयत्नशील आहे यासाठी लग्नाला लागणाऱ्या वैचारिक आर्थिक पाठबळाची आम्हाला नेहमीच गरज भासते. आमचे सर्व कर्मचारी, कार्यकर्ते, कुटुंबीय, देणगीदार, शेतकरी बंधू-भगिनी यांच्या सर्वांच्या ऋणात राहून हे कार्य पुढे चालू ठेवण्याची मी ग्वाही देते.


*****



# बाबांचा उद्योग विश्वातील प्रवास

**श्री. विक्रम साळुंखे**

**मो : ९८९००३८१५०**



जेव्हा सोनालीने मला विचारले की, तू बाबांच्या औद्योगिक प्रवासाबद्दल एखादा लेख लिहू शकशील का? तेव्हा मला असे वाटले की ते अगदी सहज काही दिवसांतच करता येईल. परंतु जसे मी लिहायला सुरुवात केली तेव्हा थोडा विचार केल्यावर माझ्या असे लक्षात आले की, बाबांचा हा प्रवास केवळ एका लेखात लिहिणे शक्य होणार नाही, हा खरे तर एका पुस्तकाचा विषय आहे.

बाबांच्या या प्रवासात काही विशिष्ट टप्पे स्पष्ट दिसतात. त्यातील पहिला टप्पा म्हणजे शून्य आर्थिक भांडवलामध्ये स्वतः एक उद्योजक बनणे. COEP मधून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतल्यानंतर, त्यांनी COEP च्या तत्कालीन प्राचार्यांच्या मालकीची फाउंड्री चालविली. हा त्यांचा व्यवसायातील पहिला अनुभव ठरला. असेच काही अनुभव घेतल्यानंतर त्यांनी आमच्या आजोबांच्या नावाने 'बळवंत इंजिनिअरिंग' या पहिल्या स्वतःच्या उद्योगाची सुरुवात केली. इलेक्ट्रिकल अभियंता असल्याने साहजिकच त्यांचा पहिला व्यवसाय, इलेक्ट्रिक मोटर दुरूस्त करण्याचा होता. हा व्यवसाय सुरू केल्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच पानशेतची दुर्घटना घडली आणि त्या दुर्घटनेत त्यांना त्यांचे दुकान पहायलाही जाता आले नाही, कारण तिथे हाताला लागेल असे काहीच शिल्लक राहिले नव्हते.

साधारणपणे सामान्य आर्थिक परिस्थिती असलेली आणि स्थैर्य नसलेली कोणतीही व्यक्ती या अशा व्यवसायाच्या सुरुवातीलाच बसलेल्या जबरदस्त फटक्यामुळे व्यवसाय करण्यापासून परावृत्त झाली असती आणि कदाचित एखाद्या मोठ्या कंपनीमध्ये नोकरीसारखा सुरक्षित पर्याय स्वीकारला असता. बजाज ऑटोसारखी मोठी कंपनी त्यावेळी दारात येणाऱ्या प्रत्येक अभियंत्याला कामावर घेत होती. परंतु बाबांसमोर हा पर्याय कधीच नव्हता. पानशेत दुर्घटनेनंतर त्यांनी भवानी पेठेत पुन्हा व्यवसाय सुरू केला. पानशेतच्या पुरानंतर त्यांना अधिक चांगली कामे मिळाली आणि त्यातून जे काही पैसे मिळाले त्यातून त्यांनी १९६३ साली ॲक्युरेट इंजिनिअरिंग ह्या नव्या उद्योगाला सुरुवात केली.

सुरुवातीला त्यांच्या डोक्यात बजाज आणि किर्लोस्कर ऑइल इंजिनसाठी लागणाऱ्या यंत्रभागांचे मशिनिंग करण्याचा विचार होता. बाबांनी कंपनीमध्ये लेथ मशीन विकत घेण्यासाठी महाराष्ट्र बँकेतून कर्ज घेतले आणि नंतर बजाज ऑटोकडे त्यांनी कामासाठी विचारणा केली. एक तरूण अभियंता, नोकरी ऐवजी जॉब-वर्कची मागणी घेऊन आल्याची बातमी तेथील वर्क्स मॅनेजर श्री. देशमुख यांच्या कानावर गेली. तेव्हा त्यांनी तेथील अभियंत्यांना बाबांना त्यांच्या अभियांत्रिकी पदवी आणि व्यवसायाला न्याय देईल असे काम देण्यास सांगितले.

यावेळची एक कथा आहे. बाबांनी बजाजमधील अभियंत्यांना, कंपोनंटचे मशिनिंग झाल्यानंतर त्याचे मोजमापन करण्यासाठी आवश्यक असलेले प्लग गेज, पुरविण्यास सांगितले. तेव्हा तिथल्या अभियंत्यांनी त्यांच्याकडे एकच संच असल्याचे सांगितले आणि तुम्हाला हवा असलेला प्लग गेज सेट तुम्हालाच त्याच्या उत्पादकाकडून घ्यावा लागेल असे सांगितले. त्यावेळी फक्त प्रागा टूल्स नावाची कंपनी याचे उत्पादन करीत होती आणि त्यांचा गेज देण्याचा कालावधी १ वर्षांपेक्षा जास्त होता! बाबांनी त्यांच्याबरोबर काम करणारे अभियंते पुरणसिंग यांच्यासोबत चर्चा करून ठरविले की, नुकत्याच घेतलेल्या लेथ मशीनवर आपणच प्लग गेज तयार करायचे आणि ते बजाजच्या क्वालिटी कंट्रोलकडून तपासून घ्यायचे. लॅपिंग मशीनसारख्या काही खास मशीनरीच्या सहाय्याने पहिले प्लग गेज स्वतः बनविल्यानंतर बाबांच्या एक गोष्ट लक्षात आली की, एखाद्या कंपनीसाठी कंपोनंट तयार करत बसण्यापेक्षा अशा प्रकारचे उत्पादन तयार केल्यास आपण एकूणच उद्योगक्षेत्रासाठी अधिक भरीव काम करू शकू. अशा प्रकारच्या व्यवसायासाठी खूप जास्त प्रयत्न करावे लागतील, कमी आर्थिक उलाढाल होईल परंतु देशातील उद्योगांसाठी यामुळे आयात कराव्या लागणाऱ्या अशा उपकरणांना एक सक्षम देशी पर्याय निश्चितपणे मिळेल. हा त्यांच्या कारकीर्दीतला दुसरा महत्त्वाचा टप्पा होता.

त्यानंतरचा टप्पा म्हणजे ॲक्युरेटमधील नवीन अभियंत्यांची भरती. त्यासाठी त्यांनी विशेषकरून ग्रामीण भागातून आलेल्या तरूण अभियंत्याना प्राधान्य दिले आणि त्याचबरोबर मेट्रॉलॉजीवर लक्ष केंद्रित करून भारतीय उद्योगांसाठी एकामागून एक उत्पादनांची निर्मिती करायला सुरुवात केली. १९६३ ते १९७२ या ९ वर्षांच्या काळात कंपनीने मेट्रॉलॉजी क्षेत्रातील उत्पादनांची एक मालिकाच निर्माण केली आणि त्या सातत्यपूर्ण निर्मितीमुळे कंपनीची वेगाने वाढ होत गेली. १९७२ नंतर बाबांनी अनेक अभियंत्यांना मोठमोठ्या कंपन्यांमध्ये नोकऱ्या शोधण्याऐवजी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले. WMDC चे (पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ) अध्यक्ष या नात्याने त्यांनी नवीन उद्योजकांना त्यांचा व्यवसाय सुरू करण्यास मदत करण्यासाठी अनेक प्रस्ताव मंजूर केले.

महाराष्ट्रातील १९७२ सालच्या दुष्काळानंतर बाबांचे लक्ष अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्यांकडे वळले. तेव्हा कंपनीची वाढ फक्त व्यवस्थापनाकडून होणाऱ्या प्रयत्नातूनच होत होती, पण मर्यादित होती. अनेक आव्हाने उभी राहिली, हडपसर येथील युनिटमध्ये कामगार

संघटना तयार झाली आणि अनेक बँकांचे कंपनीवर मोठे कर्ज झाले.

बाबांच्या औद्योगिक प्रवासातला चौथा आणि शेवटचा टप्पा म्हणजे कंपनीच्या संकटकाळात त्यांनी दाखविलेल्या असामान्य नेतृत्वगुणांचा आहे. कंपनी संकटात आली आहे हे लक्षात आल्यावर १९८५ नंतर बाबांनी पुन्हा एकदा या व्यवसायात पूर्ण स्वतःला गुंतवून घेतले. "Leading from the front' या इंग्रजी उक्तीनुसार त्यांनी कंपनीतील समस्यांचा सामना केला आणि ३ वर्षांत सगळे कर्ज चुकते करून ॲक्युरेटला कर्जमुक्त केले. त्यानंतर मात्र एखाद्या योगी पुरुषाप्रमाणे त्यांनी या उद्योग व्यवसायातून पूर्ण निवृत्त होऊन १९९१ मध्ये ही धुरा माझ्या खांद्यावर सोपवली.

*****

# विलासराव विद्रोहाच्या वाटेवरचे विवेकी वाटसरू

**श्री. प्रसाद भगवान सेवेकरी**

**मो : ९८९०२११८७६**



सर्वसामान्यांच्या हितासाठी अयोग्य असलेल्या, अन्याय्य प्रथा, परंपारांना विचापपूर्वक केलेला कृतिशील विरोध म्हणजे विद्रोह. तसं पाहिलं तर विद्रोहाची संकल्पना अर्वाचीन नव्हेच. सिध्दार्थ गौतम, वर्धमान महावीर, चार्वाक हे आद्य विद्रोही.

विद्रोह म्हणजे काय हे समजण्यासाठी आधी विकासाची सर्वमान्य व्याख्या तपासावी लागेल. विकासाची व्याख्या ही सर्वमान्य होत नाही यातच या संकल्पनेच्या गूढ – अगम्यतेचे यशापयश आहे. कुणी म्हणतात एखाद्या व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक स्थितीत झालेली उन्नती म्हणजे विकास. मग विचार येतो अनेक व्यक्ती, अनेक कुटुंबे मिळून होणाऱ्या समाजाचा विकास आणि चर्चेत येतात ते मुद्दे म्हणजे शिक्षण, हक्क, जाणीवा, समानता, लिंगभान, आरोग्य, प्रशासन, सकल राष्ट्रीय उत्पन्न, क्षमता, जबाबदारी, जोखीम आणि अभावग्रस्तते पासून मुक्ती ते थेट शाश्वत उद्दिष्ट (SDGs) इत्यादी. पण मग विकासाचे नेमके स्वरूप काय ?

थोडक्यात सांगायचे तर विकास म्हणजे असा सामाजिक बदल जो सर्वसामान्यांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून देतो आणि सामायिक उद्दिष्टांपर्यंत घेवून जातो. एकेकट्याची होते ती उन्नती, समाजाचा होतो तो विकास !

हा सामाजिक बदल घडवण्याच्या इच्छेने महाराष्ट्रात गेल्या अनेक शतकात **जो जे वांछिल तो ते लाहो,** म्हणणाऱ्या ज्ञानेश्वर माऊलींपासून ते **जे का रंजले गांजले त्यासि म्हणजे जो आपुले** असे म्हणत साधुत्वाचे लक्षण सांगणाऱ्या तुकोबांपर्यंत अनेक संतांनी प्रयत्न केले. गेल्या शतकाचे बोलायचे तर शाहु – फुले – आंबेडकर – आगरकर – कर्वे – सावरकर इत्यादी विचारवंतांनी किंवा अलीकडे आमटे, दाभोळकर, हजारे, जोशी, पाटकर या सारख्या धुरीणानी आपले आयुष्य वेचले. मोहनदास करमचंद गांधींचे माहात्म्य तर देशव्यापी आणि कालातीत !

या सर्वांनीच प्रस्थापित सामाजिक, राजकीय, नोकरशाही – प्रशासकीय व्यवस्थेला वंचितांच्या व्यथेची जाणीव, विवेकाधारित विचार आणि ठोस नैतिक मूल्यांच्या आधारे जोरदार टक्कर दिली व सर्वसामान्यांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून देत एका विवक्षित ध्येयासाठी जागृत आणि कार्यरत केले. हे सर्वच विद्रोही !

विद्रोहाच्या विचारात व्यक्तीगतविरोध नाही आणि प्रस्थापित व्यवस्थेशी संघर्ष असला तरी तो विवेकी प्रामाणिक आहे तसंच सृजनशील आणि (विरोधकांच्या) व्यक्तीगत सन्मान – प्रतिष्ठा जपणारा (Dignified) असा आहे. गांधींच्या विद्रोहात तर संयम आणि बंधने देखील आहेत. विलासरावांच्या विद्रोही विचारांची सांगड थेट त्यांना प्रिय असलेल्या संत – सूर्य तुकोबांच्या आयुष्याशी, विचारांशी आणि कार्याशी सहज घालत येते.

वयाच्या चाळीशीतच आयात पर्यायी उपकरणे तयार करणारा आपला तेजीला आलेला व्यवसाय सहकाऱ्यांच्या हाती सुपूर्द करून बुडता हे जन, न देखवे डोळा म्हणून दुष्काळ निवारणाच्या पर्यायी प्रयोगासाठी कुटुंबासह ग्रामीण भागात आपले बस्तान हलवणे हा देखील विद्रोहच. अशा वेळी आठवण होते ती वयाच्या तीशीच्या आतच दुष्काळाने गांजलेल्या आपल्या कुळांची कर्जखते पाण्याचे बुडवून त्यानं कर्जमुक्त करून, आपल्या संपत्तीचे आणि अधिकारांचेही जाहीर विसर्जन करणाऱ्या विद्रोही तुकोबांची. लौकिक श्रीमंतीचे महत्व तुकोबांना नव्हते तसेच ते विलासरावांच्याही मनात नव्हते.

हरीभक्तीची कौटुंबीक पार्श्वभूमी असल्याने विचारांमध्ये प्रामाणिकपणा होताच. समजून – उमजून स्वीकारलेल्या वानप्रस्थात त्या प्रामाणिकपणाला संत साहित्य आणि विशेषतः तुकोबांच्या गाथेच्या परिशीलनातून कसदारपण लाभले. कुटुंबाचे पाठबळ, विचारांवरील निष्ठा आणि अभियंत्याची चिकित्सक बुध्दी वापरून नायगावच्या डोंगरावर विलासरावांनी जलसंधारण आणि जल व्यवस्थापनयोग यशस्वी करून दाखवलेच परंतु सामान्य शेतकऱ्याला समजेल अशा भाषेत निष्कर्षाची प्रमेये मांडून ते आपले अनुभव लिहिते झाले.

लोकभाषेच्या वापरातून समाज जागृतीचा प्रयत्न करणाऱ्या तुकोबांच्या जातीचेच हे काम. त्यांना जे लोकांना, शासनाला सांगायचे असे त्याचा अभ्यास ते स्वत: आधी करत, अनुभव घेत निष्कर्षाप्रत येत आणि मगच जगासमोर आपले म्हणणे मांडत. दुष्काळाच्या पीडेतून महाराष्ट्रातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची सुटका व्हावी ही तळमळ त्यामागे होती.

**अनुभव आले अंगा, ते या जगी देतेसे ।**
**नव्हते हाततुके बोल, मूळ ओल अंतरीची ।।**

महाराष्ट्रात भलेही देशभरातील धरणांपैकी अर्धी धरणे पाणीसाठा करीत असतील, मात्र धरणाच्या वरच्या अंगाला असलेला किंवा कालव्याच्या टेल – एंडला असलेल्या पाण्यापासून सतत वंचित असलेल्या शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारायचे असेल तर किमान आठमाही पिकासाठी हक्काच्या आणि नियमित पाणीपुरवठ्याखेरीज तसेच योग्य पीक नियोजनाशिवाय विकासाचा मार्ग दुर्लभ आहे हे त्यांना उमगले होते. हे जाणत्या राज्यकर्त्यांनी आणि प्रशासन व्यवस्थेने समजून घ्यावे यासाठी त्यांची धडपड होती. समन्यायी पाणी वाटप हेच त्यांच्यासाठी वेदवाक्य होते. त्यामुळे तुकोबांप्रमाणेच त्यांचेही (वक्रोक्तिपूर्ण) परखड म्हणणे असे,

**वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा ।**
**येरानी वाहावा भार माथी ।।**

उपलब्ध पाण्याच्या वाटपाचे आणि वापरायचे गणित बसवले आणि मोजून पाणी घेण्याची सवय विलासरावांनी शेतकऱ्यांच्या अंगवळणी पाडली. उपसा सिंचन हा जर विकासाचा प्रचलित मार्ग झालेला होता तर त्यामध्ये सामायिकता आणून व्यवस्थेशी त्यांनी विद्रोहच केला. इतकेच नव्हे तर स्वातंत्र्योत्तर काळात विशेषत: महाराष्ट्रात अटळपणे रूजलेली, दुष्काळी प्रदेशात वारेमाप फोफावलेली साखर कारखानदारी (जी गेल्या चाळीस वर्षांत कित्येक पटीने वाढलीच आहे) हा जेव्हा विकासाचा प्रस्थापित मार्ग बनलेला होता तेव्हा जास्त पाणी पिणारे पीक म्हणून सामुदायिक उपसा सिंचन योजनेतून ऊस हद्दपार करण्याची आणि तरीही पर्यायी पीक पध्दतीआधारे उत्पादन आणि आर्थिक परिस्थिती सुधारण्याची जिद्द योजनेच्या सभासदांमध्ये जागवणे हाही विद्रोहच होता.

पाणी, वाणी, नाणी नासू नये, म्हणणाऱ्या तुकोबांनी स्वानुभव आणि सखोल चिंतन या आधारे आपले विचार अभंगांच्या माध्यमातून मांडले होते. पाणी प्रश्नावर चिंतन करताना देखील विलासरावांना तुकोबांचाच आधार वाटला हे स्वाभाविक होते. **विचारावाचोन न पावेजे** समाधान असे स्वत:ची खात्री होईपर्यंत ते समीकरणे मांडत राहिले, स्वत:शीच संवाद साधत राहिले.

**विचारले आधी आपुल्या मनासि, तुका म्हणे करू मनासि संवाद।**
**व्यवस्था, समकालीन अक्षर पूर्वसूरी काहीही म्हणोत अुवा मानोत, विलासरावांनीसुध्दा कायमच सत्य असत्यासि केले ग्वाही, मानीयेले नाही बहुमता।**

त्यामुळेच तुकोबांनी देखील बळ बुध्दी वेचुनीया शक्ती, उदक चालवावे युक्ती असे जणू आपल्याच मनातले सहभागी, शाश्वत जलनियोजन शास्त्र सांगितलेले आढळल्यावर त्यांना नक्कीच **माझिया जातीचे मज भेटो कोणी** असे वाटले असणार यात शंकाच नाही.

विलासरावांनी आयुष्यभर सृजनशीलतेची कास धरली.... शिक्षणाने अभियंते असल्याने त्याला नेमकेपणाची (Precision) जोड मिळाली.

> E3 =C3
> Experimentation, Education, Extension = Communication, Co-operation, Commitment

विचार अधिकाधिक टोकदार आणि समर्पक झाले. याचे उत्तम निदर्शक म्हणजे वंचितांच्या व्यथेला आवाज देण्यासाठी त्यांनी केलेला माहिती (Data / information) आणि उपयोजित तंत्रज्ञानाचा (Applied Technology) वापर. प्रयोग करायचे त्यांना जसे वेडच होते. ते फक्त नायगावच्या पाझर तलावाच्या खालच्या विहीरीवरून केलेल्या उपसा सिंचन योजनेपुरतेच मर्यादित नव्हते तर पाण्याच्या गरजेचे आकलन, पाण्याचे अंदाजपत्रक, पीक पध्दत, पीक संरक्षण, संवर्धन ते प्रक्रिया (मोहाच्या फुलांपासून बनवलेले सुखदा – शालेय मुलांसाठीचे पोषणमूल्य असलेले माध्यान्ह भोजन पदार्थ) असे विविध आयामी होते. प्रयोगातून शिक्षण देण्याच्या संकल्पनेवर त्यांचा भर होता अन् त्याद्वारेच लोकांपर्यंत पोचता येईल यावर दृढ विश्वास होता. लोककल्याण करायचे असेल तर लोकांच्या व्यथा जाणून तर घेतल्या पाहिजेतच पण त्या समस्यांवरचे उत्तर लोकांच्यात बसून त्यांच्याच सहकार्याने शोधले पाहिजे हा त्यांचा आग्रह होता.... आणि त्यासाठी समर्पित, प्रशिक्षित कार्यकर्ते तयार करण्याकडे त्यांचा कल होता. यातून सामायिक संसाधनांच्या संदर्भातील हक्क आणि उत्तरदायित्वाची जाणीव निर्माण करण्याचा स्पष्ट हेतू होता. समस्येवरचे उत्तर हे लोकविचार आणि तंत्रनियोजनातून ठरले की मग त्याचा पाठपुरावा ते अथकपणे करीत. यात प्रस्थापित व्यवस्थेशी संघर्ष अटळ होता आणि तो अनेकदा त्यांनी केला. कार्यकर्ते – साहित्यिक मिलिंद बोकीलांनी जमीन आणि पाण्याच्या मालकीची सांगड तोंडणारे विलासराव हे पहिले सामाजिक विचारवंत होते असे म्हंटले आहे.

त्यांच्याशी बोलतांना हे जाणवे की पाणी समस्येवर प्रतिपादन करताना प्रस्थापित व्यवस्थेतील कुणा एकाला मुद्दाम दुखवायचे किंवा त्या व्यक्तीला हवे तसेच बोलायचे म्हणून ते बोलत नसत. परंतु आपल्या बोलण्याने, लिहिण्याने अथवा कृतीने व्यवस्थेच्या अंगी त्यामुळे खरचटले तर ते हवेच असे. व्यवस्थेची उदाहरणे दाखवून देताना संघर्षाची वेळ आली तरी त्यामुळे एकूण व्यवस्थेच्या समाजाप्रति असलेल्या दृष्टीकोनात आणि मुख्यत: कार्यक्रम अंमलबजावणीत फरक पडेल, लोकभावनेची कदर केली जाईल ही त्यांची अपेक्षा असे.

**आमचे तो आहे सहज बोलणे, नाही विचारून केले कोणी।**
**अंगे उणे बैसे त्याच्या टाळक्यात, तेथे ठिणग्या बहुत गाळीतले**
**तुका म्हणे आम्ही काय करणे त्यासी धका खवंदासी लागतसे ।।**

तुकोबांचे थेट वंशज असलेले साक्षेपी विचरवंत डॉ. सदानंद मोरे एक ठिकाणी म्हणाले होते की सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय परंतु वादग्रस्त व्यक्ती म्हणजे तुकोबा होती.


विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाचा विचार केल्यास असे म्हणावेसे वाटते की विद्रोहाच्या वाटेवर चालताना देखील विवेक कधीच न सोडणारे, महाराष्ट्राच्या कृषी – समाज – अर्थकारणातील सर्वात लोकप्रिय परंतु वादग्रस्त व्यक्तीमत्वात विलासराव नक्कीच एक अग्रणी होते.

*****

# आधुनिक भगीरथ - विलासराव साळुंखे

**श्री. सतीश देशमुख**

**मो : ९९७०१८७२९४**



आजच्या तरुण पिढीला विलासराव साळुंखेंची ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासामधील पाणी, जमीन व पर्यावरण ह्या संदर्भातील आर्थिक सिद्धांत, तत्वप्रणाली व त्यांनी केलेले प्रयोग ह्यांची तोंडओळख नाही. ते दोनशे वर्षे पुढे विचार करणारे द्रष्टे कर्मयोगी होते. ''एक होता कार्व्हर'' ह्या प्रसिद्ध पुस्तकाच्या लेखिका वीणा गवाणकर ह्यांनी विलासरावांवर ''भगिरथाचे वारस'' हे पुस्तक लिहिले आहे, ह्यात बरेच काही आले. विलासराव असे म्हणत की 'ह्या शेती शास्त्रज्ञ डॉ. कार्व्हर प्रमाणेच जिद्द, सामाजिक बांधिलकी आणि भारतीय जीवनमूल्यांचा अभिमान असणाऱ्या हजारो तरुणांची ग्रामीण भूमी आतुरतेने वाट पाहत आहे.'

कुठल्याही अन्यायाविरुध्द लढताना एक संघर्ष रेषा असते. पूर्वीच्या काळात मालक विरुद्ध गुलाम असा संघर्ष होता. मार्क्सने कामगार विरुद्ध भांडवलशाही शोषण असा लढा दिला. आंबेडकरांनी जाती–वर्ग वादा विरुद्ध संघर्ष केला. शरद जोशींनी इंडिया–भारत संकल्पना मांडली. शेतकऱ्यांच्या सर्जकते विरुद्ध त्यांच्या वरकड उत्पन्नावर पोसणारे बांडगुळ असा उल्लेख झाला.

आर्थिक विषमतेची दरी वाढवणारी श्रीमंती आणि गरिबीला छेदणारी एक अजून रेषा आहे– ती म्हणजे पाणी.

वर्षोनवर्षे जिरायती व कोरडवाहु शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. अश्या वेळी विलासरावांनी हे तत्त्व मांडले की, भूपृष्ठावरील व भूजल ह्या निसर्गाकडून मिळणाऱ्या पाण्यावर सर्वांचा हक्क आहे. आणि त्याचे समप्रमाणात वाटप झाले पाहिजे. त्यांनी मांडलेल्या विचारांची प्रचिती येण्यास अजून काही दशके जावे लागतील. नुसते विचार मांडून थांबले नाही तर त्याच्या अमलबजावणीसाठी आपले मन, बुद्धी, शरीर, व्यवसाय, संपूर्ण आयुष्य हे सगळे ह्या उद्दिष्टासाठी पणाला लावले.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आर.आर. पाटील विलासराव संदर्भात म्हणले होते, ''पाण्याच्या थेंबाशी इमान असणारा हा माणूस पाण्याच्या थेंबासारखाच नितळ होता. विलासराव म्हणत, ते आज नाही, तरी नजीकच्या भविष्यात तुम्हाला स्वीकारावेच लागेल. पाणी मोजूनच घ्यावं लागेल!''

इंजिनिअर व यशस्वी उद्योजक असलेल्या संवेदनशील विलासरावांचे १९७२ सालच्या भीषण दुष्काळाच्या हृदयविदारक दर्शनामुळे समाजसुधारकामध्ये स्थित्यंतर झाले. आपल्या विचारांना मूर्त स्वरूप देण्यासाठी त्यांनी पत्नी व लहान लहान मुलांना घेऊन पुणे सोडले व नायगाव येथे प्रयोगशाळेमध्ये, रानातच घर थाटले. त्यांनी स्थापिलेल्या 'ग्राम गौरव प्रतिष्ठान– पाणी पंचायतच्या माध्यमातून ठिकठिकाणी १०० च्या वर प्रकल्प राबवून १४९४० हेक्टर जमिनीवर दिशादर्शी मॉडेल्स उभी राहिली आहेत. महाराष्ट्रातील पाणी प्रश्नांवर काम करणाऱ्या अनेक सदस्यांना विलासरावांच्या विचारांची प्रेरणा व स्फूर्ती होती ह्यात दुमत नाही. पाणी प्रश्नांवर आदर्शवत कार्य करणारे अण्णा हजारे, पोपटराव पवार आदी हे 'विलासरावांनी आम्हाला वैचारिक दिशा दिली' अशी कबुली देतात.

वि.स.पागे यांना 'रोजगार हमी योजनेचे' जनक म्हटले जाते. कालांतराने ही योजना केंद्र सरकारने मनरेगा अंतर्गत देशभरात स्वीकारली. पागे यांनी विलासरावांचे जलसंधारण, मृदुसंधारणाचे प्रयोग व विचार समजून घेण्यासाठी नायगावला जाऊन मुक्काम केला. पूर्वी रोजगार हमी योजने अंतर्गत रस्ते व खडी फोडण्याचे अनुत्पादक काम होत असे. त्यामध्ये पाण्याच्या योजनांवर काम करण्याचा समावेश करण्यात आला. हे विलासरावांच्या पथदर्शक विचारांच्या बहुमोल योगदानाचे एक उदाहरण!

त्यांच्या व्यक्तीमत्वाच्या रसायनामध्ये रवींद्रनाथ टागोर, वारकरी संप्रदायाचे संस्कार व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांचा समतेचा विचार आध्यात्मिक जाणिवेतूनच विकसित झाला होता. तर कोणालाही सहजासहजी पचनी न पडणारे तत्वज्ञान हे विद्रोही तुकारामांच्या अभंगाशी साधर्म्य दाखवणारे असे होते. ' निश्चयाचे बळ! तुका म्हणे तोचि फळ ।।' ह्या उक्ती प्रमाणे एकदा ठरवले की पूर्णत्वाला न्यायची त्यांची दृढ इच्छाशक्ती होती. श्रममूल्याची प्रतिष्ठा, साध्या राहणीमानाचे जीवनव्रत, तळागाळातील कष्टकऱ्यांबद्दल आंतरिक प्रेम ही

त्यांची दुर्मिळ अशी स्वभाव वैशिष्ट्ये होती.

कुठल्याही प्रस्थापित व्यवस्थेमध्ये परिवर्तन करायचे म्हटले की संघर्ष हा अपरिहार्य असतो. पण विलासराव डगमगले नाही. योजना मूर्त स्वरूपात येण्यासाठी त्यांनी मुख्यमंत्र्यांशी पत्रव्यवहार, मंत्रालयाच्या वाऱ्या, पाण्याची पदयात्रा दिंडी उपक्रम, उपोषण, रस्त्यांवरील आंदोलने, सत्याग्रहे, शासकीय पाठपुरावा, पाणी परिषदा असे अनेक मार्ग अवलंबले. प्रसंगी न्यायालयाचे दार ही ठोठावले. पाण्याचा दुष्काळ हा पाण्याच्या अभावापेक्षा त्याच्या गैरव्यवस्थापनापायी होतो, ह्या संदर्भात त्यांनी सरकारच्या विरोधात मुंबईच्या उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली.

विलासरावांना परदेशातील तंत्रज्ञानाच्या शोधात जपान, अमेरिका, युरोपीय देश, इंग्लंड, कॅनडा अशा अनेक देशांमध्ये भ्रमण करण्याचा योग आला. तिथे चाललेले अतिरेकी आधुनिकीकरण व चंगळखोर भोगवादी संस्कृती त्यांच्या अध्यात्मिक मनाला अस्वस्थ करीत असे.

पाणी ह्या विषयासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. त्यांचे निष्कर्ष त्यांच्या स्वानुभवावर आधारित व प्रयोगाने सिद्ध झालेले असायचे. त्यांच्या वक्तव्यातील प्रांजळपणा व आंतरिक तळमळ समोरच्यांना भावून टाकायची.

'महाराष्ट्राच्या जलसंपत्तीचे नियोजन–पाण्याचे न्याय्य वाटप, धोरण, दिशा, कार्यवाही' ह्या त्यांच्या पुस्तकात दिलेली माहिती, आकडेवारी, सांख्यिकी तक्ते पाहून लक्षात येते की त्यांची मांडणी किती शास्त्रशुद्ध व सुसूत्रबद्ध होती.

इस्राईलला भेट देऊन आल्यानंतर विलासराव म्हणाले की, 'फक्त ठिबक सिंचनाची व उपदेशाची जलनीती न सांगता तिथल्या समान वाटप शिस्तीचे नियोजन, पाण्याचे कायदे, स्वतंत्र पाणी आयोग ह्याचे अनुकरण करावे लागेल.'

कार्पोरेट क्षेत्राची पार्श्वभूमी असल्यामुळे विलासरावांना कार्यकर्ते, शेतकरी ह्यांच्या प्रशिक्षणाचे महत्त्व माहिती होते. 'पाणी पंचायती' च्या माध्यमातून आजपर्यंत हजारो कार्यकर्ते प्रशिक्षण घेऊन तयार झालेत. ह्या मध्ये लोक संघटन, जमीन व पाण्याचं गावपातळीवरील नियोजन, सामूहिक पाणी वाटप, सेंद्रिय शेती, पर्यावरण वगैरे विषयांचा अंतर्भाव होता. त्या ठिकाणी शिबिरार्थींच्या निवासाची, जेवणाची ही व्यवस्था केली गेली. विलासरावांनी ' पाणी पंचायत ' हे चळवळीचं मुखपत्र द्वीमासिक सुरू केले. त्यात जलप्रकल्प, चळवळीतील अनुभव, ग्रामीण विकास, दुष्काळ उपाययोजना वगैरे विषय असायचे.

विलासरावांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाला व त्यांच्या कार्याला गवसणी घालून शब्दबद्ध करणे अत्यंत अवघड काम आहे. कोणीही प्रतिभावंत लेखक त्यांना पूर्ण न्याय देऊ शकणार नाही. दुष्काळाच्या झळा आपण वारंवार सहन करीत आहोत. त्याचा सामना करण्यासाठी विलासरावांचे विचार, तसेच निसर्गाचे संवर्धन करणारी अनुकूल सर्वसमावेशक पर्यायी विकास निति नजीकच्या काळात अवलंबावीच लागेल.

*****

# देव टाक्याच्या पाण्यासारखा पाणीबाबा

**श्री. पांडुरंग (काका) शितोळे**

**मो : +९१ ९८२२०१२४४२**



सामाजिक कार्य करणारे कार्यकर्ते दोन मुख्य प्रकारात विभागले जातात –

१. रचनात्मक कार्य करणारे

२. संघर्षात्मक कार्य करणारे

जे रचनात्मक कार्य करतात त्यांना संघर्ष करणे जमत नाही व जे संघर्षात्मक कार्य करतात त्यांचा रचनात्मक पाया पक्का नसतो. कै. विलासरावांनी पाण्यासाठी या दोन्ही प्रकारचे कार्य केले. त्यांचा जास्तीत जास्त भर रचनात्मक कार्यावर होता परंतु गरज पडेल तेव्हा प्रस्थापित व्यवस्थेविरूध्द संघर्ष सुध्दा केला. दोन्ही क्षेत्रात कार्य करणारे फारच कमी संस्था किंवा व्यक्ती आहेत. त्यात विलासरावांचा क्रम सर्वात वरचा आहे.

विलासरावांनी ग्रामीण शेतकऱ्याची गरज विचारात घेवून सर्वांच्या गरजेचे तसेच उदरनिर्वाहाचे मुख्य साधन पाणी असल्यामुळे आपले कार्यक्षेत्र म्हणून पाण्याची निवड केली. त्यांनी पाण्याची सहा प्रकारे पूर्तता करण्याचा ध्यास घेतला होता.

१. पिण्यासाठी शुध्द पाणी मिळावे

२. शेतीसाठी गरजेपुरते पाणी मिळावे

३. भूमिहीनास सुध्दा न्यायने हक्काचे पाणी मिळावे

४. तरूणांच्या मनगटात पाणी असावे

५. गाव पाणीदार असावे

६. गरीबांचे दुःख पाहून श्रीमंतांच्या डोळ्यात पाणी यावे

विलासरावांनी पाणी वाटपाचा जमिनीच्या क्षेत्रफळाशी असलेला प्रचलित संबंध तोडला आणि पाणी वाटपाचा नवा क्रांतीकारी सिध्दांत समाजापुढे मांडला. हा सिध्दांत केवळ भावनिक पातळीवर न ठेवता त्यास गणिताची, विज्ञानाची व उपलब्ध नैसर्गिक साधनसामुग्रीची सांगड घातली. हा सिध्दांत केवळ कागदावर मांडून आपले पांडित्य सिध्द करणे हा त्यांचा हेतू कधीच नव्हता. हा सिध्दांत त्यांनी स्वत: प्रत्यक्ष प्रयोग करून समाजमान्य केला आणि नंतर संपूर्ण पुरंदर तालुक्यात विस्तार केला. या ध्येयाचा त्यांनी ध्यास घेवून पूर्तता केली.

त्यांनी पाण्याची साठवण व वितरण याचा विचार विकेंद्रीत पध्दतीने केला. महाराष्ट्रात प्रत्येक कुटुंबात सरासरी पाच सभासद व प्रत्येक कुटुंबाची जमीन धारणा अडीच एकर गृहित धरून एका कुटुंबास पाच हजार घन मीटर पाणी न्यायाने, हक्काने मिळाल्यास ते कुटुंब स्वावलंबी होवू शकते. हा समन्यायी पाणी वाटपाचा सिध्दांत प्रथम नायगांव येथील देवस्थानाच्या जमिनीवर सिध्द करून दाखविला व त्यानंतर पुरंदर तालुक्यातील ४२ गावात त्याचा विस्तार केला. पाच हजार घन मीटर पाणी भूमिहीन कुटुंबास सुध्दा मिळावे हा विचार अनेकांना त्यावेळी पचला नाही. परंतु सामाजिक समतेसाठी हा विचार किती प्रग्लभ व भविष्याचा वेध घेणारा आहे हे लक्षात येते. विलासरावांच्या या कार्यामुळे पुरंदर तालुक्यातील अनेक शहरात गेलेले तरूण परत गावी येवून शेती करू लागले. खेड्याकडे चला हा राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचा संदेश विलासरावांनी प्रत्यक्षात उतरवला.

जागतिक पातळीवर मात्र या समन्यायी पाणी वाटपाचा समता प्रस्थापित करणाऱ्या विचाराची दखल घेवून त्यांना पुरस्काराने सन्मानित केले गेले. पुरस्काराचे मिळालेले २५ लाख रूपये विलासरावांनी संस्थेस बहाल केले. विलासरावांनी गांधी विचाराचा साधी राहणीचे प्रत्यक्ष अनुकरण करून माझ्यासारख्या अनेक तरूणांना प्रेरित केले.

अडीच एकर जमीन व ५००० घन मीटर पाणी कसे वापरावे याचे सेंद्रीय शेतीपध्दतीचे अनेक नमुने उभे केले. पाण्याचे गणित मांडणारे हे देशातील पहिले समाजिक कार्यकर्ते आहेत. ते मला गुरूस्थानी होते. त्यांनी आमच्या सेंद्रीय शेती चळवळीस पाठबळ दिल्यामुळे सेंद्रीय शेतीचा प्रचार, प्रसार व अवलंब वाढू लागला. त्यांच्या व माझ्यामध्ये सेंद्रीय शेती बरोबरच जगत् गुरू संत तुकाराम व राष्ट्रपिता महत्मा गांधी या समान धाग्यामुळे जवळीक वाढत गेलीय त्यांच्या नावामुळे सेंद्रीय शेती राजमान्य होण्यासही मदत झाली.

आज जागतिक पातळीवर ज्या अनेक समस्या चक्रवाढ रीतीने वाढत आहेत त्याचे मूळ आम्ही विलासरावांची जीवनशैली, विकेंद्रीत विकासनिती व नैसर्गिक साधन सामुग्रीचे समन्यायी वाटप ही मूलतत्व विसरलो यात आहे. शहरात राहून खेड्यातील शेतकऱ्यांना उपदेशाचे डोस पाजून समाज परिवर्तन होत नाही, त्यासाठी आपण त्यांच्यामध्ये जावून राहिले पाहिजे, त्यांच्यासारखे जीवन जगले पाहिजे तरच आपणांस त्यांच्या समस्या व्यवस्थित समजतील व तेव्हाच तुमचा उपदेश लोक आचरणात आणतील हे विलासरावांनी प्रत्यक्ष नायगांव व नंतर खळद येथे राहून सिध्द करून दाखविले. तरूण सामाजिक कार्यकर्त्यासाठी हा महत्वाचा वस्तुपाठ विलासरावांनी घालून दिला आहे. त्याचे अनुकरण केल्यास त्यांच्या कामाची आपण सर्वांनी योग्य दखल घेतली असे होईल. त्यांचा हा नायगांव पॅर्टन म्हणून शासन मान्य झाला परंतु राज्य पातळीवर मात्र राबविण्यात शासनाचा उदासीनपणा दिसला.

विलासरावांच्या निधनानंतर मी ग्रामगौरव प्रतिष्ठानचा विश्वस्त म्हणून १६ वर्षे कार्य केले. तिथे माझी भूमिका फोडीले भांडार, धन्याचा तो माल, मी तंव हमाल भार वाही. हीच होती. त्यांनी घातलेला इमारतीचा पायाइतका मजबूत होता की आम्हाला फारसे काही करावे लागले नाही. त्यांच्या प्रमाणे ध्यास घेवून काम करणे आम्हास जमले नाही. परंतु त्यांचे कार्य समाजाच्या दृष्टीने किती उपयुक्त आहे हे शिकता आले. त्यांच्यातील काही अंश माझ्यामध्ये उतरल्याची मला धन्यात वाटते.

विलासराव उद्योग व्यवसायात असताना त्यांनी अनेक तरूण उद्योगक घडविले तसेच सामाजिक कार्य करताना माझ्या सारखे अनेक कार्यकर्ते घडविले. त्यांनी घालून दिलेल्या तत्वानुसार ग्रामगौरव प्रतिष्ठानची भविष्यात वाटचाल व जडण घडण व्हावी हीच परमेश्वर चरणी प्रार्थना !!

*****



# ग्राम गौरव प्रतिष्ठान - पाणी पंचायत

**४८ वर्षे सातत्याने जलसंधारण व पाणी व्यवस्थापन या माध्यमातून ग्रामीण विकासासाठी झटणारी सामाजिक संस्था**




शेतकरी प्रशिक्षण केंद्र

- सर्व प्रकारच्या सामाजिक विषयावरील प्रशिक्षणासाठी सुसज्ज असे प्रशिक्षण केंद्र
- ५० व्यक्तीची राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
- १० एकर सेंद्रिय शेतीचा प्रशस्त परिसर
- प्रशिक्षणासाठी अद्ययावत सभागृह

**पंचक्रोशी शेतकरी सुविधा केंद्र पंचक्रोशीतील शेतकऱ्याच्या शेतीमालावर प्रक्रिया करण्यासाठी सुविधा केंद्र**

**शेतकरी सुविधा केंद्रावर दिल्या जाणाऱ्या सुविधा:**

- लाकडी घाणा तेल
- धान्य सफाई व सुविधा केंद्र
- शेंगा फोडणी मशीन
- डाळ मिल
- मसाला व धान्य गिरणी
- आवळा प्रक्रिया केंद्र
- गांडूळ खत

सुविधा केंद्रावर शेतकऱ्यांचा शेतीमाल विक्रीसाठी उपलब्ध







**विविध प्रशिक्षणे :**

- सेंद्रिय शेती प्रशिक्षण
- पाणलोट व्यवस्थापन प्रशिक्षण – प्राथमिक
- पाणलोट व्यवस्थापन प्रशिक्षण – प्रगत
- पर्यावरण कार्यशाळा
- निसर्ग सहल
- निसर्ग शिबीर
- योग आयुर्वेद प्रशिक्षण आणि उपचार
- जीवन शैली कार्यशाळा

**संपर्क :– ९८२२०२७४६९ / ९८९०९४८१९३ / ७२६४८५३९१४ / ८९७५९०८८४३**
मेल : panipanchayat1974gmail.com
Websites: www.panipanchayat.org | www.aarogyabhumi.com

# समन्यायी पाणी वाटपाची दिशा हरवली आहे काय?

**श्री. उपेंद्रदादा धोंडे**

**मो : +९१ ९२७१०००१९५**



कै. विलासराव साळुंखे, अगदी भूमिहीन मजुरालादेखील पाण्याचा अधिकार आहे, म्हणून पाण्याचे वाटप समन्यायी पद्धतीनेच व्हायला हवे असा अतिशय मूलभूत विचार मांडणारे आणि हा विचार कसा योग्य आहे ते उपलब्ध माहितीचे विज्ञाननिष्ठ विश्लेषण करत, शास्त्रशुद्ध मांडणीच्या आधारे प्रत्यक्ष कृती कार्यक्रमातून सिद्ध करणारे, असे एक अभ्यासू व्यक्तिमत्व. सध्या जलक्षेत्रातील जाणकार धोरणकर्ते म्हणवल्या जाणाऱ्या तथाकथित तज्ञ-अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधींची जलव्यवस्थापन धोरणांतल्या नियोजन, अंमलबजावणी आणि मूल्यमापनासंदर्भात जी काही तारांबळ उडालेली दिसते ती पाहता विलासरावांच्या द्रष्टेपणाचे महत्व तर कळतेच पण याहून जास्त दुःख - दुर्दैव या गोष्टीचे वाटते की असा द्रष्टा महापुरुष समन्यायी पाणीवाटपाचा जो मार्ग दाखवून गेलाय त्याची अंमलबजावणी होताना अद्यापही दिसत नाही. धनदांडग्यांच्या हाती गेलेले वर्तमान जलक्षेत्र, पाणलोट विषयक धोरण, आंतरराज्यीय नदी विवाद, समन्यायी पाणी वाटप, जागतिक हवामान बदलाचा परिणाम या विषयावर अभ्यास - चर्चा पाहता, एकूणच आज जलक्षेत्रातील तांत्रिकता आणि तदनुसार समन्यायी पाणीवाटप यासंदर्भातली समाजातील जलसाक्षरता स्थिती म्हणून सुरू असलेल्या प्रयत्नांकडे पाहता, भविष्यातला अराजकाचा अंधार स्पष्ट जाणवतोय.
गावशिवारातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास यावर स्थानिकांत जनजागृती करण्यासाठी या विषयांवर सध्याची मार्गदर्शक मंडळी कोण आहेत? जलक्षेत्रातील दुष्काळमुक्तीच्या धोरण अंमलबजावणीचे ठेकेदार कोण आहेत? दिवसेंदिवस भूजल पातळी खोल जात आहे, जलव्यवस्थापनासमोर नवनवीन आव्हानं उभी राहताहेत आणि यावर तथाकथित स्वयंघोषित जलमहापुरूष -सेलिब्रिटी मंडळी सामान्यांना काय सांगताहेत तर आम्ही अमुक इतक्या नद्या पूनरूज्जीवित केल्या, अमक्या भागात ईतके कोटी लिटरचे पाणीसाठे निर्माण केले. जलविज्ञान खूप सोपे, बस्स खड्डे करा, बांध घाला, पाण्याचा थेंब न थेंब अडवा, दुष्काळाशी लढाई, ढिश्क्यॉव- ढिश्क्यॉव, सारं कसं सोपं आणि सामान्य माणूस माना डोलावतोय, शासनही ह्यांना व्यासपीठ देऊन, पुरस्कार-प्रसिद्धी देत यांचे दैवतीकरण करतंय. लोकसहभाग या गोंडस नावाखाली लोकांच्या भावनांशी होणारा खेळ प्रसिद्ध पावतोय आणि यात ज्या गोष्टींची लाज वाटावी त्याचा अभिमान बाळगणं सुरू आहे.

शासकीय योजना - निधीची अवस्थाही आंधळं दळतंय आणि कुत्र पिठ खातंय अशीच, प्रत्येक योजना यशस्वी कि अयशस्वी यावर प्रसारमाध्यमांचा टिआरपी गोंधळ आणि हो, जलसमस्या गंभीर बनली असतानाही वरीलपैकी कुणीही त्याचं शास्त्रीय पद्धतीने विवेचन करणार नाही व कुणी यांच्या जलकार्याची चिकित्सा करण्याचा प्रयत्न जरी केला तरी तो ऐकून घेण्याची मनस्थिती यापैकी कुणाचीही नसणार. बाकी भूजलविज्ञान या विषयातील संशोधन आणि वैज्ञानिक विकास ही तर फार दुरची गोष्ट. जलक्षेत्रात काही नेमकी व्यवस्था असावी याची कोणाला गरजच वाटू नये, कुणी प्रश्न विचारू नयेत, जे विचारतील ते तोंडफाटे, जे चुका दाखवतील ते गर्विष्ठ, बंडखोर अशा उपाध्या दिल्या की झालं आणि समाज जलसाक्षर करायचाय म्हणे, पण कसा?

आज विलासरावांसारख्या द्रष्टया, अभ्यासू आणि परखड व्यक्तिमत्वाची उणीव प्रकर्षाने भासते आहे. विलासरावांचे विचार किती शास्त्रशुद्ध व सूत्रबद्ध होते ते 'महाराष्ट्राच्या जलसंपत्तीचे नियोजन-पाण्याचे न्याय वाटप, धोरण, दिशा, कार्यवाही' ह्या त्यांच्या पुस्तकात दिलेली माहिती, आकडेवारी, सांख्यिकी तक्ते पाहून लक्षात येते. याउलट स्वतःला तज्ञ म्हणवत, जल महापुरुष म्हणवत, सरकारी सोयी-सवलती उपभोगत, जलक्षेत्राचे टुरिझम करणारे, समाजाप्रतीचे भान न दाखविणारे आणि हे चालवून घेणारे राजकारणी, प्रशासन अधिकारी तसेच हा जिज्ञासाहीन- उदासीन आणि अल्पसंतुष्ट-सुखलोलुप असा समाज, हे सगळे घटक मिळून या विदारक स्थितीस जबाबदार आहेत. विलासरावांनी आखून दिलेल्या समन्यायी पाणीवाटपाच्या मार्गावर चालण्याऐवजी त्याची पायमल्ली करण्याची जणू स्पर्धाच लागली आहे.

आता ही अलिकडचीच काही उदाहरणे पहा, कोपरगावचे भाजप आमदार यांच्या येवला तालुक्यात असलेल्या शेतात पालखेड डाव्या कालवा प्रशासनाने जलयुक्त शेत अभियान राबवून शेतकऱ्यांना हक्काच्या पाण्यापासून वंचीत ठेवले, येवला तालुक्यातील चिचोंडी खुर्द शिवारात राजकारणी मालकीच्या जमिनीत पालखेडचे पाणी मुरवले जात आहे, त्यामुळे पालखेड डाव्या कालव्याच्या लाभ क्षेत्रातील कोपरगाव तालुक्यातील ब्राम्हणगाव आणि नाटेगाव येथील पाणीवापर संस्था, संत जनार्दन पाणीवापर संस्था -निमगाव मढ, नाटेगावची शिवशंकर पाणीवापर संस्था, येवला तालुक्यातील बदापूर येथील भीमाशंकर पाणीवापर संस्था, अगस्ती पाणीवाटप संस्था यांना थेंबभरही पाणी मिळालेले नाही असा शेतकऱ्यांनी केलेला आरोप, पाणीवापर सोसायट्यांना ठेंगा दाखवत उद्दामपणे पाणीवाटपाचे वेळापत्रक जाहीर न केल्याने आणि निदर्शने केल्यावर जे जाहीर केले तेही न पाळल्याने एकीकडे शेतकऱ्यांची पिके पाण्याअभावी सुकताहेत आणि दुसरीकडे मात्र अधिकाऱ्यांच्या वरदहस्ताने पुढाऱ्यांसाठी जलयुक्त शेत असे धोरण

राबवणे सुरू, नियोजनशुन्य कारभारामुळे पाण्याअभावी पिके हातातून निघून जाण्याची परिस्थिती हे चित्र पाहून चिडलेल्या शेकडो शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांना कोंडून घेत कार्यालयाला कुलूप लावून व्यक्त केलेला आपला संताप तर दुसरीकडे जळगाव येथेही शेतकऱ्यांनी केलेले ठिय्या आंदोलन, धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली असतानाही पाण्यासाठी शेतकऱ्यांना आक्रोश करावा लागतोय, त्याचवेळी पुढारी आणि धनदांडग्यांच्या शेतात मात्र पाणी मुरवले जातय, नेते मंडळी शेतकरी बांधवांच्या शेतीला हक्काचे पाणी देतांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी की उद्धट बोलणे व दमबाजी करण्यासाठी याचा अनेकांना येणारा सततचा अनुभव.

हे झाले धरणाच्या पाण्याबद्दल, पण भुजलाबाबतही काही वेगळे नाही, 'जिसकी लाठी उसकी भेस' हे तत्व पाळत जमेल तेवढ्या विहिरी –बोअरवेल खोदून त्यामधुन अंदाधुंद भूजल उपसा सूरू आहे, बडी धेंड कोट्यावधी लीटर साठाक्षमतेची शेततळी भरून घेताना दिसताहेत आणि प्रशासन तर या जलसाठयांच्या खाजगीकरणास सबसिडीच देते आहे आणि या आधीच दुर्मिळ होत चाललेल्या भूजलहक्कावर अतिक्रमण करून जारवाले, टेंकरवाले, कोकाकोला– मिनरल वॉटरवाले राहिली साहिली कसर पूर्ण करत करताहेत. दुष्काळात पिण्यासाठी म्हणून गाववाल्यांचा पाण्याचा एखादा उरला सुरला उपलब्ध स्रोत देखील यांच्या नजरेतून सुटत नाही. यवतमाळ शहरातील भांगरनगर येथील मणिराम सोसायटीमधील जवळपास हजार लोकांची तहान भागवण्यासाठी एकमेव बोअरवेल आहे, परिसरातील इतर बोअरवेल – विहिरी सगळ्या आटलेल्या, अनेकांना पाण्यासाठी ताटकळत उभं राहावं लागणं, पाणी भरण्यासाठी प्रचंड भांडणं हे नेहमीचंच, दिवसा–रात्री केव्हाही रांगा कधीच संपतच नाहीत.

थोड्याफार फरकाने बहुतांश महाराष्ट्र हेच चित्र पाहतोय आणि यावर उपाय काय, तर जेसीबीवाल्यांच्या ताब्यात गेलेले जलयुक्त शिवार, दिवास्वप्ने दाखवणारी वाटर कप स्पर्धा, तांत्रिकता न पाहताच नदी –ओढे उकरण्यासाठी निधी उपलब्ध करून देणारे सेलिब्रिटी, प्रशासकीय यंत्रणेच्या वळचणीला पडून रहात आपली प्रसिद्धीलोलुपता भागवणारे फलाने –बिस्ताने अर्धवट जलयोद्धे – जलमहापुरुष. या परिस्थितीत दुष्काळ हटणे, समन्यायी पाणीवाटप तर दूरच पण पाण्याची पळवापळवी बघत बसणेच शेतकऱ्यांच्या नशिबात.

विलासराव हे 'पाणी पंचायत या संकल्पनेने सामूहिक व्यवस्थापनाद्वारे पाण्याची साठवण व वितरण करून शेतकःयांचा आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणणारे सामाजिक कार्यकर्ते. त्यांनाही काही काळ समाजवादी, साम्यवादी विचार म्हणून उसाच्या धनदांडग्या शेतकरी, पुढारी वर्गाने केलेल्या हेटाळणीस जरूर सामोरे जावे लागले जरूर परंतु पाणलोट क्षेत्रविकास व त्याआधारे शेतीसिंचनाचा त्यांचा 'नायगाव पॅटर्न' हा प्रयोग विलक्षण गाजला. त्यांनी स्थापिलेल्या 'ग्राम गौरव प्रतिष्ठान– पाणी पंचायतच्या माध्यमातून ठिकठिकाणी १०० च्या वर प्रकल्प राबवून १४९४० हेक्टर जमिनीवर दिशादर्शी मॉडेल्स उभी राहिलेली आहेत. ग्रामीण भागात एकूण लागणाऱ्या पाण्याच्या फार तर २ % पाणी पिण्यासाठी पुरेसे आहे आणि सिंचनाच्या पाण्याची योग्य व्यवस्था केली तर पिण्याचे पाणी थोड्याशा सामाजिक शिस्तीनेच अगदी सहज उपलब्ध होईल, ही वस्तुस्थिती विलासरावांमुळेच महाराष्ट्राला अवगत झाली. भविष्यात प्रत्येकाला पाणी मोजूनच घ्यावे लागेल हे विलासराव नेहमी म्हणत आणि आज त्यांच्या या द्रष्टेपणाचा प्रत्यवाय महाराष्ट्राला येतोय, त्यांनी उदगारलेले हे वाक्य आज आपल्या सगळ्यांना वास्तव स्वरूपात पहावे लागत आहे. या अशा परिस्थितीत भूमिहीन मजुरालादेखील पाण्याचे समान वाटप व्हावे या मागणीसाठी लढा देणारे, तसेच सामूहिक व्यवस्थापनाद्वारे पाण्याची साठवण व वितरण करून शेतकऱ्यांचा आर्थिक व सामाजिक विकास घडवू, अशी संकल्पना ज्यांनी मांडली अशा विलासरावांचा आपल्याला विसर पडणे यासारखे दुसरे दुर्दैव काय?

व्यवस्थापन म्हटले की नियम – नियमन आले, त्यासाठी आधी धोरण निश्चित करावे लागते, उद्दिष्टे ठरवावी लागतात, मार्गदर्शक तत्त्वे ठरवावी लागतात आणि त्यानुरूप कायदे करावे लागतात, सर्वांची सोय पहावी लागते, सर्वांना न्याय द्यावा लागतो. जलव्यवस्थापनातही हीच सूत्रे लागू पडतात. जल व्यवस्थापनाचा उद्देशच सर्व गरजवंतांना समन्यायी तत्त्वावर नेमक्या वेळी, नेमके मोजून, भरवशाचे, शुद्ध– स्वच्छ पाणी योग्य ठिकाणी रास्त दरात पुरविणे हा आहे आणि संपूर्ण यंत्रणेचे ते आद्यकर्तव्यच असले पाहिजे. विलासराव म्हणत की 'जिद्द, सामाजिक बांधिलकी आणि भारतीय जीवनमूल्यांचा अभिमान असणाऱ्या हजारो तरुणांची या ग्रामीण भूमीला गरज आहे' परंतु हाय रे दुर्दैव, आजच्या तरुण पिढीला ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासामधील पाणी, जमीन व पर्यावरण ह्या संदर्भातील आर्थिक सिद्धांत, तत्वप्रणाली व विलासरावांनी केलेले प्रयोग ह्यांची साधी तोंडओळखही नाही. हे कटू वाटले तरी सत्यच आहे आणि म्हणूनच दोनशे वर्षे पुढचा विचार करणारे द्रष्टे कर्मयोगी विलासराव आणि त्यांची स्वप्ने आजच्या व भविष्यातल्याही पिढ्यांना माहीत असायलाच हवीत.

आजमितीला राज्यात जवळपास २८८० पाणीवापर संस्था कार्यरत आहेत, त्या संस्थांची सद्यस्थिती अभ्यासून ती सुधारण्यासाठी उपाययोजना सूचवणे हे काम टाटा समाजविज्ञान संस्थेकडे सोपवले गेले होते. त्या संस्थेचा अहवाल एका संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यातले हे विधान The current status can be summarised as, WUAs are born weak, nurtured weak and eventually they die weak अर्थात पाणीवापर संस्था अशक्त म्हणून जन्मतात, त्यांची देखरेख देखील अशी होते की जणू त्यांनी कुपोषितच रहावे आणि शेवटी त्यांचा अंतही या अशा अशक्तपणामुळेच होतो. पाणीवापर संस्थांच्या अपयशावर फक्त या संस्था यशस्वी व्हाव्यात म्हणून आम्ही भरपूर प्रयत्न केले पण आम्हाला यश मिळाले नाही आणि आता सिंचन व्यवस्थापनाचे खाजगीकरण हाच एक पर्याय आहे एवढे म्हणणे पुरेसे आहे काय? की मुळातच सिंचन व्यवस्थापनाचे खाजगीकरण व्हावे याकरिताच जाणीवपूर्वक पाणीवापर संस्थांना असे अशक्त ठेवले जातेय? ज्या पद्धतीने जलक्षेत्रात तज्ञ–अभ्यासकांकडे दुर्लक्ष आणि अर्धवट जलमहापुरुष – सेलिब्रिटींना मुक्तस्वातंत्र्य दिले जातेय ते पाहता शंकेला वाव आहेच असे म्हणावे लागते, जणू 'पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा आणि वेश्येला मणीहारच', होय, समाज जलनिरक्षर ठेवून खाजगीकरण तर केव्हाच सुरू झाले आहे.

असं म्हणतात की, कुठल्याही अन्यायाविरुध्द लढताना एक संघर्ष भूमिका असावी असते', जसे की पूर्वी परदेशी आक्रमकांविरुद्ध स्थानिक भूमिपुत्रांचा लढा, भांडवलशाही विरुद्ध कामगार म्हणजेच मालक विरुद्ध गुलाम, शिवाय जाती-शोषणाविरुद्ध वर्गवादाशी संघर्ष आणि आता जलक्षेत्राच्या वर्तमान स्थितीकडे पाहता हा संघर्ष तज्ञ-अभ्यासक विरुद्ध खड्डेखोर असा दिसतोय. परंतु हा विचार आज कितीजणांच्या खिजगिनतीत तरी आहे? अजूनही आपण जागे नाहीच. विलासरावांनी 'महाराष्ट्रातील काय, किंबहुना देशाचा पाणीप्रश्न हा मानवनिर्मित आहे, निसर्गनिर्मित नाही हा सामान्यांना वरकरणी चुकीचा वाटणारा आणि दिवसेंदिवस पावसाच्या बेभरवशीपणाला आणि आपल्या नशिबाला शिव्याशाप देत बसणाऱ्या शेतकरी, पुढारी वर्गाच्या मतांमुळे चूक वाटणारा सिद्धांत अतिशय विचारपूर्वक मांडला होता. १९७२च्या भीषण दुष्काळाच्या हृदयविदारक दर्शनामुळे इंजिनिअर व यशस्वी उद्योजक असलेल्या संवेदनशील विलासरावांनी यावर खात्रीचा उपाय असू शकतो हे सिद्ध करण्याचा चंगच बांधला आणि दृढ इच्छाशक्ती, श्रममूल्याची प्रतिष्ठा, साध्या राहणीमानाचे जीवनव्रत आणि तळागाळातील कष्टकऱ्यांबद्दल आंतरिक प्रेम या स्वभाव वैशिष्ट्यांच्या जोरावर तो पूर्णत्वासही नेला.

जे पाणी दुष्काळसदृश्य परस्थितीनंतर उपलब्ध आहे त्याच्या इतर उपयोगासमवेतच, कालव्याद्वारे शेताच्या बांधापर्यंत पोचणाऱ्या पाण्यासाठीही सर्वांनी तेवढेच दक्ष असले पाहिजे म्हणत त्यांनी पाणीप्रश्नाप्रतीचे गांभीर्य सर्वांच्या निदर्शनास आणून दिले. सामाजिक जागृती आणि लोकसहभाग ही जरी अत्यावश्यक गोष्ट असली तरी त्यामागे तांत्रिक नियोजन तपशील, अंमलबजावणीत नियम-कायद्याचा धाक, निरपेक्ष मूल्यमापन असेल तरच जल व्यवस्थापन सुयोग्य पद्धतीने होईल हे त्यांनी सोदाहरण दाखवून दिले. म्हणूनच अण्णा हजारे, पोपटराव पवार आदी मंडळी देखील पाणी प्रश्नांवर काम करताना विलासरावांच्याच विचारांची प्रेरणा व स्फूर्ती होती हे सहज कबुल करतात. नुसतं खेड्याकडे चला अशी पोकळ आवाहनं न करता गावपातळीवर 'पाणी पंचायत' या संकल्पनेतून पाण्याची अशा प्रकारची चर्चा करणारा हा द्रष्टा प्रणेता म्हणूनच देशभरात ओळखला जातो. 'खेड्याकडे चला' असं म्हणणाऱ्या गांधीजी व संत तुकारामांचे ते खरे कृतिशील अनुयायी होय.

समन्यायी वाटप आणि समान वाटप यातील फरक लक्षात घ्यायला हवा. एक लिटर दुधाचे आई-वडील, लहान मूल आणि वयस्क आजोबा यांच्यात समान वाटप केले तर प्रत्येकाला पाव लिटर दूध मिळेल पण लहान मुलाला ३५० मि.लि, आजोबांना २५० मि.लि, उरलेल्या ४०० मि.लिचे इतरांना चहा आणि सर्वांसाठी दही हे खरे समन्यायी वाटप होईल. पाणलोटाचेही असेच आहे, नदीच्या काठावर जशी माणसे असतात तशीच ती उगमाकडे, मुखाकडे, मधल्या पट्टीतही असतात, वरच्यानी सगळे पाणी अडवले तर खालच्यानी काय करायचे? आज ज्या पद्धतीने पाणी अडवण्यासाठी धरणे, शेततळे, नाला खोलीकरण, बंधारे वगैरे उपाय केले जात आहेत आणि ज्या पद्धतीने हे अडवलेले पाणी वापरले जाते ते पाहता समानसंधी व निरनिराळ्या वापरात समतोलाने समन्यायाचे तत्त्व खरेच पाळले जातेय का? नदी -निसर्गाचे पर्यावरणीय हक्क (Riparian Rights) म्हणून पाणी राखीव ठेवायचे असते, जमिनीवरून जे पाणी वाहून जाते त्याच्याबाबतीत उताराच्या वरच्या आणि खालच्या लोकांचे अधिकार काय, जबाबदाऱ्या काय, असे प्रश्न असतात, वरच्या शेतकऱ्यांनी तात्पुरते आपल्या सोयीसाठी पाणी अडवले आणि सोडून दिले, खालच्याला पाणी मिळूच नये म्हणून हद्दीवरच पाणी धरून ठेवले, खालच्याने आपल्या शेताच्या वरच्या अंगाला पाणी अडवून वरच्याचे काही शेत पाण्याखाली घातले, अशा रोजच्या व्यवहारातील अनेक अडचणी असतात. अशावेळी पाण्याचे सामूहिक व्यवस्थापन व्हायला हवे हे मांडणारी व त्याचा आग्रह धरणारी विचारधारा गायबच झाली आहे.

थोडक्यात मी जसं आणि जेवढं अडवायचं तेवढे अडविणार आणि पाणी वितरण व्यवस्थेतील त्रूटी-अडचणी समजून घेण्याची जबाबदारी मात्र ईतरांवर ढकलणार आणि स्वतःला त्रास भोगावा लागला तर लगेच समन्यायी पाणी वाटप व्हावंच म्हणून बोंबा मारणार, ईतरांचा विचार करण्यासाठी, समन्यायी पाणी वाटप धोरणासाठी, तसेच तांत्रिकता दृष्टिकोनातून जल आराखडा समजून घेण्यासाठी कितीजण तयार आहेत? माझी विहिर, माझं शेततळे यावर एखादी योजना, एखादी संरचना चांगलीच म्हणून रेटून बोलायचं कितपत योग्य? एकदा टीव्हीवर पाण्याबद्दल चर्चा सुरू होती, त्यात समन्यायी पाणीवाटप म्हणजे मराठवाड्याला प्यायला पाणी दिले म्हणजे नाशिक-नगरची जबाबदारी संपली असा विचार नाशिक प्रदेशातील एका महिला आमदारांनी मांडला, असंच सध्या पुणे -सोलापूर पाणीवाटपाबाबतीतही घडतंय. खरंच या लोकप्रतिनिधींची एक कार्यशाळा घेऊन त्यांना समन्यायी पाणीवाटप म्हणजे काय ते विलासरावांच्या कार्याचा संदर्भ देत समजावून सांगण्याची आवश्यकता आहे.

उत्पन्नकेंद्रीत भावनेतून अमर्याद भूजल उपसा पण पूनर्भरण म्हणून, पाणी वाचविण्यासाठी म्हणून शून्य योगदान असणारी मंडळी जेव्हा भूजल वैज्ञानिकांना आम्हाला खात्रीची पाण्याची जागा शोधून द्या म्हणतात, जलसाक्षरता प्रसारात योगदान, जल प्रदुषणाकडे लक्ष, पाणीवापरात काटकसर म्हटलं की मला काय त्याचे? म्हणणारी माणसं दिसतात, पर्यावरणीय प्रवाह, अंत्योदयी अधिकारासाठी समन्यायी पाणीवाटप, खोल गेलेली भूजलपातळी, घटती वनसंपदा या सगळ्याशी घेणं नसणारी माणसं जेव्हा पाण्याची जागा शोधून द्या म्हणतात, बिसलेरीचा उद्योग, टँकरच्या धंद्यासाठी, आरओ प्लांट सुरळीत सुरू रहावा म्हणून, माझं शेततळं भरलेलं रहावं यासाठी, कोरडवाहू क्षेत्रातल्या उसासाठी, जेव्हा पाण्याची जागा शोधून द्या म्हणतात, तेव्हा खरंच भूजल वैज्ञानिक म्हणून मला शिसारीच येते.

सध्याच्या भूजल कायदा अंमलबजावणीची स्थिती पहा, दरवर्षी गावशिवारात किती पाणी अडवलं जात असावं? किती जमिनीत मुरंत असावं? जमिनीवरच्या पाणीसाठ्यातून बाष्पीभवन किती होत असावं? जमिनीतून नेमकं किती भूजल उपसलं गेलं असावं? अगदी स्थानिक ग्रामपातळीवर पाहिले तर समजेल कि डोह-तळ्यातले, बंधारे-धरणातले पाणी दिसतेय तरी, ते संपत चाललेले कळते तरी परंतु, भूजल संपत चालले आहे/ संपले आहे हे कळलेच नाही. भूजलाचा आपल्याकडील किती साठा होता आणि किती वापरानं तो संपणार होता ते माहितच नव्हते. एखाद्याच्या बँकखात्यात नेमकी बचत किती आहे? त्याचं मासिक उत्पन्न किती आहे? त्याचा किमान/कमाल

खर्च आवश्यकता किती आहे? हे माहित नसताना नियोजन तरी कसं होणार? या सर्व बाबी कळण्यासाठी आपल्या गावशिवाराचा ईत्यंभूत माहिती देणारा भूजल आराखडा एकाच ठिकाणी उपलब्ध असायला हवा जो दुर्दैवाने आज आपल्या हातात नाही. राज्याच्या ४४ हजार सूक्ष्मपाणलोटक्षेत्राचे गुणधर्म उकलणारी अशी आकडेवारी उपलब्ध असणे आवश्यक असताना आज कोणत्याही विभागाकडे राज्यातील विहिरींची वा विंधनविहिरींची संपुर्ण अशी नोंद नाही. सध्याची शासनप्रणीत यंत्रणा याकरिता तोकडी आहे, महाराष्ट्रातील भूगर्भवैविधतेचा विचार करता या निरिक्षणाद्वारे पाणलोटाचे वर्गीकरण करणे अत्यंत अशास्त्रीय आहे. लहान गावात प्रत्येक शेतीप्लाटमध्ये आणि मोठ्या शहरातही अगदी घर-सोसायटीनिहाय विंधनविहीर आहे ज्यातून भूजल उपसा केला जातो मात्र याची नोंद ना नगरपालिकेकडे ना भूजल विभागाकडे, किती भुजल उपसा होतोय हे कळणार तरी कसे? सुरक्षित म्हणून गणल्या गेलेल्या पाणलोटात (२० हजार हेक्टर) बराचसा भाग असुरक्षित तर याउलट असुरक्षित म्हणून गणल्या गेलेल्या क्षेत्रातील काही भाग सुरक्षित म्हणून मोकळा करावा लागतो. म्हणूनच भूजलसंबंधी भूगर्भीय रचनेची माहिती संकलीत करून अभ्यास करण्याची नितांत गरज आहे. गावशिवारातील प्रभावक्षेत्राचा आकार, पाणलोट क्षेत्र निहाय चतु:सीमा निश्चिती, विहिरी-बोअरचे भुजल पातळीसाठी निरिक्षण, पर्जन्यमापक, बाष्पमापक, प्रवाहमापक वापर करून गावाचा जललेखा, भूजल नकाशा सहज तयार करता येईल. यातून होणारी जलसाक्षरता हि शासनप्रणित योजना, कायदे-नियम अंमलबजावणीसाठी, लोकसहभागाची प्रक्रिया राबविणेसाठी, कायद्याचा मसूदा निर्माण करून त्यास जनाधार मिळविण्यासाठीही अत्यंत उपयुक्त ठरेल आणि होऊ घातलेल्या भूजल कायद्याची अंमलबजावणी सुकर करील अन्यथा हा कायदा कागदावरच राहील.

महाराष्ट्रात पाण्याची असमान उपलब्धता आणि वापर या ज्वलंत मुद्द्यांएवढाच पाण्याचे असमान वितरण हाही कळीचा मुद्दा आहे म्हणूनच महाराष्ट्रात वेगाने होणारे नागरीकरण आणि त्याचा उपलब्ध पाणीसाठ्यांवर पडणारा ताण पाहता पाण्याचे न्याय्य वाटप ही काळाची गरज आहे. त्यादृष्टीने पाणीवापर संस्थांच्या माध्यमातून सिंचन व्यवस्थापनात शेतकऱ्यांचा सहभाग वाढवून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने आणि सुयोग्य पद्धतीने वापर करण्यावर लक्ष दिले पाहिजे. पाणीपट्टी न भरणे, अधिकाऱ्यांशी साटलोटे करून अनधिकृतपणे सिंचन, पाण्याचा प्राधान्यक्रम न पाळणे, जबाबदारी न घेण्याची लाभधारकांची वृत्ती, शेतकऱ्यांना सहभागी न करून घेण्याची संबंधित विभागाच्या अधिकारी, कर्मचारी यांची मानसिकता, संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम नसणे, वितरण व्यवस्थेची दुरुस्ती वेळेत न होणे, पाणीवापर संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचा मनमानी कारभार, पाणीपट्टी दराबाबत निश्चित सूत्राचा अभाव या सर्व गोष्टी पाणीवापर संस्थांच्या प्रभावी अंमलबजावणीतील मोठा अडथळा आहेत.

पाणीवापर संस्था यशस्वी होण्यासाठी विश्वासाचे वातावरण निर्माण करणे, शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन सकारात्मक भूमिका असणाऱ्या शेतकऱ्यांना प्राधान्य, शासकीय अभियंते, संस्था सचिव, अध्यक्ष यांचे प्रशिक्षण, उत्कृष्ट काम करणाऱ्यांचा सन्मान, जमिनीची मालकी असो वा नसो; महिलांना पाणीवापर संस्थेत सर्व अधिकारांसह सदस्यत्व, उपसासिंचन योजनांचे कार्यक्षेत्र निश्चित करून त्याचा पाणीवापर हक्क जाहीर करणे, जल आराखडा - जललेखा (वॉटर ऑडिट) बंधनकारक करणे या बाबी केल्यास राज्यात समन्यायी तत्वाने पाणीवापर संस्थांची अंमलबजावणी यशस्वीपणे होऊ शकते. वर्तमान परिस्थितीत कदाचित हे अवघड वाटेल पण अशक्य नाही.

विलासरावांनी हे आधीच ओळखले होते पण कदाचित काळाच्या फारच पुढचा विचार करीत असल्यानेच त्यांचा विचार सर्वसामान्यांना पचला नाही अथवा समाजातील दांभिकतेनं कळस गाठल्याने विलासरावांच्या विचारांना समजून घेण्याची कुवतच राहिली नाही या निष्कर्षाप्रत येऊन पोहोचणे अपरिहार्य आहे असे मला तरी वैयक्तिक वाटते आहे. पोपटराव पवार, सरपंच हिवरे बाजार, जि. अहमदनगर यांच्या प्रयोगाने माझ्यापेक्षा पुढची पायरी गाठली आहे, हे सांगणारे विलासराव पाहिले की काही सध्याचे स्वयंसेवी महात्मे आपण न केलेले कामही स्वतःच्या नावावर खपवताना पाहून कीव येते. मृदू, मितभाषी पण नेमकेपणाने कोरडवाहू शेतकऱ्याच्या गरिबीचे मूळ शोधणारे, माणशी अर्धा एकर पाणी या सिद्धांताचे जनक, पाणीपंचायतीचे संस्थापक, अध्यक्ष विलासराव २३ एप्रिल २००२ रोजी काळाच्या पडद्याआड गेले परंतु जाण्याआधी आपल्या सर्वांसाठी एक महान विचार वारसा सोडून गेले.

सध्या विविध सरकारी खाती-विभाग प्रामाणिकपणे कार्यरत आहेत असे समजू पण तरीही गेली दहा वर्षे महाराष्ट्र राज्य दुष्काळाशी झुंजत आहे आणि येणारा काळ अधिकच तिव्रता दाखविणारा असेल याबाबत कुणालाच शंका नाही आणि त्याचं कारण व यावरील उपाय याबाबतीत संभ्रमाची स्थिती आहे. सरकारचे धोरण - प्रयत्न प्रामाणिक आहेत हे तात्पुरते मान्य जरी केले तरी आपल्या आजूबाजूला जी पाणी परिस्थिती दिसतेय ती पाहता कुठंतरी, काहीतरी चुकतं आहे हे बहूअंशी मान्य होणारं. या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांच्या मनात विकासाची सामुहिक भावना निर्माण करणे, पर्यावरण व मानवी गरजा यांचा ताळमेळ घालणे, भूमीहीन लोकांना देखील पाण्यावर हक्क देणं अशा अनेक नाविन्यपूर्ण गोष्टींवर कार्य करणाऱ्या पाणी पंचायतसारख्या लोकचळवळीचे महत्व गावातील शेवटच्या माणसापर्यन्त पोचवायला हवे हा संकल्प मनी धरावा हीच अपेक्षा.


.... विनम्र अभिवादन

लेखक : उपेंद्रदादा धोंडे, सहज जलबोधकार म्हणून महाराष्ट्रात परिचित, केंद्रीय भूजल विभागात वरिष्ठ भूजलतज्ञ पदावर कार्यरत, सहज जलबोध अभियान चळवळीचे प्रणेता, भूजल विज्ञान सोप्या भाषेत समाजापुढे मांडण्यासाठी अनेक पुस्तकांचे लिखाण.

*****

# विलासराव साळुंखे : जलनियोजनाच्या क्षेत्रातील मानदंड

श्री. के. जे. जॉय – मो : ९४२२५०५४७३



ते आपल्याला सोडून गेल्याला वीस वर्षे झाली आहेत. काळ भराभर पुढे सरकत राहतो. काही दिवसांपूर्वी प्रसाद सेवेकरीचा मला फोन आला. विलासरावांच्या विसाव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने जलसंवाद मासिकाचा विशेषांक निघतोय त्यासाठी मी लिहू शकेन का म्हणून त्याने विचारणा केली. तेव्हाच मला जरा धक्का बसला आणि प्रकर्षाने जाणवले ते विलासराव आपल्यात नसल्याचे वास्तव.. जे हळू हळू झिरपत गेले...

गेली वीस वर्षे ते आपल्यासोबत नाहीत असे मला कधी वाटलेच नाही. कारण ते कायम माझ्या आठवणीं मध्ये होते, मी सतत त्यांचा संदर्भ देत होतो, त्यांच्याबद्दल आणि पाणी पंचायतीची चळवळ उभी करणाऱ्या ग्राम गौरव प्रतिष्ठानच्या प्रवर्तक प्रयत्नाबद्दल बोलत होतो. महाराष्ट्राच्या सामाजिक– राजकीय कार्यक्रम पत्रिकेवर समन्यायी पाणी वाटपाचा मुद्दा हा सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या जीवन आणि उपजीविकेचा हक्क म्हणून ठासून पुढे आणण्याचे काम ह्याच प्रयत्नांमधून साकार झाले होते. माझ्यासाठी ते कायमच एक मानदंड होते. मला खात्री आहे की इतर अनेकांना त्यातही माझे जलनियोजन क्षेत्रातील समकालीन सहकारी, ज्याना म्हणून विलासरावांसोबत काम करण्याची आणि त्यांच्याकडून काही शिकण्याची संधी मिळाली असेल, त्या सर्वांना असेच वाटत असेल.

सर्वात प्रथम मी विलासराव आणि पाणी पंचायतीबद्दल ऐकले ते महाराष्ट्र लोक विज्ञान संघटनेने आयोजित केलेल्या महाराष्ट्रातील दुष्काळ आणि पाणी प्रश्नावरील एका शिबिरात. माझ्या आठवणीनुसार ते ८० च्या दशकाच्या मध्यातले कुठले तरी वर्ष असावे. मी मुक्ती संघर्ष चळवळीचा पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून सांगली जिल्ह्याच्या दुष्काळग्रस्त गावांमध्ये काम करत होतो. या शिबिरात पाणी पंचायत आणि त्यांच्या माणशी, समन्यायी पद्धतीने मोजून पाणी देण्याच्या तत्वाबद्दल जे काही ऐकले ते निश्चितच एक वेगळा मार्ग दाखवणारे होते. मला असे वाटले की ज्याची जमीन त्याला तितके पाणी ही सांगड मोडणे आणि सिंचनासाठीचे पाणी हे त्या शेतकऱ्याच्या जमीन धारणेनुसार नव्हे तर त्या घरातील माणसांच्या संख्येनुसार ठरवले जाणे हेच मुळात क्रांतिकारी होते. त्याच सुमारास आमची मुक्ती संघर्ष चळवळ देखील सांगली जिल्ह्यातील दुष्काळ निवारणासाठी पर्यायांच्या शोधात होती. काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांच्या उपजीविकेसाठी पाणी हाच एक मुख्य अडसर असल्याने मुक्ती संघर्ष चळवळीने पाण्याचे समान वाटप आणि पाण्याचा हक्क प्रत्येकास – मग तो भूमीहीन का असेना, हे आमच्या दुष्काळ निवारण रणनीतीचे महत्वाचे सूत्र बनवले. मला आठवते की जेव्हा केव्हा आमचेच काही ग्रामीण भागातील कार्यकर्ते आणि विशेषत: सिंचन खात्यातील काही सरकारी अधिकारीदेखील समन्यायी पाणी वाटपाच्या शक्याशक्यतेबद्दल शंका घेत तेव्हा आम्ही पाणी यांचायत आणि विलासरावांच्या कामाची उदाहरणे देत असू. मुक्ती संघर्ष चळवळीतील आम्हा लोकांसाठी आणि आमच्या समन्यायी पाणी वाटपाबाबतच्या संघर्षांमध्ये विलासराव हे एक मानदंड झाले होते. पाणी पंचायतीच्या अनुभवाच्या आधारे आम्ही समन्यायी पाणी वाटपाची आमची चळवळ पुढे नेऊ शकलो. मुक्ती संघर्ष चळवळीच्या माध्यमातून सिंचन योजनांच्या पाणी वाटपात समन्यायाचे धोरण राबवण्यासाठी आम्ही अनेक जन–आंदोलने छेडली. त्यातलेच एक ताकारी–म्हैसाळ उपसा सिंचन योजनेच्या पाणी वाटपाच्या पुनर्रचने बाबतचे. खरं तर, १९९०च्या सुमारास सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील समन्यायी पाणी वाटपावर बेतलेल्या तीन पाणी वापर संस्थांच्या उद्घाटनासाठी आम्ही विलासरावांनाच बोलावले होते.

एकोणीसशे नव्वदच्या सुमारासच मी पुण्यात दाखल झालो आणि माझ्या विलासरावांसोबतच्या चर्चा आणि भेटी–गाठी वाढल्या. त्याच काळात सहभागी जलनियोजन क्षेत्रातील एखादी नवीन संस्था स्थापन करावी आणि त्यामार्फत धोरणात्मक बदलांसाठी संस्थात्मक संघटन तसेच पर्यायी प्रयोग उभारण्यासाठी प्रयत्न करावेत असा विचार आकार घेत होता. या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्राच्या पातळीवर ज्याचा गाभा हा समानता, शाश्वतता, कार्यक्षमता आणि लोकशाहीच्या मुद्यांवर आधारलेला असेल, असा एक नवा पर्यायी विकासाभिमुख दृष्टिकोन आणि रणनीती आखण्याची आमची इच्छा होती. या प्रयोगासाठी वेळोवेळी होणाऱ्या चर्चासत्रात कृ.रा.दात्ये, श्री.अ. दाभोळकर, विलासराव साळुंखे, र.कृ.पाटील, श्री. ना. लेले, आणि बापूसाहेब उपाध्ये यांसारख्या दिग्गजांसोबत सहभागी होण्याची संधी मला लाभली. माझ्या स्वत:साठी हा नक्कीच एक परिवर्तनकारी अनुभव होता.

आजच्या घडीला बिगर सरकारी –स्वयंसेवी संस्थांमध्ये काम करणाऱ्या तुमच्या–आमच्यासारख्या अनेकांना असलेल्या विवंचना , म्हणजे संस्थेसाठी प्रकल्प कसे मिळवावेत, किंवा एफ. सी. आर. ए कसं 'मॅनेज' करावे असल्या विषयांवर या दिग्गजांच्या गप्पा होत नसत. त्यांच्या चर्चेचे विषय म्हणजे नावीन्यपूर्ण संकल्पना, त्यांचे कार्यान्वयन करण्यासाठीच्या रणनीती आणि धोरण बदलाची गरज. विलासराव साळुंखे यांनी आमच्या सोप्पेकॉम संस्थेचे संस्थापक अध्यक्षपद स्वीकारणे हेच आमच्यासाठी विशेष होते. सोप्पेकॉम मधील त्याकाळातील आम्हा तरुणांना – सुहास परांजपे, विलास गोरे, सीमा

कुलकर्णी, तारक काटे, दिवंगत रमेश बोरोले – या दिग्गजांशी बोलण्याची आणि त्यांच्याकडून शिकण्याची संधी मिळाली. मी नेहेमीच म्हणतो की , 'सोप्पेकॉम आज अशा दिग्गजांच्या आधारावरच खंबीरपणे उभी आहे'.

मला वाटते की नव्वदच्या दशकातच केव्हातरी 'न्यायालायाने महाराष्ट्र शासनाला समन्यायी पाणी वाटप हे राज्याच्या पाणी धोरणाचे एक अंग बनवण्यास भाग पाडावे' या मागणीसाठी मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. सोप्पेकॉम मधील आमच्यापैकी काही जणांनी यावेळेस त्यांच्यासोबत काम केले होते. मला आजही निश्चितच असे वाटते की सर्वसामान्यांच्या जीवनाचा आणि उपजीविकेचा हक्क म्हणून समन्याय आणि पाणी–हक्काचा प्रश आपण धसास लावला पाहिजे. जल नियोजन क्षेत्राची समन्यायाधारित धोरणात्मक पुनर्रचना घडवायची असेल असतील तर समन्यायी पाण्याच्या अधिकारास संवैधानिक अधिकाराचे स्वरूप आलेच पाहिजे.

मला स्वत:ला विलासरावांकडून व्यक्तीगत स्नेह आणि जिव्हाळा लाभला होता. कदाचित, मी केरळातील असल्याने अनेकदा त्यांनी केरळी संस्कृति, लोक, सार्वजनिक आरोग्य आणि पर्यायी आरोग्य सुविधा, स्थानिक स्वराज्य संस्था, विकेंद्रीकरण आणि थोडक्यात..विकासाचे प्रारूप याविषयी वाटणारे कुतूहल आणि आकर्षण माझ्याकडे व्यक्त केले होते.

माझ्यासारखेच विलासरावांना ओळखणारे सर्वच जण मान्य करतील की ते अत्यंत साधे गृहस्थ होते, त्यांची राहणी अतिशय साधी होती, गरजा मर्यादित होत्या आणि 'बोले तैसा चाले' अशी त्यांची प्रवृत्ती होती. पाणी पंचायतीसारखे क्रांतिकारी प्रवर्तक कार्य करूनही 'भारताचे पाणीवाले बाबा' या सारखे बिरुद त्यांनी कधीही मिरवले नाही. त्यांनी कधी कुठल्या बैठकीत आवाज चढवला आहे, ते रागावले आहेत असे मला कधीच आढळले नाही. खरंतर ते इतके मितभाषी आणि हळू आवाजात बोलणारे होते की कधी कधी ते काय म्हणत आहेत हे बैठकांमध्ये ऐकूदेखील यायचे नाही. बोलताना ते कायम संत तुकारामयांच्या अभंगांचे दाखले देत.. विशेषत: 'उदक चलवावे युक्ती', जे त्यांच्या एका पुस्तकाचे शीर्षकही आहे. ते मानवतावादी होते आणि अंतर्बाह्य बुद्धिवादी होते. उदाहरणार्थ मृत्यूनंतर देहाचे दहन करण्याऐवजी दफन केले जावे याबद्दल ते आग्रही असत. कारण ते म्हणायचे की दफनानंतर मानवी शरीर हे अन्य जीव जंतुंच्या खाद्याचे साधन बनते आणि अन्न साखळी सुरू ठेवण्यास मदतच करते. मला आठवते की ते लोकांना मृत्यूपश्चात दफनासाठी राजी करण्यासाठी छापील जवळ ठेवत आणि मिटिंगच्या वेळेस लोकांना भरायला देत. दफन भूमीवर, दफनाच्या जागी त्या व्यक्तीच्या स्मरणार्थ वृक्षारोपण केले जावे अशीही त्यांची कल्पना होती. एकदा सोप्पेकॉम मध्ये माझ्याकडूनही त्यांनी असा अर्ज भरून घेतला होता.

आपण सर्व हे जाणतोच की सध्या देशातील पाणी प्रश्न उग्र,गंभीर बनला आहे. पाण्याचे टँकर हे या समस्येवरचे उत्तर निश्चितच नाही. गरज आहे ती प्रचलित कृती–प्रवाहांपेक्षा वेगळ्या पर्यायांचा विचार करण्याची. यातील एक महत्वाची बाब म्हणजे पुरवठा अधिक बळकट करण्याऐवजी मागणीचे योग्य व्यवस्थापन करणे... यात जास्त पाणी घेणाऱ्या पिकांपासून दूर जाण्याची गरज स्वाभाविकपणे अंतर्भूत आहे. असे केले तरच आपण शेतीतील जलपदचिन्ह कमी करू शकू. इथेच विलासरावांच्या समन्यायाधारित जलव्यवस्थापनाच्या विचारांची आत्यंतिक गरज जाणवते. ते दूरदर्शी होते आणि अन्य एखाद्या दूरदर्शी महानुभावाप्रमाणेच त्यांच्या काळाच्या कित्येक योजने पुढेच होते.

अनुवाद : प्रसाद भगवान सेवेकरी

*****

जलसंवाद हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. दत्ता देशकर यांनी श्री.जे. प्रिंटर्स प्रा. लि, दत्तकुटी १४१६, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० येथे
ऐ – २०१, व्यंकटेश मीराबेल अपार्टमेंटस, पॅनकार्ड क्लब जवळ, बाणेर हिल्स, पुणे – ४११०४५ येथे प्रसिध्द केले.
संपादक डॉ. दत्ता देशकर
e-mail - dgdwater@gmail.com
मासिकाची वेबसाईट - www.jalsamvad.com

Jalsamvad monthly is owned, Printed & Published by Datta Ganesh Deshkar, Printed at Shree J Printers Pvt. Ltd., 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune - 411030
&
Published at A/201, Mirabel Apartments, Near Pan Card Club, Baner, Pune - 411045.
Editor - Datta Ganesh Deshkar

# जलक्षेत्रातील कार्व्हर - विलासराव साळुंखे

**श्री. मयुर बाळकृष्ण बागुल**

**मो : ९०९६२१०६६९**



विलासराव साळुंखे हे भूमिहीन मजुरला देखील पाण्याचे समान वाटप व्हावे. या मागणीसाठी ३० वर्षे लढा देणारे तसेच 'पाणी पंचायत या संकल्पनेने सामूहिक व्यवस्थापनाद्वारे पाण्याची साठवण व वितरण करून शेतकऱ्यांचा आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणणारे सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांचा जन्म १८ फेब्रुवारी १९३७ रोजी सांगली जिल्ह्यातील धूळगाव येथे झाला. त्यांनी पुण्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातून पदवी घेतली. त्यांचा १९७३ सालीचा पुरंदर तालुक्यातील नायगाव येथील पाणलोट क्षेत्रविकास व त्याआधारे शेतीसिंचन हा प्रयोग विलक्षण गाजला व तो नायगाव पॅटर्न या नावाने ओळखला जातो. आजच्या तरुण पिढीला विलासराव साळुंखेची ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासामधील पाणी, जमीन व पर्यावरण या संदर्भातील आर्थिक सिद्धांत, तत्त्वप्रणाली व त्यांनी केलेले प्रयोग यांची तोंडओळख नाही. ते दोनशे वर्षे पुढे विचार करणारे द्रष्टे कर्मयोगी होते. 'एक होता कार्व्हर' या प्रसिद्ध पुस्तकाच्या लेखिका वीणा गवाणकर यांनी विलासरावांवर 'भगीरथाचे वारस' हे पुस्तक लिहिले आहे, यात बरेच काही आले. विलासराव असे म्हणत, की या शेती शास्त्रज्ञ डॉ. कार्व्हर प्रमाणेच जिद्द, सामाजिक बांधिलकी आणि भारतीय जीवनमूल्यांचा अभिमान असणाऱ्या हजारो तरुणांची ग्रामीण भूमी आतुरतेने वाट पाहत आहे.

विलासरावांना परदेशातील तंत्रज्ञानाच्या शोधात जपान, अमेरिका, युरोपीय देश, इंग्लंड, कॅनडा अशा अनेक देशांमध्ये भ्रमण करण्याचा योग आला. तिथे चाललेले अतिरेकी आधुनिकीकरण व चंगळखोर भोगवादी संस्कृती त्यांच्या आध्यात्मिक मनाला अस्वस्थ करीत असे. पाणी या विषयासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. त्यांचे निष्कर्ष त्यांच्या स्वानुभवावर आधारित व प्रयोगाने सिद्ध झालेले असायचे. त्यांच्या वक्तव्यातील प्रांजळपणा व आंतरिक तळमळ समोरच्यांना भावून टाकायची. 'महाराष्ट्राच्या जलसंपत्तीचे नियोजन– पाण्याचे न्यायवाटप, धोरण, दिशा, कार्यवाही' या त्यांच्या पुस्तकात दिलेली माहिती, आकडेवारी, सांख्यिकी तक्ते पाहून लक्षात येते की त्यांची मांडणी किती शास्त्रशुद्ध व सुसूत्रबद्ध होती. इस्राईलला भेट देऊन आल्यानंतर विलासराव म्हणाले, की फक्त ठिबक सिंचनाची व उपदेशाची जलनीती न सांगता तिथल्या समान वाटप शिस्तीचे नियोजन, पाण्याचे कायदे, स्वतंत्र पाणी आयोग याचे अनुकरण करावे लागेल. कार्पोरेट क्षेत्राची पार्श्वभूमी असल्यामुळे विलासरावांना कार्यकर्ते, शेतकरी यांच्या प्रशिक्षणाचे महत्त्व माहिती होते. 'पाणी पंचायती'च्या माध्यमातून आजपर्यंत हजारो कार्यकर्ते प्रशिक्षण घेऊन तयार झालेत. यामध्ये लोक संघटन, जमीन व पाण्याचे गावपातळीवरील नियोजन, सामूहिक पाणीवाटप, सेंद्रिय शेती, पर्यावरण वगैरे विषयांचा अंतर्भाव होता. त्या ठिकाणी शिबिरार्थींच्या निवासाची, जेवणाची ही व्यवस्था केली गेली. विलासरावांनी 'पाणी पंचायत' हे चळवळीचे मुखपत्र द्विमासिक सुरू केले. त्यात जलप्रकल्प, चळवळीतील अनुभव, ग्रामीण विकास, दुष्काळ उपाययोजना वगैरे विषय असायचे. विलासरावांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाला व त्यांच्या कार्याला गवसणी घालून शब्दबद्ध करणे अत्यंत अवघड काम आहे. कोणीही प्रतिभावंत लेखक त्यांना पूर्ण न्याय देऊ शकणार नाही. दुष्काळाच्या झळा आपण वारंवार सहन करीत आहोत. त्याचा सामना करण्यासाठी विलासरावांचे विचार, तसेच निसर्गाचे संवर्धन करणारी अनुकूल सर्वसमावेशक पर्यायी विकास नीती नजीकच्या काळात अवलंबावीच लागेल.

**मूलभूत विचार पाणी वाटपाचा**

महाराष्ट्रातील पाणीप्रश्न या विषयाच्या वाचनास सुरुवात केली होती. पाणी प्रश्न समजून घेत असतांना पाणी विषयावर आज वर झालेल्या घटनांचा अभ्यास केला. त्याचं मध्ये मला सर्वसमावेशक महाराष्ट्रातील पाण्याच्या वाटपाबद्दलचा फार मूलभूत विचार विलासरावांनी मांडला; काही काळ समाजातील समाजवादी, साम्यवादी विचार म्हणून उसाच्या धनदांडग्या शेतकरी, पुढारी वर्गाने त्यांची हेटाळणी केली. परंतु विलासरावांचा द्रष्टेपणा आजच्या पाणीटंचाईच्या काळात जाणवल्यानंतर आज मात्र या पुढाऱ्यांची भंबेरी उडालेली दिसते. मुख्यत्वे शास्त्रशुद्ध मांडणी आणि उपलब्ध माहितीचे विज्ञाननिष्ठ विश्लेषण यांमुळे महाराष्ट्रातील काय, किंबहुना देशाचा पाणीप्रश्न हा मानवनिर्मित आहे आणि निसर्गनिर्मित नाही; हा सामान्यांना वरकरणी चुकीचा वाटणारा आणि दिवसेंदिवस पावसाच्या वेभरवशीपणाला शिव्याशाप देणाऱ्या शेतकरी, पुढारी वर्गाच्या मतांमुळे चूक वाटणारा खरा सिद्धांत त्यांनी विचारपूर्वक मांडला. देऊन ग्रामीण भागात एकूण लागणाऱ्या पाण्याच्या फार तर फार २% पाणी पिण्यासाठी पुरेसे आहे आणि सिंचनाच्या पाण्याची व्यवस्था केली तर पिण्याचे पाणी थोड्या सामाजिक शिस्तीने अगदी नक्की 'बाय प्रॉडक्ट' म्हणून उपलब्ध होईल. ही वस्तुस्थिती विलासरावांमुळेच महाराष्ट्राला अवगत झाली असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. पण दुर्दैव म्हणजे हे कळूनही अंमलबजावणी अद्यापही होत नाही.

बहात्तरच्या दुष्काळामध्ये जेव्हा महाराष्ट्रात लागू असलेल्या व पुढे इतर राज्यांत ज्याचे उदाहरण दिले जाते, अशा रोजगार हमी योजनेबाबत विलासरावांनी फार मूलभूत सूचना केल्या. रस्त्यासारखी

दुष्काळी कामे काढून पैसे वाया घालवण्यापेक्षा पाझर तलाव, तळी यांची कामे करून 'पुढील पावसाचे पाणी साठवण्यासाठी सज्ज राहा' हा महाराष्ट्राला दिलेला बहुमोल सल्ला आजही दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना वरदान ठरत आहे व त्या काळातील या धोरणामधील आमूलाग्र बदलास कारणीभूत झालेले व तटस्थपणे महाराष्ट्रातील दुष्काळांचा अभ्यास केलेले इलेक्ट्रिकल इंजिनियर, ॲक्युरेट गेजिंग या स्वतःच्या यशस्वी मेकॅनिकल क्षेत्रातील उद्योजक प्रणेते विलासराव होत. या सर्व तत्त्वज्ञानाचे बालामृत आत्मसात करीत असतानाच पाण्याचे गावपातळीवर नियोजन आणि वाटप यांचा एकत्रित विचार होणे अत्यंत गरजेचे आहे, हे मत किती मूलतः विचार केलेले आहे, हे जाणवले. कधीकधी तर पुढे जाऊन मांडलेले भूमिहीनांचेही पाण्याचे अधिकार इत्यादी विषय फारच तात्त्विक वाटल्याने सवडीने विलासरावांशी त्यावर चर्चा केली, तर त्यांनी दक्षिण अफ्रिकेतील पाणी कायदा काय सांगतो, जलनीती म्हणून आपण आज किती मागास विचार करतो आहोत; तसेच एक ना एक दिवस पाणी हा घटनेतील मूलभूत हक्कांमध्ये जाणारा विषय आहे, हे त्यांचे प्रतिपादन ऐकून त्या बालवयात या कल्पना रम्य, गूढ वाटणे याव्यतिरिक्त अन्य काही होणे अशक्य होते, पण ग्लोबल वॉटर पार्टनरशिपच्या बैठकीत वसुधा पांगारेद्वारा हाच विचार सध्या जगभर मांडला जात आहे; आणि हा विचार कैक वर्षांपूर्वी मांडणारे आपले गुरुजी किती दूरचा विचार करीत होते, हे सांगितल्यानंतर खरोखरीच हा माणूस काळाच्या फारच पुढचा विचार करीत असल्याने सर्वसामान्यांना पचला नाही, अशा निष्कर्षाप्रत येऊन पोहोचणे अपरिहार्य आहे. सामाजिक काम करायची तर त्यासाठी लोकांशी नाळ जुडणे महत्वाचे आहे. त्यासाठी गावागावांतून आरोग्य व युवक संघटन या विषयांकरिता हिंडताना प्रकर्षाने जाणवले की पाण्याची समस्या हीच सर्व ग्रामीण दारिद्याच्या मुळाशी आहे आणि विलासरावच या कोरडवाहू तसेच मर्यादित सिंचनक्षमतेच्या पट्ट्यातील शेतकऱ्यांना मार्ग दाखवू शकतात, याची खात्री झाली. यामधूनच प्रत्येक गावात सर्वप्रथम पाण्याच्या समस्येचे निराकरण व मगच पुढील कार्यक्रम, हे समीकरण बनले. याच कालावधीत शेतकऱ्यांचे पुढारी शरद जोशी तसेच अन्य शेती अर्थविषयक तज्ज्ञ व दांडेकरांसारखे प्रकांड पांडित्य असलेले अर्थतज्ज्ञ यांच्याशी विविध प्रसंगी चर्चा करण्याची संधी उपलब्ध झाली. शरद जोशींच्या स्वभावाप्रमाणे अर्थातच त्यांनी माणशी अर्धा एकर पाणी वगैरे समाजवादी कल्पनांनी शेतकऱ्याला काहीही मिळणार नाही. याउलट त्याला गरिबी वाटून कशी घ्यावी, याचे तत्त्वज्ञान आपण शिकवल्यासारखे होईल इत्यादी हेटाळणीवजा युक्तिवाद केले; तर दांडेकरांनी थोडे विचकत पण असाच काहीसा सूर लावला. एकूणातच अर्थशास्त्र कशाशी खातात; आणि त्यातून ग्रामीण अर्थरचना वगैरे प्रश्नावर ह्या मंडळींसमोर आपली काय टाप, या भावनेतून गप्प राहणेच योग्य आहे असे ठरवले. पण विलासरावांनी यावरही विचार नक्कीच केला असणार तरी यावर त्यांच्याशीच चर्चा होणे आवश्यक आहे, असे कुठेतरी वाटतच राहिले.

**कोरडवाहू शेतकऱ्यास संजीवनी**

एका गावातील प्रयोगाने काही लोकांनी महाराष्ट्रातील– नव्हे देशातील– सहा लाख खेड्यांना उत्तर शोधल्याचे दावे केले. पण विलासराव मात्र मांडलेले सूत्र ठराविक एका सॅम्पल साईजच्या खेड्यांवरती अंमलबजावणी झाल्याखेरीज सार्वत्रिकीकरण करत नसत. हे त्यांच्या १०० हून अधिक विविध उपसा जलसिंचन योजनांच्या अभ्यासपूर्वक केलेल्या प्रयोगांतून लक्षात आले. काही तत्त्वे ही फार तर सर्व प्रयोगांमध्ये उपयोगी ठरतात, म्हणून तोच प्रयोग सार्वत्रिक कार्याचा मोह कधीही त्यांना झाला नाही आणि म्हणूनच त्यांची पाणी वाटपाची कल्पना कोणत्याही एका क्षेत्रापुरती मर्यादित न राहता खरोखरीच महाराष्ट्रातल्या कोरडवाहू शेतकऱ्याला संजीवनी ठरली. पाण्याची गावपातळीवर अशा प्रकारची चर्चा करणारा हा द्रष्टा 'पाणी पंचायत' या संकल्पनेचा प्रणेता म्हणून देशात नव्हे तर अवध्या विश्वात ओळखला जाऊ लागला. आणि पाण्याच्या रेशनिंगच्या सिद्धांताने पु.ल.देशपांडे यांसारख्या लेखकालाही त्यांनी डिवचल्यावाचून सोडले नाही. याचाच परिपाक म्हणून पुलंनी महाराष्ट्र टाइम्समध्ये 'माणशी अर्धा एकर पाणी: एक विलक्षण कल्पना' हा लेख लिहिला. स्वयंसेवी क्षेत्रातील कामावरती जेवढा दृढ विश्वास विलासरावांचा होता, त्याचबरोबर राजकीय इच्छाशक्तीशिवाय धोरणात्मक बदल घडणे केवळ अशक्य आहे, या भावनेपोटी विलासरावांनी १९८४ साली स्वतः आमदारकीची निवडणूक लढवली, पण ते पराभूत झाले. विलासरावांना निवडून जाऊन सत्तेचे राजकारण न करता विषयांवर आधारित दबावगट निर्माण करायचे होते, हे त्यांना कळलेच नाही. किंबहुना पाणीपंचायतच्या संकल्पनेलाच थोड़ासा सेटबॅक मिळाला, अशाही निर्णयाप्रत येणे गैर ठरणार नाही. परवा परवा म्हणजे सहा महिन्यांपूर्वी दिल्लीमध्ये अरुण शौरी हे प्रशासकीय सुधारणा या विषयाचे मंत्री असताना त्यांनी 'Ideas that have worked' या व्याख्यानमालेत शेवटचे पुष्प विलासरावांना गुंफण्यास सांगून पाणी पंचायतीच्या संकल्पनेचा एकप्रकारे गौरवच केला.

**नावीन्य कार्यशैली**

विलासराव साळुंखे यांनी ग्रामीण विकास संस्था परिषदेच्या खिरोदा येथील जळगाव जिल्ह्यातील मधुकरराव चौधरीं समवेतच्या बैठकीपासून बाळासाहेब विखे यांनी आयोजित केलेल्या प्रवरानगरच्या पाणी परिषदेपर्यंत प्रत्येक वेळी नवीन माहिती समाजापुढे सादर करत आणि दर काही महिन्यांनी विलासराव नवीन प्रयोगाचे सूतोवाच करायचे. आपल्याच कामाचे तुणतुणे वाजवत बसणे हे तर दूरच; पण लोकांनी कोणी कोणी त्यांची स्तुती केली आहे हे सांगणेही त्यांनी कधी आपणहून केले नाही. प्लॅनिंग कमिशनपासून ते प्रेसिडेंटपर्यंत सेंट्रल गव्हर्नमेंटमध्ये, तर सरपंचापासून मुख्यमंत्र्यांपर्यंत राज्यामध्ये त्यांना मिळालेली शाबासकी, ही खरे तर फार मोठी आणि मोलाची आहे. पाणी पंचायत हीच संकल्पना खऱ्या अर्थाने पाणी वापरा बाबत प्रत्येक ग्रामीण भागात हा विचार पोहचला. जलक्षेत्रात काम करत असतांना सर्व ठिकाणी एकाच पद्धतीचे काम होऊ शकणार नाही हे त्यांच्या कामातून दिसून येत होते. त्यामुळेच काय जेष्ठ लेखिका वीणा गवाणकर यांनी विलासरावांवर 'भगीरथाचे वारस' ही उपाधी दिली त्यावर पुस्तक प्रकाशित झाले. भगीरथाने गंगा जमिनीवर आणली आणि सर्व परिसर सुजलाम सुफलाम झाला. कदाचित हाच वारसा विलासराव यांनी परिसर सुजलाम सुफलाम करण्यासाठी आपले आयुष्य पणाला लावलेलं आपण सर्वांनी बघितले. त्यामुळे त्यांनी हे काही काम आयुष्यात केले त्यामध्ये सातत्याने नाविन्यपूर्ण करण्याचे प्रयत्न केले.

त्यांची हीच कार्यशैली खऱ्या अर्थाने आजच्या नवीन कार्यकर्त्यांना बळ काम करण्यास मिळावे. सामाजिक क्षेत्रात काम करत असतांना खऱ्या अर्थाने कायद्यात्मक व धोरणात्मक बदल करायचा असेल तर प्रवाहा बाहेर राहून ते करणे शक्य नसते यांची जाणीव त्यांना असावी यासाठी त्यांनी निवडणूक लढवण्याचा प्रयत्न केला असावा पण राजकीय क्षेत्रात सामजिक क्षेत्रात काम करणाऱ्या नागरिकांना जनता कुठे स्थान देते हा प्रश्न खऱ्या अर्थाने विचार करावा वाटतो.

आज पाणी प्रश्न बिकट होत असतांना जलक्षेत्रात तथाकथित जलतज्ञाचं जाहीर प्रकटीकरण होतांना दिसते. पाणी पश्न बाजूला राहून उत्सव साजरे होऊ लागले. मुलभूत संकल्पना रसतळाला लावून उत्साहीकरणातून पाणी प्रश्न सुटणार असे आता वाटू लागले. समाजातील जलतज्ञ आणि जलअभ्यासक यामध्ये खूप फरक आहे. आज मात्र जलअभ्यासक हे जलतज्ञ म्हणून काम करु लागले. खर तर विलासराव साळुंखे यांनी दिलेल्या प्राथमिक विचारावर पुन्हा नव्याने मांडणी करून समाजात लोकांपर्यत पोहचणे गरजेचे आहे.

*****



**संस्थेचा लोगो**



**गोबर गॅस प्लांट चा प्रयोग**

## काव्य सरिता



### दुष्काळ

भेगाळल्या जमिनीला पाहून
नयनी अश्रू येतात दाटून..
नेत्र शिणले टँकरची वाट पाहून
गोठ्यात जनावर सांगती हंबरून..

किती दिस काढायचं
सरकारच्या छावणीत राहून..
आग पडती पोटात
भेगाळली जमीन पाहून..

देवा परी वाट बघायची टँकरची
आज पोटभर पाणी पेतील गाय गुर..
नशिबी फुलंल कधी हिरवं शिवार
जगायच सांगा कशावर..

चटका बसता पायाला
जीव धावतो पान्याला..
सालो सालीचा दुष्काळ आमच्या नशिबाला
उन्हात जाती पोर तीन मैल पान्याला
कधी सुखाची झुळुक लागलं बळीला...

दुःख नशिबी सार त्याच्या नशिबाला
ओला असो, वा असो,कोरडा..
कसा चालेल संसाराचा गाडा
पाण्याविना पडतोय अश्रूंचा सडा..
शाळा शिकाया नाही धड रस्ता
खरंच बळीचा जीव झालाय का सस्ता..
पाण्याविना कशा काढायच्या
मोलमजूरीच्या खस्ता..

**श्रीमती उज्वला शिंदे**

# साठवणीतील आठवणी

**श्री. दत्तात्रय दिनकरराव केंजळे**

**मो : ९८८११२८२८२**



**परीस :**

१९८० च्या मे महिन्याच्या शेवटी माध्यमिक शिक्षणासाठी हडपसरला आल्यानंतर माझ्या गावंढळ बोलीचं, पेहरावाचं बऱ्यापैकी हसू होत होतं. परंतु सहामाही परीक्षेतील माझ्या अभ्यासातील प्रगतीकडे पाहून माझा मित्रमंडळीत जम बसू लागला. पूर्वेकडील आजूबाजूच्या वाड्या, वस्त्या आणि गावांप्रमाणेच अगदी पश्चिमेला शिवाजीनगरपासून मुलांचा ओघ त्याकाळी 'रयतच्या' साधना विद्यालयात येत होता. यातंच मला माझा एक सहाध्यायी 'विक्रम' सापडला. याअगोदर त्याला शाळेच्या समारंभात पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत करताना, त्यांना सलामी देताना, झेंड्याची दोरी हाती देताना अनेकदा पाहिलेला. आठ तुकड्या, त्यात तो वेगळ्या तुकडीत तर त्याने RSP घेतलेली तर मी NCC यामुळे एकमेकांची ओळख व्हायला जरा उशीरंच झाला. मात्र स्पर्धात्मक परीक्षा देताना वा विज्ञान प्रदर्शनात भाग घेताना आमची ओळख झाली.

अधूनमधून तो रहात असलेल्या रामटेकडीजवळील सेंट पॅट्रिक टाऊन मध्ये जाणेही व्हायचं. त्याच्या घरातील वातावरण एकदम वेगळं. बंगले, गाड्या, नोकरचाकर असले तरी घरातीलंच एक सदस्य अशी मला वागणूक मिळायची. कित्येक वेळा त्याच्या सोबत रेल्वेलाईन पलिकडील त्यांच्या अँक्युरेट इंजिनिअरिंग या कारखान्यात गेलो.तेथील अधिकारी, कामगार वर्ग अगदी गाड्यांचे चालक वा सुरक्षा कर्मचारी हे सगळे एका कुटुंबातील सदस्यांप्रमाणेच वागताना दिसायचे. मला हे सारं जरी नवखं असेल तरी आजवर ऐकलेल्या अथवा बोललेल्या वातावरणापेक्षा निश्चितच वेगळं होतं. मग ते राममामा अथवा खेडकरमामा हे चालक असोत किंवा कुलकर्णीआबा, कडकाका, सुमंतकाका या नावाने काम करणारे कामगार वा अधिकारी असोत.

या सगळ्यांची उकल मात्र एकदोनदा त्याच्या वडिलांशी म्हणजेच पाणी पंचायतीचे अग्रणी श्री. विलासराव साळुंखे उर्फ बाबा यांच्याशी बोलण्यानंतर झाली. या सगळ्या व्यवस्थेला हळूवार बांधायचं काम त्यांनी केलेलं होतं. त्यांचे आईवडील व भाऊ हे माझं कायमंच कौतुक करीत असंत. माझी ग्रामीण पार्श्वभूमी त्याला कारणीभूत असावी. बाबांचं बोलणं अगदी हळूवार पण समोरच्या माणसाच्या मनाचा ठाव घेणारं आणि विषयाची सहज पखरण करणारं. घरातील सर्वच सदस्यांना त्यांच्याबद्दल एक आदरयुक्त भाव कायम दिसायचा.

१९८१ च्या पावसाळ्याच्या सुरुवातीला एका शनिवारी दुपारी शाळा सुटताना विक्रम म्हणाला, 'आम्ही नायगावला जाणार आहोत' तू येतो का ? मी घरी न विचारताच हो म्हटलं. त्याच्या घरून निघून हडपसरच्या गाडीतळावर मला जीपमध्ये घेणार होते. मी घरी जाऊन काकाकाकूंची परवानगी घेऊन एका दिवसाच्या मुक्कामाच्या कपड्यांची थैली घेऊन पहिल्यांदाच जीपमधून प्रवासाच्या तयारीत गाडीतळावर पोहोचलो. खेडकरमामा गाडी चालवत होते, तर बाजूला बाबा बसले होते. मध्ये मी, विक्रम व फ्रान्समधील त्यांच्याकडे आलेला एक 'गोरा' युवक फ्रान्स्वा बसलो. मी जीपमध्ये पहिल्यांदाच बसलेलो,शिवाय एवढा गोरा माणूसही पहिल्यांदाच पाहत होतो. बाकी सारे त्याच्याशी अस्खलित इंग्रजीत बोलत होते तर मी मात्र My name is I'm from Lagun , 120km away याच्यापुढे सरकत नव्हतो.

गाडी दिवे घाटावर गेल्यावर एका निंबाच्या झाडाखाली थांबली.आमच्या हातात बाबांनी दूधाच्या रिकाम्या स्वच्छ पिशव्या दिल्या आणि निंबाच्या बीया गोळ्या करायला सांगितल्या. मी मागेपुढे न पहाता, बीया गोळा करायला सुरुवात केली. इतर जणांना सराव होता तर मी नवखा. बाबांचे माझ्याकडे लक्ष होतं. मी आठदहा बिया भरल्यानंतर ते माझ्या जवळ आले आणि म्हणाले पक्षाच्या वीष्ठेतून बाहेर पडलेली 'बी' जवळपास लागणीसाठी तयार असते आणि त्यापासून रोपे आणि पर्यायाने झाडं निर्माण होण्याची शक्यता जवळपास शतप्रतिशत असते ! सामाजिक क्षेत्रातील माझ्यावर झालेला हा पहिला संस्कार !

बियांच्या पिशव्या जवळपास भरून झाल्यावर सुर्यास्ताच्यावेळी आम्ही नायगावच्या घरी पोहोचलो. मला वाटलं,एवढे मोठे उद्योजक आहेत इकडंही बंगला असेल. पण हे तर माझ्या गावाकडच्या घरासारखं घर ! अगदी शेणाने सारवलेलं,भिंतीला पोतेरा दिलेला आणि चुल वगैरे. ही काही तरी भलतीच असामी असल्याचं जाणवलं. अगदी शेळ्या, गाईंचा गोठा वगैरे. आम्हाला हातपाय धुवून घ्यायला सांगून तयार व्हायला सांगितले. तोवर पडवीला गावातील लोकांनी त्यांच्या आजूबाजूला बैठक मारली आणि शेती, पाणी, पिकं, गुरं ढोरं यांची चर्चा सुरू झाली. फ्रान्स्वाला इंग्रजीत भाषांतर करून विक्रम सांगत होता, तर माझी मान डावीकडून उजवीकडे आणि उजवीकडून डावीकडे फिरत होती.शेतकऱ्यांच्या प्रश्नांची अगदी सोप्या भाषेत, सौम्य आवाजात उत्तरं देणारे 'बाबा' मला शालेय पुस्तकात वाचलेल्या 'विनोबां'सारखे वाटू लागले. अखेर ती बैठक संपल्यावर आम्ही चुलीवरची भाकरी, मेथीची भाजी, उडदाचं घुटं, हिरव्या मिर्चीचा खर्डा असं जेवण घेऊन झोपी गेलो.

सकाळी आम्ही जागे व्हायच्या अगोदरंच बाबांची शेतातून, बांध, बंधारे व टेकडीवरून फेरी झाली होती. आमचं आवरून

झाल्याबरोबर पटकन नाष्टा उरकून आम्ही कालच्या बीयांची पिशवी व हातात एक छोटी कुदळ घेऊन बाहेर पडलो.रात्री थोडाफार पाऊस पडून गेल्याने हवेत सुखद गारवा होता. मग बाबांनी सूचना केल्याप्रमाणे कमीत कमी दहा ते पंधरा पावलं अंतर ठेवून आम्ही उभं राहिलो आणि छोट्या कुदळीचा हळुवार घाव जमिनीवर घेऊन त्यात एक 'बी' टाकून आम्ही पुढचा घाव आठदहा पावलावर घेत साऱ्या बीया लावून परतलो.दुपारच्या जेवणानंतर माघारी पुण्याला आलो.सामाजिक जाणिवेचा हा पहिला 'धडा' साक्षात बाबांकडून घ्यायला मिळाला हे माझं भाग्यंच.

पुढील दोन वर्षे अशाच गाठीभेटीनंतर मी तंत्रनिकेतला कराडला गेलो.मात्र त्यांचा हा धडा प्रत्येक सुट्टीत गिरवत होतो.किमान दोन झाडं दरवर्षी लावंत होतो,मग अगदी धूप होऊ नये म्हणून निरगुडी अथवा घायपात किंवा जनावरांना मारवेलचं गवत ! पुढे अभियांत्रिकीला साताऱ्यात शिकत असताना १९८७-८८ च्या ऊन्हाळ्यात औद्योगिक प्रकल्पासाठी सासवडच्या पुढे ग्रामगौरव प्रतिष्ठान मध्ये राहून त्यांच्याच आदित्य इंजिनिअरिंग या कारखान्यात दीड महिन्याचा प्रकल्प केला. माझ्या राहण्याची सोयही बाबांच्या खोलीतंच केली होती. भल्या पहाटेच उठणारे 'बाबा' गोटीमाळावरील लहानमोठ्या झाडाझुडुपांमध्ये रमणारे, अनेक पक्षांच्या विविध लकबी न्याहाळत कुठे बांधबंदिस्ती तर कुठे कुंपणदुरुस्ती हे चालूच असायचं. हे सगळं उरकून कारखान्यातील घडामोडींवर लक्ष द्यायला वेळेवर हजर. सायंकाळी परत गोटीमाळावरील वेलीवनस्पतीत रमंत. रात्रीच्या जेवणाच्यावेळी मी कारखान्यात काय शिकलो, काय समजलं नाही याची चर्चा व्हायची.

पुढे माझं पदव्युत्तर शिक्षण, पहिली नोकरी, स्पर्धा परीक्षेची तयारी आणि परत नोकरी ! या काळात माझा आणि त्यांचा अधूनमधून संपर्क येत होता. अखेर १९९६ला मी नोकरीच्या निमित्ताने योगायोगाने रहायला त्यांच्याच वसाहतीत आलो. त्यांनी दिलेली JRD टाटांवरील साबावाला व लालांनी लिहलेलं Key Note आणि गीता पिरामल यांचं Business Legends ही पुस्तकं वाचली. माझ्या संसाराच्या रहाटगाडग्यातून सायंकाळी मुलाला फिरवत असताना भेटणारे 'बाबा' ऋषीतुल्य भासू लागले. रात्रीची भाकरी व ताजी पालेभाजी सकाळच्या न्याहारीला खाणारे. पाणी पंचायतीच्या कार्यात कायम मग्न आणि झपाटलेले.

२००० सालाच्या दरम्यान मी काही कामानिमित्त अहमदाबादला इंगरसोल नावाच्या कंपनीत गेलो होतो.तिथं एक महाराष्ट्रातील वरीष्ठ अधिकारी दिगंबर बोंताडकर भेटले. त्यांनी मला त्यांच्या नोकरीच्या सुरुवातीच्या काळातील विलासराव साळुंखे यांच्या कंपनीतील नोकरीचा करड्या शिस्तीचा एक प्रसंग सांगितला. तिथं सायंकाळी कामावरून घरी जाताना उद्याच्या कामांची प्राथमिकता एका कागदावर लिहून तो कागद टेबलावर ठेवून जाण्याचा प्रघात होता.एक अधिकारी चुकून तो कागद टेबलाच्या कप्प्यात ठेवून कुलूप लावून गेले. काही कारणाने दुसऱ्या दिवशी ते कामावर न आल्याने, कामाच्या प्राथमिकतेचा कागद मागितल्यावर झाला प्रकार लक्षात आला. त्या आठवड्याच्या शेवटी कप्पा असलेल्या सगळ्या टेबलांचे कप्पे काढून कार्यालय नटलं होतं, अगदी स्वतःच्या टेबलापर्यंत !



आपल्या कार्याचे अनेक पाईक अगदी घरातील सदस्य म्हणजे श्रीमती कल्पनाताई, विक्रम, आदित्य आणि सोनाली ही मुलं, अनेक गावात संस्था उभ्या करून, तेथील स्वंयंसेवकांचे जाळे विणून त्यांनी एप्रिल २००२मधे 'आमुचा रामराम'घेतला. या परीसस्पर्शाने जे पावन झाले त्यातलाच मीही एक !

प्रथितयश लेखिका Veena Gavankar यांनी लिहलेल्या 'भगीरथाचे वारस' या अभ्यासपूर्ण चरित्रातून समजलेलं हिमालयाएवढं उत्तुंग 'विलासराव साळुंखे' हे व्यक्तिमत्त्व आणि मी सहवासातून अनुभवलेले 'बाबा' हे माझ्या उत्तर आयुष्यातील विद्यापीठंच !

साठवणीतील आठवण, ०७५

लिहिली आत्ता.

आपलाच,
दत्ता.

– दत्तात्रय दिनकरराव केंजळे.
dattatray_ kenjaleyahoo.com
९८८११२८२८२.

ग्रामीणकथा villagelife villagestories
गावाकडचे जीवन villagedialects परीसस्पर्श



संस्थेचे भोजनगृह



जलसंकलनासाठी बांधलेले शेततळे



संस्थेचे सभागृह



शेतमालावर प्रक्रिया करणारी यंत्रसामुग्री



शेतमालावर प्रक्रिया करणारी यंत्रसामुग्री



नुकतेच सुरु केलेले बीज संकलन

# पाणीबाबा विलासराव साळुंखे - अनुभवाची शिदोरी

**श्री. लक्ष्मण खेडकर**

सन १९७८ ते २००२ ही २४ वर्षे बाबांच्या सहवासात असल्यामुळे त्यांच्या विचारांनी मी इतका भारावून गेलो होतो की पाण्याच्या थेंबा- थेंबा चा विचार करायचो. पाणी पंचायत प्रशिक्षण केंद्रावर राहत असल्याने माझ्या कुटुंबाच्या पाच सदस्यांच्या आंघोळीच्या पाण्याने दररोज पाच झाडांना पाणी घालायचं आणि आठवड्यात ५० झाडांना पाणी घालणे माझा छंद होऊन गेला.

तसे पाहिले तर मी बाबांच्या बरोबर सारथ्याचे काम केले पण बाबांनी मला त्यांच्या विचारांनी एवढे घडवले की मी एक साधा ट्रॅक्टर ड्रायव्हर त्यानंतर जीप चालक, काही दिवस हिशोब पाहणे पासून सर्वे करणे,योजनेचे इस्टिमेट करणे, गावागावात शेतकऱ्यांच्या मीटिंग घेणे पासून अगदी पाणी पंचायत कडे येणाऱ्या विजिटर पासून आयएएस ऑफिसर ला पाणी पंचायत विषयी माहिती सांगण्यापर्यंत त्यांनी मला घडवले.

पाण्याविषयी कोणत्याही वैयक्तिक अगर राजकीय आणि गव्हर्मेंट एजन्सीला पाण्याविषयी बोलायचे असेल तर बाबांच्या विचारांना स्पर्श केल्याशिवाय बोलू शकणार नाही. विलासरावांचे विचार महाराष्ट्रच नाही तर भारताबाहेर अमेरिका सारख्या प्रगत लोकांनी त्यांच्याविषयी अभ्यास केला आहे.

पुरंदर तालुक्यात २५ गावांत ५० लहान-मोठ्या उपसा सिंचन योजना राबविल्या परंतु त्यासाठी १९७२ ते १९८४ म्हणजे बारा वर्षांची तपश्चर्या करावी लागली. अनेक सामाजिक, राजकीय, शासकीय व्यवस्थांशी संघर्ष करावा लागला. प्रयोग करत असताना पहिला स्वतःवर नंतर त्यांच्या कुटुंबावर आणि नंतर समाजावर प्रयोग करायचे. त्यांचे राहणीमान फार साधे, खानपाण साध्या पद्धतीचे चटणी-भाकरी पण विचार एवढे महान असायचे की त्या विचाराला कोणीही आव्हान देऊ शकत नव्हते.

एकदा मी कल्पनाताई आणि बाबांबरोबर नंदुरबार ला गेलो असताना परत येताना नाशिक जवळ आल्यावर ताई मला म्हणाल्या, खेडकर आपण कुठेतरी थांबून उसाचा रस घेऊ. आणि मी रसाच्या गुराळाच्याजवळ गाडी थांबवली पण बाबा उसाचा रस पीले नाहीत. कारण बाबांना उसाच्या शेतीविषयी एवढा राग होता की उसाच्या एका एकराला वर्षभर लागणारे पाणी तेच पाणी इतर पिकांना दिले तर त्या पाण्यावर बारा एकर क्षेत्र ओलिताखाली येऊ शकते आणि तेच पाणी ५ कुटुंबांना वर्षभर काम देऊ शकते. आणि बारा एकराचे उत्पन्न आणि एक एकराच्या उत्पन्नापेक्षा दुप्पट-तिप्पट देऊ शकेल असे विलासरावांचे म्हणणे होते. म्हणून उसाचा रस पिले नाही, दुसरं म्हणजे सफरचंद खात नसायचे कारण सफरचंद कश्मीर किंवा अन्य भागातून आपल्या पर्यंत आणण्यासाठी सूचिपर्णी वृक्षांची तोड करून त्यापासून बॉक्स बनवायला लागायचे म्हणून सफरचंद खाणे टाळायचे त्यामुळे आपल्या येथील पपई, चिकू, पेरू खाणे पसंत करायचे.

विलासराव आपल्या भाषणांमधून नेहमी सांगायचे की भविष्यात भावा- भावात, गावा- गावात आणि त्यापुढे जाऊन देशा- देशांत पाण्याविषयी संघर्ष सुरू होईल.

अशा बाबांना आणि त्यांच्या विचारांना माझा सलाम !!!

*****



त्रैमासिक पाणी पत्रिका



सीताफळाची बाग

# आमचे देव - विलासराव

**श्री. जगन्नाथ साबळे**

गावामध्ये सगळी जिरायत शेती. पुरंदर हा सतत दुष्काळी भाग आहे. पाण्याचे सततच दुर्भिक्ष्य असल्यामुळे शेतीत धान्य पिकत नसे. सगळे शेतकरी व कुटुंबिय शहरात पोट भरण्यासाठी जायचे. थोडा पाऊस झाल्यावर शेतावर यायचे. १९७२ च्या दुष्काळात नाझरे धरणाच काम झालं होत. अस असताना शेजारच्या गावी कोथळे मध्ये पाणी पंचायत ची एक योजना झाली आणि ती योजना गावकऱ्यांनी पाहिली.. लोकांला वाटत होत आपण ही आस काहीतरी करावं, त्याच काळामध्ये विलासराव साळुंखे यांचं काम नायगाव मध्ये चाललं होत. गावातले काही गावकरी मिळून आम्ही नायगावला गेलो. त्यावेळी यशवंतराव चव्हाण आले होते. सर्वांची भाषण ऐकून आम्हा लोकांला पाण्याविषयी काहीतरी कराव अस वाटलं. गावी येऊन लोकांला पाणी पंचायत, नायगाव संस्थेविषयी माहिती दिली व समजावून सांगितलं आणि सहभागी होण्याविषयी आवाहन केल. दुष्काळी परिस्थितीमुळे बरेचसे गावकरी दारूच्या आहारी गेले होते, रात्री बैठक बोलावली तर लोक काठ्या घेऊन यायचे आणि बैठका होत नव्हत्या. त्यांना समजावून नायगाव ला भेटी देऊन तसेच कोथळे च्या तुकाई योजनेचे काम बघितल्यावर गावकर्यांना महत्व पटले, लोकांला ते सर्व आवडलं. गावातल्या लोकांची बैठक घेऊन आपल्याला हे काम करायच आहे अस ठरलं. योजना कशी करायची याचा तपशील घेऊन २० वाटा शेतकर्यांनी, ३० टक्के संस्था आणि ५० टक्के सबसिडी आम्हाला मिळणार अस नक्की झालं. १२० एकरच्या या योजनेमध्ये ६४ जण सभासद झाले आणि धालेवाडीच्या जय मल्हार योजनेला सुरवात केली. पाईपलाइन कामासाठी सांगली ला जाऊन पाईप आणले. श्रमदानातून योजना पूर्ण केली. ही योजना केल्यानंतर आमच्यापुढे लाइट चा प्रश्न आला. लाइट नसल्यामुळे विलासरावांनी आंदोलनाचा पर्याय सांगितला. सर्वांनी सासवडला येऊन लाइट बोर्डाच्या ऑफिस ला आंदोलन केल. आम्हाला जेल भोगावी लागली. राजकीय दबावातून विजेच्या पुरवठ्यात अडचण येत असल्यामुळे वाल्हे येथून ऑइल इंजिन आणून योजना चालू केली. तिथून पुढ आम्ही शेती करायला सुरवात केली. रान तापली होती, खत टाकली. त्यावर्षी कांदा ८० रु. दहा किलो दराने विक्री करून लोकांला भरपूर नफा झाला. काही लोकांनी एवढा पैसा आयुष्यात पाहिला नव्हता, काहींना मोजता येईना.

वर्षभर ऑइल इंजिन वर योजना चालवली. विलासरावांचे वीज कनेक्शन साठी प्रयत्न चालू होते. रास्ता पेठच्या ऑफिस ला वारंवार भेट देऊन काही उपयोग होत नव्हता. पुरंदरचे एक साहेब होते त्यांना जाणीव झाली. ते गावकऱ्यांना भेटले. त्यांनी तेथील शेख सरांना भेटवले. त्यांनी जागापाहणी करून शेतकर्यांना १० जानेवारी १९८४ रोजी वीज मिळवून दिली. आणि योजना वीजेवर चालू झाली. माणशी अर्धा एकर याप्रमाणे आणि पाण्याचा अपव्यय न करता पाणी वापरायला आम्ही सुरवात केली. विलासरावांनी ठरवून दिलेल्या माणसी अर्धा एकर पाणी या तत्वाप्रमाणे अडीच एकरात आमच्या ५ जणांच्या सर्व गरजा भागू लागल्या.

लोकांना योजनेच महत्व पटलं. विलासरावांना देव मानून आम्ही सर्व त्यांच्या मागे काम करत राहिलो.

योजना होण्याआधी गावात बागायत शेती फक्त २७ एकर इतकी होती, योजनेंनंतर ओलीत क्षेत्र वाढून ७०० एकर झाले आहे. त्यानंतर मुलांसाठी शाळा बांधून त्यांना शिकवू शकलो, त्यांना परदेशात पाठवू शकलो. विलास रावांमुळे आणि पाण्याच्या सोयीमुळे खूप मोठा बदल झाला.

पाण्यापासून वंचित आणि गरीब लोक जिथ असतील तिथ विलासरावांच मन रमत असे. साहेब गरिबांचे कैवारी आहेत आणि पाणी देऊ शकतात हे आम्ही ओळखलं आणि त्याच्या सोबत जोडले गेलो.

धालेवाडी व्यतिरिक्त माहुर, मांढर, तसेच पुरंदरच्या पूर्व व पश्चिम भागातही योजना केल्या त्या सर्व योजनांना आम्ही भेटी दिल्या. लोकांचा उत्साह वाढत होता. लोकांना विलासरावांचे महत्व कळले. त्याकाळात मोठ्या प्रमाणात गावांचा पाण्याचा प्रश्न मिटला. योजना झाल्यानंतर शहरात मुंबई, पुणे ठिकाणी कामासाठी गेलेले लोक गावात येऊन शेती करू लागले.

विलासराव धालेवाडीच्या जय मल्हार योजनेवरती सहकुटुंब भेट देण्यासाठी आले असताना मूल लहान होती. त्यावेळी ते म्हणाले, हा आमचा डोंबाऱ्यांचा खेळ आहे, आम्ही अस गावोगावी जाऊन लोकांना सांगतो, पटवतो, लोक विचार करतात आणि त्यानंतर कामाला सुरवात होते, आणि पुन्हा नवीन गाव.

आमच्या गावात पूर्वी पाण्याची टंचाई असल्याने लोक सोयरीक (लग्न) करायला नाखुश असायचे, योजनेचे काम झाल्या नंतर आता लोक स्वतहून आमच्या गावात सोयरीक करण्यासाठी बोलणी करतात.

विलासराव साळुंखे हे खरोखरच देव होते.

धन्यवाद.

# विलासराव साळुंखे: द्रष्टा, या सम हा

**डॉ. हिमांशु कुलकर्णी**

मो : ९२७१०००१९५



माझे शिक्षक, मार्गदर्शक, गुरु प्रा. सुवदन देवळणकर यांनी माझी विलासरावांशी गाठ घालून दिली ती १९८४ च्या उन्हाळ्यात. मी नुकतीच माझ्या पीएच.डी च्या क्षेत्रभेट कार्यास (फील्ड वर्क) सुरुवात केली होती. माझा विषय होता –अग्निजन्य (बेसॅल्ट) जलधरांनी युक्त अशा पश्चिम महाराष्ट्राच्या दुष्काळी भागातील भूजल समस्या. माझी पहिलीच क्षेत्रभेट होती खळद या ग्राम गौरव प्रतिष्ठानच्या कार्यक्षेत्रास. विंधणविहीरीच्या अंत:क्षेपणाचा (इंजेक्शन) पहिलाच संरचीत, सहभागी प्रयोग भारतातील तीन अग्रगण्य भूजलशास्त्रज्ञांनी – डॉ.एस.बी. देवळणकर, डॉ.आर. एन. आठवले आणि डॉ. एस. डी. लिमये– हाती घेतला होता. खळदमधील विंधणविहीरींमध्ये धातूच्या गोळ्यांचे अंत:क्षेपण (स्लग इंजेक्शन) करण्याचे आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त तंत्रज्ञान वापरुन बंदिस्त जलधरांच्या पुनर्भरणाची शक्याशक्यता अजमावून पाहिली जाणार होती. या प्रयोगादरम्यान मोजमाप, देखरेख आणि मदतीची जबाबदारी माझ्याकडे होती, जी परत परत मला करावी लागत होती. फील्ड वरची प्रत्येक फेरी सुरू होत असे ती विलासरावांच्या पुण्यातल्या घरच्या गरमागरम नाश्त्यासोबत आणि संपत असे चहा–बिस्किटे आणि दिवसभराच्या कामासंदर्भातील निरीक्षणांच्या चर्चेने. मला सांगितले गेले होते की या प्रयोगामागची प्रेरणा त्यांचीच होती. तो प्रयोग समजून घेण्यास मला अजिबात वेळ लागला नाही पण त्या प्रेरणेची खोली, व्याप्ती समजायला आणखी तब्बल दोन दशके जावी लागली.

विलासरावांशी पहिल्यांदा माझे थेट बोलणे झाले ते १९८५ साली, नाझरे धरणाच्या काठावरती. मी त्यांना पाणी पंचायतीची संकल्पना समजावून घेण्यासाठी बरेच प्रश्न विचारत होतो. नेहेमीसारखेच बुद्धीचातुर्य वापरुन समयसूचकतेने त्यांनी सांगितले की तो चालू स्थितीतला एक प्रयोग असून त्यात जलशास्त्र आणि तंत्रज्ञान हे समाजोपयोगी कारणांसाठी प्रथमच एकत्रितपणे वापरले जात आहे. पाणी पंचायतीच्या काही योजनांना मी त्यावेळी भेट दिली होती परंतु त्याचे वास्तविक मूल्य हे मला अॅक्वाडॅमच्या स्थापनेनंतर नव्वदच्या दशकात त्यांच्यासोबत प्रत्यक्ष काम करू लागलो तेव्हाच समजले. त्यावेळच्या चर्चेमधून त्यांच्या मनातील 'जलधराधारित पाणी पंचायत' हे मूळ संकल्पनेच्या विस्ताराचे स्वरूप त्यांनी समजावून सांगितले. ही संकल्पना त्यावेळेस सहभागी भूजल नियोजनाच्या क्षेत्रात देशभरात विविध ठिकाणी काम करणाऱ्या माझ्यासारख्या अनेकांना प्रेरणादायी ठरली होती.

आज जसे सर्वश्रुत आहे त्यापमाणे विलासराव हे एक प्रसिद्ध आणि स्वयंसिद्ध व्यक्तिमत्व होते. त्यांच्या ठायी विद्वत्ता, उद्योजकता आणि संयम या गुणांचा दुर्मिळ असा संगम होता. समाजापर्यंत तंत्रज्ञान घेऊन जाण्याची त्यांची संकल्पना पाणी पंचायतीच्या प्रत्येक योजनेतून साकारली गेलेली दिसत होती. एकेकाळी केवळ पुरंदर तालुक्यातच अशा शेकडो योजना होत्या ज्या पाणी पंचयातीच्या नियमांना अनुसरून कार्यरत होत्या. त्यासंदर्भात आजवर खूप काही लिहिले गेले आहे, अगदी टीकात्मक देखील.

परंतु विलासरावांच्या विचारांच्या प्रगाढपणाची आणि त्यातील वास्तविक मूल्यांची जाणीव मला माझ्या कारकिर्दीच्या मध्यात, 'भूजल हे देखील एक सामायिक संसाधन आहे' या एलिनोर ओसत्रोम ह्यांनी जागतिक पातळीवर मांडलेल्या संकल्पनेच्या चर्चेनंतरच झाली. विलासराव हे कायम अशी भूमिका मांडत की जलसंवर्धन आणि समन्यायी वाटपाच्या माध्यमातून पाणी पंचायत ही जमीन आणि पाण्याच्या मालकीची सांगड तोडण्याचे काम करते. वास्तविक पाहता हा प्रयोग ( असे ते नेहेमी म्हणत) सामायिक संसाधानांच्या सहभागी व्यवस्थापनाचा एक परिणामकारक प्रयत्न होता. पाणी पंचयातीची (उपसा सिंचन) योजना ही काही अनिवार्य तत्वावर आधारलेली असे, ज्यात पाणलोट क्षेत्र विकास, संवर्धन आणि समन्यायी वाटप असे सगळेच प्रमुख मुद्दे अंतर्भूत असत. पाण्याची मागणी–बाजू ही पाण्याच्या उपलब्धतेच्या अंदाजानुसार गणिती पद्धतीने काढलेल्या वाटप आणि वापराच्या नियोजनामुळे तितकीच सशक्त झालेली होती. जलप्रशासन (गवर्नेंस) आणि व्यवस्थापनाच्या संस्थात्मक संरचनेसंदर्भात गेल्या काही वर्षात जागतिक पातळीवर घनघोर चर्चा सुरू आहे. परंतु लक्षात घ्या की याच एका मुलभूत विचाराची चोख अमलबजावणी पाणी पंचायत प्रणालीतून सत्तरच्या दशकातच यशस्वीरीत्या केली गेली...ह्यासाठी विलासरावांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करायलाच हवी.

अशा (परिवर्तनकारी) प्रयोगांसाठी जे सर्वात मोठे आव्हान असते ते म्हणजे शास्त्र (science) आणि प्रघात (practice) यांचे संयुक्त प्रत्यारोपण धोरणांवर करणे. विलासरावांसमोर हे आव्हान अनेकदा उभे ठाकले आणि तेही वेगवेगळ्या आघाड्यांवरून (शास्त्रज्ञ, धोरणकर्ते, राजकीय पुढारी, प्रशासकीय अधिकारी आणि काही प्रसंगी तर समविचारी शंकासुरांकडूनही). पाणी पंचायतीला होणाऱ्या विरोधाचा त्यांनी सर्वार्थाने तन–मन–धन अर्पून सामना केला. जल–धोरण क्षेत्रातील त्यांचे कार्य हे माझ्यासारख्या अनेकांना प्रेरणादायी ठरले आहे. राष्ट्रीय जल धोरण (२००२) यात कोणत्या गोष्टी अंतर्भूत असाव्यात

तसेच, शास्त्र, प्रघात आणि धोरण यांच्या संयोगातून पाणी, कृषि आणि ग्रामीण व नागरी विकासाच्या कार्यक्रमांचे कार्यान्वयन कोणत्या प्रकारे व्हावे याबाबतचे त्यांचे अफाट आकलन हे ह्याचे एक छोटे उदाहरण.

प्रेरक नेतृत्वाबाबत जसे नेहेमी होते तसेच विलास रावांच्या बाबतीतही घडले.. ते आपल्याला फारच लवकर सोडून गेले. भारतात आणि बाहेरही जल–विषयक नवनव्या धोरणांचे आणि कार्यक्रमांचे आकलन करून घेत असताना त्यांच्यासारखे विचारी, समंजस पुढारपण आवश्यक असते.

आजही काही ठिकाणी पाणी पंचायतीच्या योजना चालू आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. त्यातील काहीनी तर परिवर्तनाच्या अनिश्चिततांशी जुळवून घेऊन आपली वाटचाल सुरू ठेवली आहे. एक प्रयोग जो की काळाच्या कसोटीस तावून– सुलाखून उतरलेला आहे तो प्रयोग राहात नाही. विलासरावांच्या कामाची केवळ प्रशंसाच नव्हे तर योग्य तो सन्मान केला पाहिजे आणि त्याआधारे कार्यक्रमाची आखणी (शासनाने) केली पाहिजे. पाणी पंचायतीची चिकित्सा समाजाने करण्याची गरजच नाही. त्यापेक्षा भविष्यातील जल नियोजनासाठी पाण्याच्या मागणी आणि पुरवठ्याचा ताळमेळ समन्यायी वाटप आणि वापराच्या आधारे बसवण्यासाठीची शासन–धोरणे आणि लोक–भावना यांच्या एकत्रित आकलनासाठी पाणी पंचायत योजना ह्या एक अंतिम मापदंड म्हणून वापरल्या जाऊ शकतात.

आपण असे म्हणू शकतो की विलासरावांच्या सुमारे पांच दशकांपूर्वीच्या प्रयत्नाचे खरेखुरे मूल्यमापन हे जमीन आणि पाण्याच्या मालकीची सांगड तोडण्याच्या कृतीतून होऊ शकते... त्याकाळात हे उद्दिष्ट ठेवणे ही निश्चितच धाडसी पाऊल होते. पाणी पंचायतीच्या तत्वावर आधारित सहभागी जलनियोजन हे भविष्यकाळासाठी आपले ध्येय असायला हवे. विलासरावांसारख्या देशातील अग्रगण्य आणि दृष्ट्या जल–नेत्यासाठी हीच खरी श्रद्धांजलि असेल.

विलासराव, आपण आम्हाला जे प्रचंड विचार आणि कृतीधन देऊन गेलात त्याबद्दल मनापासून धन्यवाद!!

*****

## आमचाही खारीचा वाटा

**श्री. शांताराम कृष्णाजी कोलते, पिसर्वे, पुरंदर**



१९८० साल उजाडले होते. शेजारच्या गावी नायगावला विलासराव साळुंखे शेतकऱ्यांना सामुदायिकरित्या पाणी मिळवून देण्याचे काम करत होते, ही बातमी आमच्या कानावर आली. आम्ही बाबावाडीकर (पिसर्वे, पुरंदर ) मंडळी साहेबांना भेटण्यास गेलो. त्यांच्याकडून योजनेची माहिती समजावून घेतली व ३५ अल्पभूधारक शेतकरी एकत्र आलो. शेतीसाठी ओढ्यावरून लिफ्ट करून पाणी आणण्याचे ठरले. योजनेचा सर्व्हे केला आणि १ लाख रुपयात योजना तयार होणार असे ठरले. शेतकऱ्यांना २० हजार रुपये, पाणी पंचायत ३० हजार रुपये आणि ५० हजार रुपयांचे अनुदान मिळणार अशी भांडवली तरतूद झाल्यानंतर काम सुरू झाले. काम सुरू असताना दर आठवड्याला विलासरावांचे विचार ऐकायला मिळायचे. ५ महिन्यांमध्ये काम पूर्ण झाले आणि सगळ्या शेतकऱ्यांची ५० एकर शेती बागायत झाली, शेतकऱ्यांना आनंद झाला. पाणी पंचायत च्या ताटवात फक्त उस पिकाला बंदी होती. बाकी ज्वारी, बाजारी, कांदा व इतर भाजीपाला पिके जोमात येऊ लागली. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारात गेली. आम्ही सर्व शेतकरी पाणी पंचायत चे घेतलेले ३० हजार रुपये (योजनेच्या ३० % रक्कम) पिकमधून हाती आलेल्या पैशातून प्रामाणिकपणे भरत गेलो. पाणी वाटपासाठी नेमलेला पाटकरी तासवारीने पाणी प्रत्येकाला द्यायचा, कोणावरही अन्याय होत नसे. बाबावाडीची लोकसंख्या त्यावेळी २५० इतकी होती. वाडीसाठी सर्वांनी एकत्र नळपाणी पुरवठा योजना केली. घरोघरी नळाने पाणी आल्यावर लोकांच्या आनंदाला सीमा नव्हती. लिफ्टच्या सभासदांना बैठकींसाठी एक सुंदर ऑफिस तयार केल. तिथ एकत्र शेतीच्या विकासाच्या चर्चा होऊ लागल्या. त्यावेळेला बाबावाडीच्या एकही घरात टीव्ही नव्हता. आम्ही सार्वजनिक टीव्ही ऑफिस मध्ये बसवला ज्यावर सर्वजण बातम्या आणि शेतीविषयक माहिती ऐकत एकत्र बसायचे. ह्या सगळ्या गोष्टी घडत असताना पाणी पंचायत चे प्रवर्तक विलासराव साळुंखे आणि त्यांच्या पत्नी कल्पनाताई साळुंखे यांनी अतिशय मोलाची मदत केली.

विलासराव साळुंखे दर आठवड्याला रविवारी लिफ्ट प्रमुखांची बैठक घ्यायचे. त्यामध्ये योजनेसंबंधी अडीअडचणी समजून घेऊन सोडवल्या जायच्या. साहेबांचं बोलणं अभ्यासपूर्ण असायचं. कोणताही विषय चर्चेला घेतला तर तो पूर्णत्वाला जायचा. नवीन योजना करताना अडचण खरी विजेची असायची. विलासरावांच्या मांडणीपुढे बोर्डाचे अधिकारी निरुत्तर व्हायचे. एक एक योजना पूर्ण झाल्यामुळे साहेबांवर लोकांचा पूर्ण विश्वास बसला होता. पाणी योजना करताना साहेबांच्याकडे कुठल्याही जाती धर्माचे लोक आले तरी काम हाती


घेतलं जायचं, भेदभाव केला जात नसे. आमच्या बाबावाडीसहित ज्या ज्या ठिकाणी पाणी योजना झाल्या त्या त्या ठिकाणी लोकांचं कल्याण झालं. चार पैसे हातात येऊ लागले. संसाराची परिस्थिती सुधारत गेली. मूल बाळं शिक्षण घेऊ लागली. गरीब लोकांची परिस्थिती सुधारावी हा साहेबांचा हेतू होता, तो साध्य होत गेला. विलासराव साळुंखे साहेव आमच्यासाठी व अल्पभूधारक गरीब शेतकऱ्यांसाठी देवच होते यात शंका नाही.

*****

# विलासरावांच्या विचारातले क्रांतीकारकत्व

**श्री. मिलींद बोकील**

**मो : ८३२९९८४५३०**



विलासरावांच्या विचारातले क्रांतीकारकत्व कक्षात आहे ? त्यांच्या पूर्वी महाराष्ट्रात समाजसुधारक, विचारवंत किंवा कार्यकर्ते होवून गेले नव्हते असे नाही. पण त्यातले कुणीही पाण्याच्या प्रश्नाला अशा प्रकारे सामोरे गेले नव्हते. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर सर्वत्र भारतात पाण्याचा प्रश्न हाच जीवन – मरणाचा प्रश्न आहे हे ठणकावून सांगणारे विलासराव हेच पहिले समाजिक कार्यकर्ते. देशापुढचा पाण्याचा प्रश्न भीषण आहे याची जाण आता सर्वांना आली आहे. पण पंचवीस वर्षांपूर्वी ही जाणीव ज्यांना झाली त्यात विलासराव हे अग्रस्थानी होते.

मात्र दुष्काळाचा मुद्दा केवळ ऐरणीवर आणून विलासराव थांबले नाहीत, तर महाराष्ट्राच्या दुष्काळी भागातील पाण्याच्या प्रश्नाचे यथार्थ आकलन त्यांनी घडवले.

१९२० च्या सुमारास पश्चिम महाराष्ट्रात चार खाजगी साखर कारखाने निघाले. १९३० नंतर या खाजगी कारखान्यांना खंडाने जमिनी घेण्यास परवानगी देण्यात आली आणि कालव्यांचे मुबलक पाणी स्वस्त दरात देण्याचीही सोय करण्यात आली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १५१ साली प्रवरानगर येथे पहिला सहकारी साखर कारखाना निघाला आणि त्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातील पुढाऱ्यांना सत्ता, संपत्ती आणि अधिकार मिळवण्याची गुरूकिल्लीच सापडली. कालव्यांच्या जोरावर हमखास बारमाही सिंचनाची सोय करून घ्यायची, त्यावर ऊस लावायचा, जातीच्या आधारावर लहान –मोठ्या शेतकऱ्यांची मोट बांधायची, सरकारकडून सवलतीच्या दरात कर्जपुरवठा आणि सबसिडी घेवून सहकारी साखर कारखाने काढायचे, हुकुमशाही पध्दतीने ते चालवायचे, पैसा गोळा करायचा, त्या पैशाच्या व दंडेलीच्या जोरावर आमदार – खासदार व्हायचे, सत्ता संपादन करायची आणि सत्ताधारी बनून आपल्याला हवी ती धोरणे पुन: राबवायची असे हे चक्र होते. सत्ता आणि संपत्तीचे हे चक्र पुढाऱ्यांसाठी चांगले फिरले, पण त्यामुळे महाराष्ट्रातील पाण्याच्या नियोजनाचे मात्र पूर्णत: वाटोळे झाले.

विलासरावांनी साखरेच्या सत्ताचक्राबद्दल तळमळीने लिहिले आहे. महाराष्ट्रातल्या एकूण वहितीखालच्या जमिनीपैकी फक्त दोन टक्के जमिनीवर ऊस होतो. पण महाराष्ट्रातील उपलब्ध पाण्यापैकी जवळजवळ ६० टक्के पाणी ऊसाकरता वापरले जाते. बाकीचा कोरडवाहू भाग पाण्यापासून कायमच वंचित राहतो. बहुसंख्य साखर कारखाने हे दुष्काळी तालुक्यातील आहेत. ऊसाकरता होणारा पाण्याचा बेसुमार वापर अन्यायकारी तर आहेच, पण साखर कारखानदारी ग्रामीण विषमता वाढवणारी आहे असा इशारा विलासराव वारंवार देत. आज त्याची पूर्ण प्रचिती येत आहे.

विलासरावांच्या क्रांतीकारक विचारांचा पुढचा भाग म्हणजे पाणी ही राष्ट्रीय व सामायिक संपत्ती आहे ही त्यांनी मांडलेली कल्पना. गाव हे घटक धरून नियोजन केले पाहिजे ही संकल्पना पूर्वीच मांडली गेली होती. महात्मा गांधींचा सगळं विचार गांव हे मूलभूत घटक धरण्याचा होता. मात्र गावात पडणारे व उपलब्ध होणारे पाणी ही सर्वांची सामायिक संपत्ती (Common Property) आहे यांचा उद्‌घोष महाराष्ट्रात विलासरावांनी पहिल्यांदा केला. हा विचार फार महत्वाचा आहे आणि तो नीट समजून घेतला पाहिजे. सर्वसामान्य लोक मालमत्ता किंवा संपत्तीचे दोनच प्रकार ओळखतात (अर्थशास्त्रही बऱ्याचदा तसेच करते) खाजगी संपत्ती आणि सरकारी संपत्ती. सामायिक संपत्तीची कल्पना या दोहोंपेक्षा निराळी आहे. सामायिक संपत्ती ही एक विशिष्ट समूहाची असते आणि त्या समूहातील व्यक्तींचा तीवर सारखाच अधिकार असतो. खाजगी संपत्ती ही एक मालकीची तर सरकारी संपत्ती ही राष्ट्रातील वा राज्यातील सर्वांच्या मालकीची असते. या दोन टोकांच्या मधोमध एळाद्या विशिष्ट समूहाची (गाव, खेडे, पाडा, वादी यांची) सामायिक संपत्ती असते. गावातील तळे, पाझर तलाव, ओढे, नाले, गायरान इत्यादी गोष्टी सामायिक संपत्तीची उदाहरणे आहेत. त्या गावातील सर्वांचा त्यावर अधिकार आहे, पण कुण्या एकाचा नाही. सरकारने बांधलेली मोठमोठी धरणे, कालवे, पूल, रस्ते या व्याख्येत बसणार नाही हे उघड आहे. मात्र तळ्यासारखी एखादी संपत्ती दोनतीन गावांची असू शकेल. गावाच्या या संपत्तीचे वाटप कसे करायचे हे

ठरवायचा अधिकार स्थानिक समूहाचा असायला हवा. पंचायती राज्याच्या कल्पनेशी अत्यंत सुसंगत अशी ही कल्पना आहे.

सामायिक किंवा राष्ट्रीय संपत्तीचे वाटप हे समप्रमाणात व्हायला पाहिजे हा विलासरावांच्या विचारातील आणखी एक क्रांतीकारी अंश. समानतेच्या (Equity) ह्या कल्पनेमुळेच विलासरावांची कीर्ती सर्वदूर पसरली, पारंपारिक पध्दतीत पाण्याची मालकी ही जमिनीच्या मालकीशी जोडली गेल्याने जमीन मालकीतील विषमता ही अर्थातच पाण्याच्या वाटपातही शिरली. ज्याच्याकडे जास्त जमीन त्याला जास्त पाणी, मग गरज तेवढी असो अथवा नसो. पाणी मुबलक असते, सर्वांची गरज भागून उरणारे असते तर मग प्रश्नच नव्हता. पण जिथे पाण्याची वानवा आहे तिथे समानतेच्या तत्वावर पाण्याचे वाटप झाले नाही तर दारिद्र्य आणि विहामंत अधिकच वाढू शकते. त्यामुळे प्रत्येकालाच किमान गरजा भागतील इतके तरी पाणी उपलब्ध व्हायला हवे.

समानतेची आणि सामाजिक न्यायाची कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी विलासरावांनी माणशी अर्ध एकर आणि कुटुंबासाठी अडीच एकर पाणी हा ठोकताळा मांडला. हे पाणी अर्थातच आठमाही भुसार पिकांकरता होते. ऊसासारखी हारमाही पिके त्यात अंतर्भूत नव्हती. मात्र चार, तेलबिया, डाळी, भाजीपाला आणि फळझाडांचा समावेश त्यात होता. सुरूवातीला पाणी पंचायतीच्या योजनांची उभारणी या तत्वावर झाली. मात्र प्रत्यक्षात ह्या ठोकताळ्याला काही मर्यादा होत्या, उदाहरणार्थ, अनेक लहान शेतकऱ्यांची एकूण जमीनच अडीच एकरांपेक्षा कमी असायची कीव जिथे लिफ्ट करयाची त्या ठिकाणी एकर – दीड एकरच असायची. त्यामुळे या तत्वाची अचूक अंमलबजावणी होवू शकत नसे.

नंतरच्या काळात विलासरावांनी या सूत्रात सुधारणा केली आणि जमिनीच्या मापाने पाणी मोजण्याऐवजी घनमीटरमध्येच पाण्याचे गणित मांडले. महाराष्ट्रात दरडोई, दर वर्षाला साधारण १००० घनमीटर इतके पाणी मिळणे आवश्यक आहे असे सूत्र सिध्द केले आणि त्या सूत्रांच्या आधारे महाराष्ट्राच्या पाणी नियोजनाचा आराखडा सादर केला. त्यांच्या (श्री. प्रसाद रसाळ यांच्यासोबत लिहिलेल्या) महाराष्ट्राच्या जलसंपत्तीचे नियोजन या पुस्तकात त्यासंबंधीचा तपशील पाहायला मिळू शकेल. महाराष्ट्राच्या निरनिराळ्या विभागातील पाऊसमान, सध्या उपलब्ध असलेले पाण्याचे साठे, भूगर्भातील पाण्याचे स्त्रोत, पाणलोट क्षेत्रविकासाची क्षमता इत्यादी सर्व गोष्टींचा विचार करून त्यांनी हा आराखाडा बनवलेला आहे.

विलासरावांच्या गणिताप्रमाणे समानतेच्या तत्वावर पाण्याचे वाटप व व्यवस्थापन केले तर महाराष्ट्रात पाण्याचा प्रश्न कधीही निर्माण होणार नाही.

*****

## मला भावलेले विलासराव

**एक शेतकरी**

१९७२ च्या दुष्काळी कामावर पोट भरणारे पुरंदर तालुक्यातील चिकणे वस्तीवरील एका कुटुंबातील एक अडीच वर्षाचे मूल ४ दिवस तापून मरण पावले. कामावर खाडा करून मुलाच्या मृत्यूचा शोक करायचा की मुलासाठी खड्डा खोदून माती लोटून हृदयावर दगड ठेऊन कामावर हजेरी लावायची या द्वंद्वात सापडलेली सदरची आई अशा प्रकारच्या अनेक घटना पाहून विलासरावांनी कारखानदारी सोडून नायगाव येथे पाणी या विषयाचे चिंतन व प्रयोग सूरु केले. पाणी पंचायातची कल्पना मांडून त्यासाठी स्वतःला वाहून घेतले. त्यांना हृदयविकाराचा त्रास झाला. अत्याधुनिक उपचार घेणे आवाक्यात असूनही दुष्काळी भागात राहणाऱ्या माझ्या बांधवाना अशा प्रकारचे उपचार घेणे शक्य नसल्याने मीही ते नाकारीत आहे. अशी आग्रही भूमिका त्यांनी घेतली.पाण्यासाठी अविरत व अखंड प्रयत्न करताना केवळ ४० % काम करणाऱ्या हृदयासाठीत्यांनी हे उपचार अव्हेरले. थोडीफार औषधे, नियमित व्यायाम व संयमित आहार यांच्या सहाय्याने ते कार्यरत राहिले.

२००० साली नंदुरबार जिल्ह्यातील गौण्या गावाच्या आदिवासी कुटुंबातील मुल धुळ्याच्या सरकारी दवाखान्यात मरण पावले. दूर असलेल्या आपल्या आपल्या गावी जाण्यासाठी या कुटुंबाजवळ गाडीखार्चासाठी पैसे नव्हते. एक मूल हाताशी तर एक मेलेले मूल हृदयाशी धरून ५३ कि.मी. पायी चालल्यावर त्यांना एका ट्रक्टरवाल्याने जवळच्या गावी सोडले. हे ऐकून व बघून विलासरावांनी नंदुरबार भागात काम करण्याचा निर्धार केला. तेथे पाणी पंचायतीचे काम सुरु केले. महाराष्ट्राच्या दुष्काळी भागातील लोकांच्या दारिद्र्याचा प्रश्न सोडवण्यासाठी गुरुकिल्ली त्यांच्या श्रमात व संरक्षित पाण्याची हमी देण्यातच आहे अशी त्यांची धारणा होती. पाणी आडवणे, जिरवणे व न्याय्य पद्धतीने सर्वांना उपलब्ध करणे, हे वैज्ञानिक दृष्टीकोन, साधने

आणि राजकीय इच्छाशक्ती याने सहज शक्य आहे. महाराष्ट्रात सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते आणि नेतृत्व या शेवटच्या थरातून जनतेचा प्रश्न सोडवण्यासाठी आपल्या अंतर्मनात खोल विचार करावा आणि मिळणाऱ्या उत्तराची प्रामाणिक आणि धैर्याने साथ करावी एवढीच प्रार्थना.

*****




पंचक्रोशी शेतकरी सुविधा केंद्र

## ग्रंथ संपदा

**विलासराव साळुंखे यांनी लिहिलेली व त्यांचेवर लिहिली गेलेली पुस्तके**

(१)भगिरथाचे वारस
(२)उदक चालवावे युक्ती
(३)ओळख पाण्याची
(४) पाणी पत्रिका-त्रैमासिक
(५)महाराष्ट्राच्या जलसंपत्तीचे नियोजन
(६)पर्यायी विकास निती
(७)पर्यावरणस्नेही विकास निती आणि विकास केंद्री जीवन शैली
(८) Heirs of Bhagirath
(९) Work Water Wisely



PRIMOVE ENGINEERING GROWTH TBF


## PRIMOVE INFRASTRUCTURE DEVELOPMENT CONSULTANTS PVT. LTD

We PriMove with versatile experience of more than 2 decade in providing various Technical Engineering Services, Capacity Building & Development planning services for Water Supply, Sanitation, Underground Drainage, Storm Water Drainage, Waste Water Treatment solutions, Road & Highways, Natural Resource Management, Agriculture and Environmental Sectors across India.

Key Services & Sectors :




Corporate Office: C3, 304B, Saudamini Commercial Complex, Bhusari Colony, Paud Road, Kothrud, Pune-411038, Maharashtra
Tel: +91 20 25280200/01 Email: info@primoveindia.com
www.primoveindia.com




## TBF ENVIRONMENTAL SOLUTIONS PVT. LTD

We TBF offer expert treatment solutions of Septage, Sewage & Wastewater. Our products - the Tiger Biofilter Sewage Treatment Plant, and Tiger Toilet are based on our proprietary Tiger Technology, which uses a unique combination of worms, bacteria and natural filtration materials to effectively treat fecal and sewage waste.

Till date we have treated more than 10 Million of Waste Water and more than 200 KLDFecal Sludge across India.

**Our Technology has Recommended by Technical Committee, chaired by the Principal Scientific Advisor from "Ministry of Jal Shakti", Department of Drinking Water & Sanitation, Government of India. As Innovative Technology for Treatment of Fecal Sludge & Septage Management.**



**Sarpathi Sanitation Award for Promising Entrepreneur for The 'Tiger Toilet'**-2018

**FICCI Water Awards (9th Edition) First Prize – Urban Wastewater Management Category-2021**






Corporate Office: C3, 304B, Saudamini Commercial Complex, Bhusari Colony, Paud Road, Kothrud, Pune-411038, Maharashtra
Tel: +91 20 25280200/01 Mob: +91 90962 82638 Email: info@tbfenvironmental.in
www.tbfenvironmental.in

# खळदला मारलेली चक्कर

**डॉ. दत्ता देशकर**

**मो : ९३२५२०३१०९**



एक दिवस माझे मित्र श्री. सतीश देशमुख यांचा मला फोन आला. पाणी पंचायतचे संस्थापक श्री. विलासराव साळुंखे यांची विसावी पुण्यतिथी नुकतीच होवून गेली हे निमित्त साधून आपण जलसंवाद मासिकाचा त्यांचेवर एक विशेषांक काढायचा का अशी त्यांनी विचारणा केली. मी स्वतः दोन वेळा खळदला जावून आलो होतो, तिथले काम बघितले होते, कल्पनाताईंचाही परिचय होता. विलासरावांबद्दल एक आदराची भावना निर्माण झाली होती. विचार केला, या निमित्ताने आपण आपल्या मासिकाद्वारे श्री. विलासरावांचे काम समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न करु या. आता पर्यंत बऱ्याच जणांनी हे पवित्र काम आधीच केलले आहे. तरीपण आपलाही या संबंधात खारीचा वाटा असावा अशी इच्छा बळावली आणि अंकाची तयारी सुरु झाली. काम मोठे असल्यामुळे अंकही मोठा राहील याची जाणीव निर्माण झाली. हे काम आपल्याला एकट्याला झेपणार नाही याची खात्री पटल्यामुळे श्री. देशमुखांना या अंकाची अतिथी संपादक म्हणून जबाबदारी स्विकारता का अशी विचारणा केली. तेही तयार झाले आणि प्रत्यक्ष कामाला सुरवात झाली.

ज्यांनी विलासरावांचे काम जवळून पाहिले आहे, ज्यांना विलासरावांनी मांडलेली तत्वे पटली आहेत अशा व्यक्तींचा शोध सुरु झाला, त्यांना आपले विचार लेखाच्या स्वरुपात मांडण्याची विनंती करण्यात आली, ती त्यांनी स्विकारली आणि त्यांच्या लेखांचे संकलन करणे सुरु झाले. या ठिकाणी श्री. सतीश देशमुखांची चिकाटी कामी आली. हळू हळू लेख जमायला सुरवात झाली व अंकाला आकार येवू लागला. अंक निघण्याचे आधी आपण खळदला एक चक्कर मारावी, तिथल्या कामाचे चित्रीकरण करावे म्हणजे अंकाला जास्त जीवंतपणा येईल असे वाटायला लागले. या संबंधात श्री. देशमुखांशी बोललो. त्यांनाही ही कल्पना पसंत पडली आणि आम्ही दोघेजणांनी खळदकडे प्रस्थान ठेवले. तिथे पोहोचताच श्रीमती कल्पनाताईंची प्रत्यक्ष भेट झाली . त्या काही कार्यालयीन कामासाठी तिथे आल्या होत्या. आमच्या येण्याचा उद्देश त्यांना सांगितला. त्यांनाही आनंद झाला. बोलता बोलता माहितीचे संकलन चालू होते. आम्हाला कामाचे काही फोटो काढायचे आहेत, बरोबर एखादा कार्यकर्ता देता येईल का असे विचारताच त्यांनी एका कार्यकर्त्याला आमचे बरोबर परिसरात हिंडण्याचे आदेश दिले. दुपारचे बारा वाजले होते, उन मी म्हणत होते, त्या कार्यकर्त्याने एक हॅट शोधून काढली आणि ती डोक्यावर ठेवून आमची ऐन उन्हात फेरी सुरु झाली.

ग्रामीण भागाला कोणकोणत्या गोष्टी आवश्यक आहेत, शेतकऱ्याचे जीवनात सुलभता कशी येवू शकेल, त्याला आर्थिक स्थैर्य कशामुळे येवू शकेल, त्या साठी काय काय करणे आवश्यक आहे या सर्व बाबींचा विचार करुन या परिसरात कामाची आखणी केल्या गेलेली दिसली. इंग्रजीत ज्याला कपॅसिटी बिल्डींग (क्षमता बांधणी) म्हणतात, ती कशी वाढवता येईल याचा विचार करुन परिसराची उभारणी करण्यात आली आहे.



**श्रीमती साळुंखे यांचे कडून प्रकाशित पुस्तके स्विकारतांना**

क्षमता बांधणीमध्ये प्रशिक्षणाचे स्थान महत्वाचे असते. ते ओळखून विविध विषयांवर ही सुविधा कशी उपलब्ध केली जावू शकेल यावर इथल्या केंद्रात विचार करण्यात आला आहे. त्यासाठी पायाभूत सुविधा जसे निवासी व्यवस्था, लेक्चर हॉल, भोजन व्यवस्था, ग्रंथालय या सर्व व्यवस्था उभारण्यात आल्या आहेत. यामुळे निवासी शिबीरे सहजपणे घेतली जावू शकतात. आजच इथे महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम) या संस्थेतर्फे एक शिबीर चालू होते. त्या शिबीरात जवळपास १०० मुले आणि मुली उत्साहाने भाग घेतांना दिसले. कल्पनाताईंनी त्यांचेसमोर माझे विचार मांडण्याची विनंती केली. माझ्यातील शिक्षक जागा झाला. बरेच दिवसांनी आलेली संधी मी कशी वाया जावू देणार ? स्वॉट अनॅलिसिसचे (Swot Analysis = Strength, Weaknesses, Opportunities and Threats) विद्यार्थी जीवनातील स्थान स्पष्ट करुन विद्यार्थ्यांनी त्याचा वापर करुन स्वतःचे व्यक्तीमत्व विकसित करण्यासाठी काय प्रयत्न केले पाहिजेत यावर थोडक्यात विचार मांडल्यावरच शिक्षकाचा आत्मा शांत झाला. शिबिरार्थींसाठी तयार केलेल्या भोजनाचा आस्वाद घेतल्यावर तर आत्मा आणखीच शांत झाला.



**महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम) यातील अध्यापक वर्ग**

वृक्षराजीचे महत्व सांगणारा फलक खूपच बोलका आहे. तो इतरत्र टाकण्यात आला आहे. या फलकावरील There is no sound that is not mantra, no plant that is not medicine. There is no person unworthy, what is lacking is an Enabler. हे वाक्य तर मनाला खूपच भावले. या वाक्याचा मतितार्थ विचारात घेवूनच या परिसरात विविध वृक्षांची नियोजन पद्धतीने लागवड करण्यात आलेली आहे हे लक्षात आले. आंबा, आवळा आणि सिताफळ यांची झाडे तर खूपच जोमाने वाढलेली दिसली. आवळ्यापासून चवनप्राश कसे बनवायचे याचे प्रशिक्षणही इथे दिले जाते असे कळले. शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी ही उक्ती लक्षात घेवून शुद्ध बियांचा संग्रहही चालू केल्याचे सांगण्यात आले. श्री. विलासराव यांचे हस्ते लावलेला वटवृक्ष मोठा झाला होता. वटवृक्ष जसा विस्तारतो तसाच या संस्थेचा विकास व्हावा अशी कल्पनाही मनात येवून गेली.

ग्रामीण जीवनात मूल्यवर्धन करण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्रीही तयार केलेली दिसली. दाळी तयार करण्याचे यंत्र, शेंगा फोडणारे य़ंत्र, आवळा प्रक्रिया, लाकडी तेलघाणा, मसाला व पीठाची गिरणी अशी छोटीछोटी यंत्रे वस्तूंच्या मूल्यवर्धनासाठी उपयुक्त ठरतात. याची जाणीवही शेतकऱ्यांत निर्माण करण्याची गरज ओळखून त्यांचा प्रचार आणि प्रसार संस्थेमार्फत होत आहे ही निश्चितच समाधानाची बाब आहे.



भारतात विकसित झालेल्या पण काळाच्या ओघात लुप्त झालेल्या आयुर्वेदाला चालना देण्याचेही प्रयत्न स्तुत्य आहेत. भारताला जरी नाही तरी परदेशाला आयुर्वेदाचे महत्व पटलेले आहे. त्यामुळे जगातील कित्येक माणसे आयुर्वेदाद्वारे उपचार करुन घेण्यासाठी भारतात येत असतात. त्यांचेवर अद्यावत उपचार करणारे केंद्रही लवकरच सुरु होत असल्याचे कल्पनाताई म्हणाल्या. परदेशातून येणाऱ्या पाहुण्यांसाठी निवासगृह बांधण्याचे कामही प्रगतीपथावर असल्याचे दिसून आले.

गोपालन हा शेतीला जोडधंदा म्हणून खूपच उपकारक आहे. या द्वारे दूधापासून तर शेतकऱ्याला उत्पन्न तर मिळतेच पण शेतीचा पोत टिकवून ठेवण्यासाठी मिळणारे शेणखत तर अत्यंत मोलाचे असते. रासायनिक खताच्या गोणीची दोरी सोडली तर दुसऱ्या क्षणाला मिळणारे खत शेतकऱ्याला फारच आकर्षक वाटते पण त्यामुळे होणारी शेतीची हानी मात्र त्याच्या लक्षातही येत नाही. महाराष्ट्रातील अनेक हेक्टर

जमीन आता नापिकीच्या मार्गावर प्रवास करीत आहे. तिचा पोत सुधारायचा असेल तर मेहेनत करुन तयार करण्यात आलेले कंपोस्ट खत दुर्लक्षित करुन चालणार नाही. गांडूळ खत तयार करण्यासाठी बांधलेल्या अनेक टाक्या सेंद्रिय खत तयार करण्यासाठी बांधलेल्या दिसल्या. एका कॉर्नरमध्ये गोबर गॅस प्लँटपण डोकावत होता.

एखाद्या कल्पनेचा विस्तार व्हावा असे वाटत असेल तर त्यासाठी सरकारसरख्या बळकट संस्थेचा वरदहस्त असणे आवश्यक आहे. पण स्वार्थाने बरबटलेले राजकारणी असा संस्थेला किती पाठबळ देवू शकतील याबद्दल मात्र शंका मनाला चाटून गेली. निव्वळ कायदे करुन जमिनीवरील परिस्थिती बदलत नसते तर अशा प्रकारचे प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या संस्थांना बळकटी देणे यात सरकार किती रस घेते यावर जमिनीवरचे बदल अवलंबून असतात. पाणी ही एक आर्थिक व सामाजिक वस्तू आहे ही कल्पना समाजाच्या मनात उतरवणे ही अत्यंत कठीण बाब आहे. त्यात या संस्थेला थोडेफार यश आलेले दिसत आहे. कल्पनाताईंचे वय जास्त असले तरी त्यांची जिद्द तरुणाईला लाजवणारी आहे. घरातले तरुण रक्तही आता पुढे येतांना दिसत आहे. पण अजून दिल्ली खूपच दूर आहे. हा खडतर प्रवास करण्यासाठी संस्थेला यश येवो हीच सदिच्छा.

*****



**डॉ. देशकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना**

## ..... विलासरावांच्या कारकीर्दीचा आढावा

- पाणी पंचायत योजनांचा पुरंदर तालुक्यात विस्तार – १९८१
- पाण्यासाठी सत्याग्रह / वीर धरण पाणी परिषद – १९८२
- राष्ट्रीय पाणी पंचायत पक्षाची स्थापना – १९८३
- मल्हारसागर, नाझरे येथे पाणी बाबा मठाची उभारणी – १९८४
- विधानसभा निवडणूक व पराभव – १९८५
- इंटरनॅशनल इन्वेंटर अवॉर्ड – १९८६
- जमनालाल बजाज पुरस्कार – १९८६
- 'नायगाव पॅटर्न ' भा. प्र.से. प्रशिक्षण संस्था, मसुरी येथे शिकवण्यास सुरुवात – १९८७
- उस लागवडीवर हल्लाबोल – १९८९
- यवतमाळ – मेळघाट आणि पुणे जिल्ह्यातील आदिवासी परिसरात काम – १९९२
- महाराष्ट्रातील जलासंपत्तीचे नियोजन – पुस्तक प्रकाशित – १९९६
- सेंद्रिय शेती गटाची स्थापना – १९९७
- समन्यायी पाणी वाटपासाठी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका – १९९८
- समन्यायी पाणीवाटप प्रश्नावर महाराष्ट्र शासनाच्या स्थायी समितीची स्थापना – २०००
- आंध्र प्रदेश शासनाकडून सल्लागार म्हणून आमंत्रण – २०००
- चिकोत्रा खोरे पाणलोट क्षेत्र विकास आंदोलनात सक्रिय सहभाग – १९९९–२००२
- मृत्यू – २३ एप्रिल २००२



**जलसंवाद REGISTERED PERIODICAL**
Postal license no.PCW/108/2021-2023/2020 (Posting at Ganeshkhind SO on 10th of every month)
RNI No. MAHMAR/2012/41686.DECL No. SDM/HAVELI/SR/07/2018 ISBN No. 978-81-924949-0-6




प्रकाशक व मुद्रक: डॉ. दत्ता देशकर
फोन: 09325203109
jalasamvad@gmail.com
dgdwater@gmail.com
जलसंवाद प्रकाशन
अे-201, व्यंकटेश मीराबेल अपार्टमेंट्स, पॅनकार्ड क्लबजवळ,
बाणेर हिल्स, बाणेर, पुणे 411 045